साहित्य

# नम्माळवार


ए. श्रीनिवास राघवन



MR
891.481 015 2
N 152 R

भारतीय

MR
891.481 0152
N 152 R



INDIAN INSTITUTE
OF
ADVANCED STUDY
LIBRARY, SHIMLA



अस्तरावरील छायाचित्र–महाराणी माया ही भगवान बुद्धाची माता होती. तिला बुद्धजन्मापूर्वी एक स्वप्न पडले. बुद्धाचा पिता राजा शुद्धोदन याला त्या स्वप्नाचा अर्थ तीन भविष्यवाद्यांनी समजावून दिला. हा प्रसंग खिस्तोत्तर दुसऱ्या शतकातील नागार्जुनकोंडा येथील एका शिल्पात कोरलेला आहे. त्याची छायाकृती इथे पुनर्मुद्रित आहे.

शिल्पाच्या खालील बाजूला राजचिटणवीस बसलेला आहे. ज्योतिषी सांगत असलेला स्वप्नाचा अर्थ तो लिहून घेत आहे. भारतात लेखनकला अवगत होती, याचा जास्तीत जास्त पुरातन असा शिल्पबद्ध पुरावा देणारे हे शिल्प आहे असा संभव आहे.

नॅशनल म्युझियम, नवी दिल्ली यांच्या सौजन्याने पुनर्मुद्रित

भारतीय साहित्याचे निर्माते

# नम्माळवार

लेखक

ए. श्रीनिवास राघवन

अनुवादक

नलिनी साधले

साहित्य अकादेमी

**Nammalvar** (नम्माळ्वार): Marathi translation by Nalini Sadhale of A. Srinivasa Raghavan's monograph in English on Tamil mystic poet.
Sahitya Akademi, New Delhi (1986).

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 15-00

© Sahitya Akademi
First edition : 1986

**Publisher** :
Sahitya Akademi,
Rabindra Bhavan,
35, Ferozeshah Road,
New Delhi 110 001

MR
891.481 0152
N152 R

**Regional Offices** :
172, Mumbai Marathi Grantha Sangrahalaya Marg, Dadar (East)
Bombay 400 014
Block V-B, Rabindra Sarobar Stadium, Calcutta 700 029
29, Eldams Road, Teynampet, Madras 600 018

**Printer** :
Pratibimba,
281, Shivajinagar,
Behind Congress House,
Pune 411 005

Indian Institute of Advanced Study
117029
9/12/04
SHIMLA

SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 15-00

Library IIAS, Shimla
MR 891.481 015 2 N 152 R
00117029

# प्रास्ताविक नोंद

नम्माळवारांना संत म्हणून मान दिला जातो आणि त्यांच्या ग्रंथांना धर्म-ग्रंथांचा अधिकार लाभलेला आहे, त्यांच्या ग्रंथांचा अर्थ लावण्याचे कार्य सुमारे सातशे वर्षांपूर्वी सुरू झाले आणि त्यातून निष्पन्न झालेल्या टीकांपैकी काहींना आज जवळजवळ नम्माळवारच्या ग्रंथाएवढीच पात्रता लाभलेली आहे. हे टीकाकार जे भाष्य करतात ते सारेच इथे उपलब्ध असलेल्या जागेत सांगणे अशक्य आहे आणि तसा प्रयत्नही केलेला नाही. शिवाय हे पुस्तक तामिळेतर सर्वसाधारण वाचकांसाठी संकल्पित असल्याने त्यांना या भाष्यात फारसा रसही असणार नाही. त्यामुळे केवळ धार्मिक स्वरूपाचे अनेक तपशील इथे गाळलेले आहेत, आणि थोडक्यात सर्वसाधारण परिचय होण्यासाठी अत्यावश्यक वाटले तेवढेच ठेवलेले आहे.

इथे समोर मांडलेल्या विषयात काही प्रमाणात अतिव्याप्तीचा दोष येणे अपरिहार्य झाले. कारण विषय स्पष्ट होण्यासाठी ती आवश्यक होती. परंतु तिचे प्रमाण शक्य तेवढे कमी ठेवले आहे.

भाषांतरासंबंधी थोडे: — शब्दशः भाषांतर आणि संपूर्ण स्वातंत्र्य यांतील सुवर्णमध्य सांभाळण्याचे शक्य ते प्रयत्न केले आहेत. उतारे (कधी कधी फक्त श्लोकांशच) निवडताना आणि त्यांचा अनुवाद करताना मुख्यत: त्याच्या स्पष्टीकरणात्मक मूल्यावर नजर ठेवली आहे.

माझे स्नेही श्री. ए. एन्. मकरभूषणम् आणि श्री. के. पक्षिराजन् यांचा मी आभारी आहे. तिरुनेलवेली–निवासी या वकीलमित्रांनी हस्तलिखित जसजसे लिहिले गेले तसतसे ते वाचून पाहिले आणि बहुमूल्य सूचना दिल्या. हे दोघेही तामीळचे व्युत्पन्न पंडित आहेत, आणि नम्माळवारांचे निष्ठावान, सखोल अभ्यासक आहेत. त्यांची अतिशय मदत झाली, तिरुनेलवेलीचे आणखी एक वकील, माझे मित्र श्री. ए. के. गोपाळ पिल्लाइ यांनी मोठ्या आनंदाने पहिल्या तामिळेतर वाचकाची भूमिका बजावली. त्याच्या प्रतिक्रिया व टीका यांमुळे मला पुस्तकाचा नेमका सूर सापडायला मदत झाली.

तुतिकोरिन,
१-१०-७४.

ए. श्रीनिवास राघवन

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आळवार | १ |
| २. | नम्माळवारांचे जीवन | ५ |
| ३. | नम्माळवारांचे ग्रंथ : तिरुविरुत्तम | ८ |
| ४. | तिरुवासिरियम | २० |
| ५. | पेरिया तिरुवंताती | २६ |
| ६. | तिरुवायमोळी | ३२ |
| ७ | सत्‌च्या शोधात | ४८ |
| ८. | नम्माळवारांचे तत्त्वज्ञान | ६१ |
| ९. | नम्माळवारांचे काव्य | ७८ |

## प्रकरण पहिले

# आळवार

ख्रिस्ताच्या पाचव्या शतकापासून नवव्या शतकापर्यंतच्या काळात[1] तामिळनाडूमध्ये हिंदू धर्माचे मोठेच पुनरुत्थान घडून आले. यावेळी जुन्या श्रद्धा जनसामान्यांकडे वाहून नेणारे एक शक्तिशाली साधन म्हणून तामिळ भाषेला महत्त्व आले. या पुनरुत्थानाचे मुख्य लक्षण परमेश्वराविषयी प्रीती अथवा भक्ती हे होते. या भक्तिभावनेचा आविष्कार तेजस्वी शब्दमाध्यमातून करणारी भाषा म्हणूनही तामिळ याचवेळी समर्थ ठरली. याआधी बौद्ध आणि जैन धर्मांचा प्रसार दक्षिणेत झाला होता. धार्मिक प्रचारासाठी तामिळ भाषेचा उपयोग करून त्यांनी आधीच वाट रुळवली होती. 'मणिमेकलाई' आणि 'सिलप्पदिकरम्' या दोन महाकाव्यांमुळे काव्यात्म अभिव्यक्तीची तामिळची शक्तीही सिद्ध झालेली होती—मागोमाग हिंदू धर्म आला. पण बौद्ध आणि जैन यांनी पूर्वी तामिळ वापरली म्हणूनच हिंदूंनी वापरली हे तेवढेसे बरोबर नाही. त्या भाषेतील तेज आणि कळकळ यांनी काही धर्मपरायण व्यक्ती चेतविल्या गेल्या, मातृभाषेतून अधिक सहजसुंदर अभिव्यक्ती सिद्ध झाली आणि परिणामी तामिळचा वापर झाला. हिंदू धर्माचे पुनरुत्थान दोन मुख्य दिशांनी झाले. कालाच्या ओघात या दोन्ही चळवळी पुढे दोन स्वतंत्र श्रद्धा-पंथ म्हणून मान्यता पावल्या, आणि स्थिरावल्या. यांतील प्रत्येक पंथाने आपण निरपवादपणे सनदशीर असल्याचा दावा केला. यातूनच बऱ्याच काळानंतर पुढे धर्मसिद्धांतविषयक खटके उडाले, कटुता निर्माण करणारे वादविवाद झाले. अस्सल स्वरूपाच्या, आध्यात्मिक उत्थानाच्या युगानंतर बहुधा असे संघर्षाचे युग येतेच. हिंदू धर्माच्या विस्ताराचा हा जो कालखंड आहे त्यातच नायनमार आणि आळवार हे दोन्ही पंथ बसतात. नायनमार शैव तत्त्वज्ञानाचे प्रतिनिधित्व करतात; तर आळवार[2] वैष्णव पंथाचा काव्यमय सूर सांभाळण्याची भूमिका बजावतात.

---

(१) काही पंडितांचे मत आहे की हे पुनरुत्थान ख्रिस्ताच्या सहाव्या शतकापासून दहाव्या शतकाच्या आरंभापर्यंत झाले. यावेळी बौद्ध आणि जैन धर्मांनी हळूहळू माघार घेतली असली तरी पिछाडीला चालणाऱ्या कुरबुरी शेवटपर्यंत चालू राहिल्या.

(२) आळवार शब्दाचा अर्थ 'निमग्न झालेला' असा आहे. प्रस्तुत संदर्भात 'ईश्वराच्या प्रेमात निमग्न झालेला' असा अर्थ घ्यावयाचा. काही शिलालेखांतून हा शब्द 'राज्यकर्ते' या अर्थानेही वापरलेला दिसतो. त्याचा आशय राजवंशात अथवा शुद्ध वंशात जन्मलेला असा घेता यईल.

एकूण आळवार बारा आहेत. त्यांतील अकरांनी ईश्वराची स्तोत्रे गाइली आहेत. मधुरकवी यांनी मात्र त्यांचे आध्यात्मिक गुरू नम्माळवार यांची स्तुती गाइली आहे. वैष्णवांतील रामानुजशाखा या आळवारांच्या कार्याबद्दल काही कालानुक्रम स्वीकारते. परंतु तो विषय अजून मतभेदांचा आणि ऐतिहासिक संशोधनाच्या कक्षेतीलच आहे. परंपरा या सर्वांना स्थूल मानाने खिस्तपूर्व ४२०० व १७०० यामधील कालखंडात वसविते. ऐतिहासिक, भाषाशास्त्रीय आणि साहित्यिक संशोधनाच्या दृष्टीने यांचा खिस्तोत्तर पाचवे अथवा सहावे शतक ते नववे शतक यामधील कालखंडात समावेश केला पाहिजे.

त्यांच्या आयुष्यासंबंधीचे तपशील, त्यांच्या जन्ममृत्यूच्या तारखा कालाच्या धूसरतेत नजरेआड झाल्या आहेत, काही वृत्तांतातून त्यांच्या जन्माचे महिने आणि जन्मनक्षत्रे दिलेली आढळतात. वैष्णव परंपरा जन्मानुसारे नम्माळवारांना सर्व आळवारांत पाचवा क्रमांक देत असली तरी श्रेष्ठ साधुत्वाच्या संदर्भात ती त्यांना अग्रक्रमांक देऊन कुलपती[३] मानते. नम्माळवार हे शरीर आहेत आणि इतर आळवार त्या शरीराचे अवयव आहेत असे तिचे म्हणणे आहे. तिने नम्माळवारांना मानवी जीवांच्या मुक्तीसाठी परमेश्वराकडे रदबदली करणारे मध्यस्थ मानून पूजाविषयाची उंची दिली आहे. नम्माळवार (म्हणजे शब्दश: 'आमचे आळवार') या नावानेच ते आता बहुधा ओळखले जातात. वैष्णव विश्व त्यांच्याकडे ज्या पूज्यबुद्धीने पाहते ती या नावातून सूचित होते.

नम्माळवारांच्या ग्रंथांवर बृहदाकार टीका लिहिल्या गेल्या आहेत. संस्कृत आणि तामिळ यांची सरमिसळ असलेल्या मणिप्रवाळ भाषेत या टीका आहेत. नम्माळवारांनी जे जे लिहिले आहे त्याची सांगड श्री[४] रामानुजांच्या धर्मशास्त्राशी घालण्यासाठी विद्वत्ताप्रचुर प्रयत्न कष्टपूर्वक घेतले गेले आहेत. या टीका म्हणजे विद्वत्ता आणि धार्मिक कुशाग्र बुद्धी या क्षेत्रातील आश्चर्येच आहेत. नम्माळवारांच्या ग्रंथात जे काही मानवसुलभ आहे त्याकडे अथवा त्यांची अभिव्यक्ती ज्या काव्यात्म सौंदर्याने झाली त्याकडे या टीका लक्ष देत नाहीत असे नाही. टीकाकारांचे डोळे नेहमी सावधपणे धर्मसिद्धांतावर खिळलेले असले तरीही अनेकदा ते काव्यातील व्यंजना आणि गर्भितार्थ यावर असे बोट ठेवतात की सौंदर्यशास्त्रज्ञालाही त्यांचा हेवा वाटावा. तथापि त्यांचा मुख्य उद्देश अर्थातच धार्मिक आहे.

नम्माळवार हे संत आहेत या गृहीतापासूनच टीकाकार आरंभ करतात.

---

(३) साक्षात्कारी व्यक्तींच्या कुलांचा प्रमुख.

(४) टीकांची रचना रामानुजांच्या कालानंतर झाली आहे. बाराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि तेरावे शतक हा त्याचा काल आहे. म्हणजे नम्माळवारांनंतर निदान तीन शतकांनी. एक टीका श्री रामानुजांच्या हयातीत लिहिली गेली.

म्हणजे ज्यांनी सत्च्या प्राप्तीसाठी धडपड केली असे ते नव्हते. जन्मापासूनच ते साक्षात्कारी मुक्तात्मा होते. ते अवतार होते. ईश्वराची एक कलाच त्यांच्या रूपाने भूमीवर उतरली होती. हा अवतार परमेश्वराच्या सेनेचा अधिपती सेनाई मुदलियार यांनी घेतला अशी टीकाकारांची श्रद्धा आहे. ते स्वयं परमेश्वराचाच अवतार होते असेही म्हटले जाते. जर याचा स्वीकार केला तर नम्माळवारांच्या ग्रंथातून स्पष्टपणे जाणवणारी उत्कंठा आणि वेदना यांचे नवल वाटेल. कारण जर ते मुक्तात्मा म्हणूनच जन्मले होते आणि ईश्वरापासून त्यांचे अवतरण झाले, त्यामागील हेतूची जर त्यांना जाण होती तर मग त्यांच्या काव्यातून जी सदैव उसळताना दिसते, त्या ईश्वराच्या शोधातील वेदनेची गरजच कुठे उरते ? --याचेही खुलासे दिले जातात. त्यांतील एक असा, की जरी त्यांच्या स्वतःपुरता त्यांचा ईश्वराशी संवाद होता तरीही त्यांनी स्वखुशीने बंधनात गुरफटलेल्या जीवात्म्याची बिकट दशा स्वीकारली आणि ते मुक्तीच्या वाटेवरील वेगवेगळ्या पायऱ्या, जगाने पहावे आणि अनुकरण करावे यासाठी, कष्टाने चढले. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर नम्माळवार हे स्वर्गीय संकेताने मानवी अवस्थेत अवतरलेले संत होते. सत्च्या शोधातील प्रदीर्घ प्रवासात येणारे नानाविध अनुभव जे त्यांच्या काव्यात दिसतात तो एक देखावा आहे असे मानावयाचे. माणूस परमेश्वराच्या शोधात निघाला म्हणजे त्याला जी धडपड करावी लागते तिचा अनुभव जणू काय स्वतःचाच आहे असे त्यांनी फक्त भासविले आहे. प्रत्यक्षात तो त्यांचा नाही. या दृष्टीने पाहिले तर नम्माळवारांच्या सर्व कृती या जीवात्म्याच्या परमात्म्याकडील प्रवासाची प्रगती प्रकट करणाऱ्या नाटचकृती ठरतात.

कदाचित हे खरे असेलही; परंतु नम्माळवारांचे काव्य म्हणजे एक उत्कटता आहे. कुणाचा तरी प्रतिनिधी म्हणून कल्पिलेल्या अनुभवात ती नसते आणि नाटचाच्या संज्ञांनी तिचे विवरण करता येत नाही. नम्माळवारांच्या जीवनाचा विचार त्यांचे सहजसिद्ध अस्तित्व आणि प्रयत्नाने होणारी त्यांची जडण-घडण अशा दुहेरी स्वरूपात करण्यास काहीच हरकत नाही. एक मानव म्हणून त्यांचे जे अस्तित्व होते त्याचा त्यांच्या अंतिम ईश्वरी साक्षात्काराशी कोणताही संघर्ष झाला नाही. तथापि काही काळ त्या मार्गात त्याची अडचण झालीच. विचारांची ही दिशा स्वीकारली तरच नम्माळवारांच्या ग्रंथांत ' मी ' या प्रथमपुरुषी एकवचनीने पार पाडलेल्या सर्व कसोटचा, त्याची अपयशे, त्याचें पराक्रम त्याला वाटलेल्या आशा-निराशा— आणि शेवटी ' मी 'तूनच उत्क्रांत होऊन त्याच्या पार जाऊन त्याला व्यापणाऱ्या परतत्त्वामध्ये त्याचे होणारे विसर्जन, साधक 'मी'चे साध्यात घडून येणारे रूपांतर, ईश्वराच्या प्राप्तीशिवाय ज्याला अन्य कोणतीच आस उरलेली नाही अशा एका समर्पण समुत्सुक आणि परिपूर्ण माध्यमात त्याची झालेली परिणती--या साऱ्या गोष्टींचे सम्यक् दर्शन घडू शकते. या दृष्टीने त्यांच्या

ग्रंथाला सामोरे जाण्यात नम्माळवारांच्या संतत्वाला कोणताच उणेपणा येत नाही; उलट सामान्य माणसातून संत कसा उत्क्रांत होतो याचे संपूर्ण दर्शन घडते. वरवर पाहता अपुऱ्या भासणाऱ्या मानवी हातात ईश्वरी करुणेचा महापूर कसा सामावतो हें दिसते. नम्माळवारांची खरी महत्ता हीच आहे. त्यांचे काव्य हा एक पवित्र दस्तऐवज केवळ त्यांच्या संतत्वाचा नाही तर मानवमात्राच्या गन्तव्याचा आहे. हाच त्यांच्या ग्रंथांचा खास आवाका आहे. नम्माळवारांच्या उत्कंठेने स्वर्गात हरवून घेण्यासाठी पृथ्वीचा त्याग केला हे खरे आहे; पण तिने भरारी घेतली ती इथून घेतली आणि स्वतःला अभिव्यक्ती दिली ती पृथ्वीवरील भाषेतून[५] दिली. आपण हे नाकारू नये. नाहीतर नाट्यमय आकृतिबंधाला दारे उघडणारी त्याची सारी प्रतीकात्मता, सारी पौराणिक चित्रमयता आणि सारे तत्त्वदर्शी विचार जमेस धरूनही त्यांचे काव्य हा एक भावस्पर्शी टाहो आहे हे आपण विसरल्यासारखे होईल. प्रस्तुत ग्रंथ हा नम्माळवारांच्या कृती–उक्तीचा अर्थ या दृष्टीने लावण्याचा एक प्रयत्न आहे.

---

(५) पृथ्वीचा स्पर्श हा पृथ्वीच्या पुत्राला तो ऐहिकातील ज्ञानाच्या शोधात असला तरी नेहमीच नवचेतना देणारा असतो. किंबहुना जेव्हा आपले पाय ऐहिकात खंबीरपणे रोवून आपण उभे राहतो त्याचवेळी ऐहिकातीत हे खऱ्या अर्थाने आणि पूर्णपणे आपल्या काबूत येते. आपण त्याची उंची न चुकता गाठू शकतो. सृष्टीत प्रकट होणाऱ्या परमात्म्याचे कल्पनाचित्र उपनिषदे जेव्हा रेखाटतात तेव्हा ती म्हणतात– " पृथ्वी हा त्याचा आधार आहे ".

– 'श्री अरविंद'

## प्रकरण दुसरे

# नम्माळवारांचे जीवन

श्री रामानुजांचे समकालीन गरुडवाहन पंडितार यांनी संस्कृतमध्ये लिहिलेला 'दिव्यसूरिचरितम्' हा ग्रंथ आणि पिन्पल्हरम् पेरुमाळ जीयर यांनी संस्कृतप्रचुर तामिळ गद्यात लिहिलेला 'गुरुपरंपराप्रभावम्' (सहा हजार) हा ग्रंथ हे दोन नम्माळवार आणि दुसऱ्याही आळवारांच्या जीवनचरित्राचे आधार आहेत. नम्माळवारांचे चरित्र सांगणारे दुसरेही काही ग्रंथ[1] आहेत; आणि बारीकसारीक तपशिलाबाबत त्यांच्यात काही मतभेद असले तरी मुख्य गाभ्याबाबत त्यांचे एकमत आहे. रामानुजांच्या अद्ययावत चालू असलेल्या वैष्णव परंपरेनुसार नम्माळवारांची जीवनकथा पुढीलप्रमाणे थोडक्यात सांगता येईल.

'नम्माळवार', 'षडगोप', 'परांकुश' इत्यादी नावांनी पुढे प्रसिद्धीस आलेले मारन यांचा जन्म म्हणजे सेनाई मुदलियार (ईश्वराचे सेनापती) यांचा अवतार होता. त्यांच्या वडिलांचे नाव 'कारियार' होते. ते तिरुनेलवेली जिल्ह्यात ताम्रपर्णी नदीच्या तीरावर वसलेल्या तिरुक्कुरुगूर गावी राहात. आयुष्याची पहिली सोळा वर्षे मारन अन्न आणि पाणी याशिवाय राहिले. तिरुक्कुरुगूर गावात आदिनाथाचे मंदिर असून त्याच्याजवळ एक चिंचेचे झाड होते. (या झाडासंबंधी अशी श्रद्धा आहे की परमेश्वर श्री नारायणस्वरूपात ज्या नागावर पहुडतात त्या आदिशेषाचा ते अवतार होते.) या झाडाखाली मारन डोळे मिटून बसून राहात. त्यांनी सर्वप्रथम नेत्र उघडले, त्यांच्या पहिल्या वाणीचा उच्चार झाला तो त्यांचे जे पुढे शिष्य झाले त्या मधुरकवींनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देण्यासाठी. तो प्रश्न असा होता' 'जे स्वल्प आहे ते जेव्हा मृतातून जन्मते तेव्हा ते काय खाईल आणि कुठे राहील ?: या प्रश्नाचे उत्तर मारन — आता त्यांना नम्माळवारच म्हणू या — यांनी असे दिले : "ते मृताला खाईल आणि त्यावर राहील."

यानंतरही नम्माळवारांनी त्या चिंचेच्या झाडाची सावली केव्हाही सोडली नाही. ते स्व-रचित स्तोत्रे गात तिथेच राहिले. एकशेआठ 'दिव्य देशां'तील

---

(१) हे इतर ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत : श्री माणवाळ मामुनी यांचा 'उपदेशरत्न मालइ', श्री वेदांतदेशिक यांचा 'देशिक प्रबंधम्', श्री ब्रह्मतंत्र स्वतंत्र जीयर यांचा 'गुरुपरंपराप्रभावम्' (तीन हजार), श्री अनंताचार्य यांचा 'प्रपन्नामृतम्', श्री कंदाडै अप्पन् यांचा 'पेरिया तिरुमुडी अडैवु' आणि श्रीरंगमच्या इतिहासाची नोंद ठेवणारा 'कोइल ओळगु' इत्यादी इत्यादी.

(तीर्थक्षेत्रांतील) सारे देव नम्माळवारांना दर्शन देण्यासाठी तिरुक्कुरुगूरला आले अशी श्रद्धा आहे. त्यांच्या नावावर असणारे चारही ग्रंथ त्यांच्याकडून लिहून झाल्यावर त्यांना बोलावणे आले आणि ज्याची त्यांना आयुष्यभर उत्कंठा लागली होती त्या परमेश्वराच्या चरणी ते लीन झाले.

या त्रोटक वृत्तांतावरून एक गोष्ट स्पष्ट आहे. या भूमीवरील साऱ्या तपशिलाशी संबद्ध असे सर्वसामान्य दिवसभराचे दैनंदिन जीवन नम्माळवार कसे जगले हे आपणास उपलब्ध नाही. उपलब्ध जीवनवृत्तांत हा नम्माळवारांच्या नंतर काही शतकांनी संस्कृतमध्ये लिहिला गेला. या ग्रंथाचा प्रत्यक्ष दावा तर त्याची रचना नम्माळवारांच्या नंतर चार हजाराहून जास्त वर्षांनी झाली असा आहे. हा दृष्टिकोन अर्थात मानसशास्त्रीय पातळीवर सत्य असणारा परंतु धर्मश्रद्धेच्या भावनेने स्वीकारलेला दिसतो. कारण या ग्रंथाची जेव्हा रचना झाली तेव्हा दक्षिणेतील वैष्णवांमध्ये नम्माळवार हे संत म्हणून मान्यता पावले होते. केवळ संतच नव्हे तर संतांचेही संत म्हणून ज्यांच्या केवळ शब्दानेच अतीतावस्थेची द्वारे माणसाला खुली व्हावी असे महंत म्हणून.

अलीकडील जे चरित्रविषयक आणि ऐतिहासिक संशोधन नम्माळवारांच्या आयुष्यातील सत्य घटनांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करते त्यांचा मार्गच कुंठित झाला आहे. कारण सत्य घटनांचे सारे तपशील काळाने गिळंकृत केले आहेत. चरित्र म्हणून आता जे पुढे येते तो दिव्यसूरिचरितम् आणि गुरुपरंपराप्रभावम् या ग्रंथांनी दिलेला आदर्शरम्य वृत्तांत आहे. बॉस्वेलच्या पद्धतीने जे केवळ लिखित आधारावरच विश्वास ठेवणारे असतील त्यांचे समाधान या वृत्तांताने होणार नसले तरीही नम्माळवारांच्या आंतरिक जीवनाशी तो प्रामाणिकपणे जुळणारा आहे आणि हेच महत्त्वाचे आहे. हे आंतरिक जीवन नम्माळवारांच्या ग्रंथांतून नाना परींनी अत्यंत भावस्पर्शी स्वरूपात प्रकट झाले आहे. नम्माळवारांच्या परंपरामान्य वृत्तांतात वर्षानुवर्षे त्यांनी पाळलेले मौन आणि ऐहिक जीवनाविषयी त्यांना वाटणारी अलिप्तता या प्रमुख अर्थगर्भ घटना आहेत. जगात सर्वत्र गूढवाद्यांचा जो अनुभव आहे त्याच्याशी त्या जुळणाऱ्या आहेत. नम्माळवारांच्या जीवनाची आरंभीची वर्षे अंतरीच्या ईश्वराच्या शोधात व्यतीत झाली यावर विश्वास बसण्यास काहीच हरकत नाही. या शोधाचे स्वरूप एकाग्र चिंतनाचे होते आणि ही चिंतनशक्ती काही दैवी नियोजनाने त्यांना जन्मतःच लाभलेली होती. हाच त्यांच्या जीवनातील चमत्कार आहे. अंतर्मुख अवस्थेतून ते जेव्हा बाहेर पडले तेव्हा त्यांचा स्पर्श अंतिम 'सत्'ला झालेला होता. त्यांच्या ग्रंथात यांची नोंद आहे त्याबरोबरच ईश्वरापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी जो प्रवास केला त्यातील वेगवेगळ्या टप्प्यांचीही नोंद आहे. आरंभी मनात उत्पन्न झालेला ऐहिकाविषयीचा तिटकारा, जीवनाचा नेमका अर्थ काय याचा शोध घेण्यास झालेला प्रारंभ, प्रवासात वाटेवर सर्वत्र दाटून आलेला

अंधार, त्या अंधाराचा एकाएकी झालेला लोप आणि तितक्याच अनपेक्षितपणे त्याचे पुन्हा दाटलेले सावट, या प्रवासात जाणवणारी ओढ आणि वेदना आणि अखेर ईप्सिताची प्राप्ती झाल्यानंतर होणारा आनंद– अशा या प्रवासाच्या पायऱ्या आहेत. आणि वस्तुत: प्रत्येक साधक याच वाटेने जात असतो.

'जेव्हा, ते, जे अथांग सागरतळातून वर येते,
ते पुन्हा तळाकडे वळते.'

ज्या अर्थी नम्माळवार जीवनाच्या पहिल्या सोळा वर्षांनंतरच बोलू लागले त्या अर्थी हा मौनाचा काळ त्यांनी सत्‌च्या शोधात व्यतीत केला असे मानले पाहिजे. आणि मग आपल्याला असेही मानले पाहिजे की त्यांच्या ग्रंथांचे काही भाग हे सिंहावलोकन आणि पूर्वस्मृती या स्वरूपाचे आहेत. वर्डस्वर्थच्या शब्दांत थोडा बदल करून सांगावयाचे तर ते साक्षात्काराच्या अतीव शांत क्षणी स्मृतीतून घेतलेले ताजे अनुभवच आहेत.[१]

( ) 'Poetry is emotion recollected in tranquillity.'—Wordsworth.
('काव्य म्हणजे मनाच्या शांत अवस्थेत पुन्हा स्मरलेला भावानुभव आहे.'
— वर्डस्वर्थ.)

## प्रकरण तिसरे

# नम्माळवारांचे ग्रंथ : तिरुविरुत्तम

नम्माळवारांचे ग्रंथ एकूण चार आहेत.

(१) तिरुविरुत्तम – (तिरु विरुत्तम)
(२) तिरुत्रासिरियम – (तिरु आसिरियम)
(३) पेरिया तिरुवंताती – (पेरिया तिरु अंताती)
(४) तिरुवायमोळ्ही* – (तिरु वाय मोळ्ही)

चारही ग्रंथांच्या नावाच्या आरंभी 'तिरु' हा जो उपसर्ग जोडला आहे त्याचा अर्थ 'चांगले', 'शुभ', 'दिव्य' असा होतो.+ विरुत्तम आणि आसिरियम् या दोन वृत्तांच्या जाती आहेत. म्हणून पहिल्या दोन ग्रंथांची नावे ते ज्या वृत्तांत लिहिले आहेत त्यावरून दिलेली आहेत. 'पेरिया तिरु अंतती'मधील 'पेरिया' या शब्दाचा अर्थ 'महान' असा आहे. अंताती हे तामिळमधील एका वृत्तरचनेचे वैशिष्टच आहे. यात पूर्वश्लोकातील शेवटचे अक्षर अथवा शब्द पुढील श्लोकाच्या आरंभीचे अक्षर अथवा शब्द म्हणून येतो.□ 'तिरु वाय मोळ्ही'मधील 'वाय मोळ्ही'चा अर्थ 'जे उच्चारले गेले ते' असा होतो. त्यामुळे 'तिरुवायमोळ्ही' याचा अर्थ 'ईश्वरी उच्चार' असा घ्यावयाचा.

### तिरुविरुत्तम

तिरुविरुत्तम हे काव्य शंभर श्लोकांचे असून त्यातील प्रत्येक श्लोक चार ओळींचा आहे. 'कट्टळै कलित्तुरइ' नावाच्या विशेष प्रकारच्या वृत्तात हे श्लोक रचलेले आहेत. यात प्रत्येक ओळीत पाच गण असून चारी ओळींत आरंभी यमक

---

* ('ळ्ही'शी थोडेबहुत साम्य असलेला तामिळ उच्चार नागरी लिपीत नेमकेपणे व्यक्त होत नाही. सोयीसाठी, हे ग्रंथनाम 'तिरुवायमोळी' अशा स्वरूपातच सर्वत्र लिहिले आहे.)

+ (या संदर्भात 'तिरु' हे संस्कृत 'श्री'चे तामिळ रूप आहे. जुन्या परंपरेनुसार पवित्र ग्रंथांचा उल्लेख 'श्री' हा त्यांचे पावित्र्य व्यक्त करणारा प्रत्यय त्यांच्या नावापूर्वी लावूनच होतो.. जसे : 'श्रीमन्महाभारतम्', 'श्रीभागवतम्', 'श्रीमद्भगवद्गीता' इत्यादी)

□ ('अंतादी' या स्वरूपात हा अर्थ अधिक चांगला व्यक्त होतो, अंत– आदि या संस्कृत शब्दांशी तो उघडच जोडलेला आहे. पण 'Tiruvantati' या इंग्रजी स्पेलिंगला अनुसरून ग्रंथनाम 'तिरुवंताती' असेच लिहिले आहे.)

यंते. वृत्ताची एक जात असा विरुत्तम्चा एक अर्थ आहे. त्याचप्रमाणे 'संदेश' आणि 'घटना' असेही त्याचे दुसरे अर्थ आहेत. सर्वसाधारणपणे असे मानले जाते की नम्माळवार हे ईश्वराच्या प्रेमात पडले आहेत आणि या 'घटने'चे वर्णन ते प्रस्तुत काव्यात ईश्वराजवळ करीत आहेत.
काव्याच्या पहिल्या श्लोकातच हे लक्षित होते :–

'वाचविण्यासाठी आम्हाला विपरीत ज्ञानापासून–
पातकाच्या वाटांपासून आणि देहरूप नरकापासून,
वाचविण्यासाठी आम्हाला पुन्हा पुन्हा वळण्यापासून–
या साऱ्याकडे;
आणि देण्यासाठी आम्हाला चिरंतन जीवन
हे ईश्वरा, हे अमरांच्या सम्राटा,
तू इथे अवतरलास–
अनेक गर्भाशयांतून जन्म घेत–
अनेक रूपे स्वीकारीत.
हे ईश्वरा ऐक; हे माझे सत्य निवेदन, लक्ष देऊन'[१]

काव्याला एक नाटचमय संगती लाभत जाते, काही पात्रे आकारू लागतात आणि त्यातून हे प्रीतीचे नाटच उभे राहाते. भक्ताची ईश्वराबर असलेली ही प्रीती स्त्री–पुरुषांच्या पार्थिव प्रीतीचे रूप धारण करते. या प्रतीकात्मकतेत जीवात्म्याने स्वतःला प्रीती करणाऱ्या प्रेयसीच्या स्वरूपात पाहावे. आणि ईश्वराला सर्वांवर प्रेम करणाऱ्या एका चिरंतन प्रेमिकाच्या रूपात बघावे हे स्वाभाविकच आहे. काव्यातील अनेक श्लोकांतून नम्माळवारांची ईश्वरविषयक ओढ ही प्रेमासाठी तडफडणाऱ्या विरहिणीच्या अंतःकरणातून व्यक्त होते :

'रे माझ्या बापुडचा मना, एकटचानेच गेलास तू मला सोडून–
त्या ईश्वराचे जे वाहन त्या 'ज्वलंत पक्ष्यामागून'[२] –
तो ईश्वर– जो धारण करतो शीतल तुळशी[३] आणि तेजाळ चक्र
रे मना, आता तू मजकडे येशील काय परतून?
की थांबशील तिथेच करीत एकटक निरीक्षण–
त्या लक्ष्मीचे आणि त्या पृथ्वीदेवतेचे
आणि सुंदर कुरळांनी मंडित त्या गोपकुमारीचे[४]

---

(१) तिरुविरुत्तम – १ (२) गरुड – विष्णूचे वाहन. (३) सुगंधी पानांचे रानझुडूप. (४) हिचे नाव नप्पिन्नई. तामिळ परंपरेनुसार कृष्णावतारात परमेश्वराने हिच्यावर प्रीती केली.

या तिहेरी तेजप्रभा नेहमीच कवटाळून असतात त्याला सावलीप्रमाणे[५]

ईश्वराला सावलीसारख्या चिकटलेल्या या तिघी त्याच्या महत्तेपासून वेगळ्या काढताच येत नाहीत. त्यांचा उल्लेख करून नम्माळवार ईश्वराची त्यांना लाभलेली ही जवळीक आपल्याही थोडी वाट्यास यावी अशी आपली मनीची उत्कंठा प्रकट करतात.

मग हिवाळ्यासह पावसाने भरलेल्या मेघांचे आगमन होते.* पण हा हिवाळा तरी आहे काय ?

'हे ढग– वाऱ्याने एकत्र केलेले आणि उधळून दिलेले
कल्याणकारी पावसाची बरसात करणारे–
हे का वृषभ आहेत भयानक,
आकाशात झुंजणारे विजयासाठी निर्णायक ?
की खरेच आला आहे हिवाळा, छळण्यासाठी मला–
त्याचे लावण्य घेऊन, त्याच्यासारखा घननीळ होऊन ?
वरून शीतल, कुसुमस्पर्शी भासणारा
पण निर्घृणपणे माझ्या जखमांत सळी खुपसणारा ?
जखमा–त्याच्या विरहाच्या वेदनेने ठणकणाऱ्या [६]

ही भाववृत्ती बदलते आणि या प्रेयसीला नवल वाटू लागते की आपल्या प्रियकराच्या कांतीची ती निळी झळाळी या मेघांनी मिळवली तरी कशी ?–

'हे मेघांनो, सांगा ना मला
कशी मिळाली ही योगशक्ती तुम्हाला ?
माझ्या ईश्वरासारखे दिसण्याची ?
त्याच्या करुणेने तुम्ही केलेल्या तपाचे का हे फळ ?
तप–दुखरी काळजे घेऊन भटकण्याचे दूरवर ?
पर्जन्याचे जडभारी ओझे वहात –
इथली जीवसृष्टी जगविण्याचे ?' [७]

---

(५) तिरुविरुत्तम–३; लक्ष्मी म्हणजे लावण्य, ईश्वरी कारुण्य; पृथ्वीदेवता हे ईश्वर आणि पृथ्वी यांतील निरंतर नात्याचे सगुण रूप. हे नाते ईश्वर हा पृथ्वीचा निर्माता, पालनकर्ता आणि तिच्या अंतरी निवास करणारा म्हणून; तो पृथ्वीवर अवतार घेतो तेव्हा आपल्या दैवी कारुण्याने जीवांचा उद्धार करतो. नप्पिन्नई ही तामिळ साहित्यातील राधा. *(तामिळनाडूत वळीवाचा पाऊस हिवाळ्यात पडतो त्याचा संदर्भ असावा.) (६) या श्लोकात दुसऱ्या अर्थाप्रमाणे विरहिणीची सखी, हिवाळा खरोखर आलेला नाही असे तिचे सान्त्वन करीत असते. (७) तिरुविरुत्तम –३२.

जवळच्याच तलावातील निळी कमळे या विरहिणीला दिसतात तेव्हा हाच प्रश्न पुन्हा उपस्थित होतो :–

‘ अरे ! हे असे कसे घडले ?
माझ्या प्रभूसारखीच निळीशार कशी ही कमळे ?
वनांकडे आणि धरणीकडे पाठ फिरवून
पाण्यात उतरून
तेथे दृढपणे पाय रोवून–ती तप करीत उभी आहेत–म्हणून ? [८]

ही उत्कंठा वाढू लागते आणि ती जिकडे वळेल तिकडे तिला तिच्या प्रभूच्या नयनाचीच जादू दिसू लागते :

घननीळ पर्वताच्या रुंदावलेल्या टोकांवर –
विस्तारलेल्या दूरवर, कमलपूरित तलावाप्रमाणे –
मी वळते जिकडे तिकडे
माझ्या प्रभूची नयनकमले सुंदरतेचे जाळे विणतात–
जिकडे तिकडे
माझ्या प्रियतम प्रभूचे नमन; घननीळ आणि सुंदर.
प्रभू; जे जे कल्याणमय त्याचा; स्वर्गाचाही;
आणि महासागरांनी वेढिलेल्या या जगाचाही’ [९]

ती पुढे आनंदमुग्ध होऊन म्हणते– “ओहो ! ही तर सारीच कमळे आहेत. त्याचे पाय… कमळेच कमळे !”[१०]

आणि मग एकाएकी तिला एक शंका ग्रासते. त्याचे हे स्वर्गीय लावण्य ती केवळ शब्दांनी सांगू तरी शकेल काय ?–शब्द; जे या महान अर्थव्यक्तीला अगदी तोकडे आहेत ?–

‘ माझ्या प्रभूची ती सुंदर घननीळ मूर्ती–
कोण करू शकेल तिची संकल्पना, मनातही ?
त्यांच्या तरी आवाक्यात आहे काय–
ज्यांचे चिंतन
आकाश ओलांडून जाते पलीकडे
चिरंतन अशा विश्वाकडे ?’[११]

“नाही, ते शक्यच नाही.” तिचा निर्णय होतो. यात एकीकडे स्वतःच्या अपुरेपणाची खंत वाटते तर दुसरीकडे तिच्या प्रभूच्या अनंतत्वामुळे मन आनंदविभोर होते :

‘ त्याचा वर्ण, त्याचे लावण्य, त्याचे नाम, त्याचे रूप
कोण करू शकेल याचे वर्णन ?

---

(८) तत्रैव – ३८ (९) तिरुविरुत्तम–३९ (१०) तत्रैव–४३ (११) तत्रैव.

तरीही ते बोलतच राहतील–
जणू काही त्यांना ठाऊक आहेच.
ज्ञान आणि धर्ममार्गांतील हे उपासक
कितीही दूर जावोत
त्या प्रकाशमय परमेश्वराच्या प्रभेत
शक्य आहे की त्यांना कणभर ज्ञान होईलही
पण त्या माझ्या प्रभूची थोरवी;
ती कोणाला तरी गवसेल काय ? [१२]

इथे आशय असा आहे की ज्ञान आणि धर्माचरण हे परमात्म्याचा साक्षात्कार घडवायला अपुरे आहेत. त्यांच्याकडे केवळ प्रीतीच ( भक्तीच )पोहोचू शकते.

ही प्रीती तर तिजजवळ आहेच; पण तो प्रियकर प्रभू अजून आलेला नाही. एकलेपणाची आग वाढत आहे. पश्चिमा अंधारते. चंद्रकोर डोकावते. रात्रीच्या वायुलहरी झुळझुळ लागतात :

'रात्र आली;
ओठावरचं ज्याच्या स्तन्य अजून वाळलं नाही असं तिचं बाळ –
ती चंद्राची कोर
तिच्या कडेवर बिलगली आहे.
सूर्य हरपला –
म्हणून पश्चिमा शोकमग्न आहे.
ही इथे वाऱ्याची शीतल झुळूक आली
चाचपडत, शोधत –
आमच्याकडून चोरून नेण्यासाठी
त्या प्रभूनेच आम्हाला दिलेली –
त्याच्या तुळशीची सोत्कंठ प्रीती'. [१३]

ती प्रेयसी पुढे म्हणते, "होय. पण आता वारा शीतल राहिला नाही. तो निर्दयपणे जाळीत सुटला आहे. तो अदृश्य आहे. आम्हाला ना त्याचे रूप ठाऊक, ना आम्ही त्याच्या पाउलवाटांचा मागोवा घेऊ शकत. तो मात्र निंदाप्रवाद कुजबुजत इकडे तिकडे फिरत आहे – माझा एकसारखा छळवाद करीत." [१४]

---

(१२) तत्रैव–४८ (* ज्ञानसाधना आणि धर्माचरण हे जे परमेश्वरप्राप्तीचे दोन प्रमुख मार्ग, त्यांचा हा निर्देश आहे.) (१३) तिरुविरुत्तम–३५. 'परमेश्वराने दिलेली गोष्ट म्हणजे त्याच्यावर प्रीती करण्याची, त्याच्यावर विसंबण्याची शक्ती. तिलाही आम्ही पारखे व्हावे अशी वाऱ्याची इच्छा आहे काय ?' –हा एक अर्थ. (१४) तिरुविरुत्तम–४१.

रात्र दाटते. युगासारखी विस्तारते. जणू हिला नष्ट करायचा तिचा निर्धार असतो.[१५] कोवळा चंद्र उदयाला येतो. तो तिला सांभाळण्यासाठी आला आहे का? चहुबार वेढून राहिलेल्या[१६] रात्रीचा निडर अंधार भंगण्यासाठी तो उगवला का? कदाचित. पण तोही चटकेच देत आहे.

कुठेतरी कुंजातून अनरिल पक्षी मोठ्याने गीत गात आहे. तो थांबतच नाही. सागराची अविश्रांत गर्जना शेकडो खाड्यांतून भूमीवर चोरटे आक्रमण करीत आहे. हे आवाज रात्रभर त्या प्रेयसीचा छळ करीत आहेत.[१७] 'हा सागर सारखा हाका मारत आहे. माझ्या प्रभूने त्याचे मंथन केले तेव्हा नाइलाजाने त्याने अमृत दिले.[१८] ते तो परत मिळवू शकत नाही. मी माझे गरिबाचे शंखचुडे देऊन टाकावे असे का सांगत[१९] आहे हा?' असा विचार ती तिच्या दुःखितावस्थेत करते. मग प्रभात होते. डोंगरावर सूर्य उगवतो. तिला वाटते तिचा प्रियकरच समोर आला. ती आनंदाने उमलते. साऱ्या दुःखांचा, वेदनांचा अंत होतो.[२०] पण हे क्षणभरच. आपण प्रियकरापासून दूरच आहोत ही जाणीव प्रकटते आणि ती आक्रोश करते–

"कधी? कधी पोहोचेन मी त्याच्याकडे?"

आणि नंतर जड अंतःकरणाने म्हणते, –

"हे चक्रधरा परमेश्वरा,
तुझ्या चक्राने असुरांना[२१] विध्वंसिले.
मला आश्चर्यच वाटते,
मला हा मनुष्यजन्म लाभला तरी कसा.
कोण जाणे किती काळ,
मी याच्यासाठी तपस्या केली?
माणसाचा देह मिळाल्यावर
हे प्रभो, तुझी दासी बनून
मी तुझ्याकडे पोहोचेन असे मला वाटले, –
पण तसे घडावयाचे नाही, –
आणि प्रतीक्षेचा हा दीर्घ–प्रदीर्घ काळ,
तोही मेला संपत नाही." [२२]

तरीही तिची श्रद्धा अविचल राहते. तिचे मन ईश्वराला[२३] सोडून आणखी

---

(१५) तिरुविरुत्तम ७० (१६) तत्रैव ७२ (१७) तत्रैव ८७ (१८) पुराणानुसार देव आणि असुर यांनी सागरातून अमृत मंथिले होते. (१९) तिरुविरुत्तम ५१ (२०) तत्रैव ८८ (२१) देवांचे सदैव शत्रुत्व करणारा दुष्ट लोकांचा वंश, दैत्य अथवा राक्षस. (२२) तिरुविरुत्तम ९०. (२३) तत्रैव ९१.

कुठे वळणार नाही असे ती मानते. पण ते दुबळे मन चंचल बनते आणि तिला चकवा देते :

' माझ्या मनावर विसंबून, –
ते माझ्या अधीन आहे, निष्पाप आहे असें मानून
मी त्याला ईश्वरामागे पाठविले … … …
आणि आजपर्यंत
ते मागे परतलेलेच नाही,
आता स्वतःच्या इच्छेने चालणारे ते
माझ्या ताब्यात नाही, ते मला सोडून गेले आहे.
आणि भरकटत आहे, कुठे ते मला माहीत नाही.' [२४]

या मनाच्या मागे ती हंसांना आणि करकोच्यांना पाठविते :

' हे गुणी हंसांनो आणि करकोच्यांनो,
तुम्ही उडत कुठेतरी निघाला आहात.
मला एक विनवणी करू द्या. विसरू नका.
आधी वैकुंठाला [२५] जा.
आणि जर माझे मन तुम्हाला तिथे आढळले,
तर माझी आठवण देऊन त्याला विचारा,
ते अजून त्या प्रभूकडे गेलेलेच नाही का ?
आणि जर गेलेले नसेल
तर त्याला विचारा,
हा चेंगटपणा रास्त आहे का ?' [२६]

पक्ष्यांकडून तिला काहीच उत्तर मिळत नाही. कदाचित मेघ अधिक उपयोगी पडतील असे वाटून ती त्यांच्याकडे वळते;

' हे विजेच्या झळाळात चकाकणाऱ्या मेघांनो,
पर्वताच्या अचल, उंच शिखराकडे तुम्ही निघाला आहात,
सुवर्ण आणि रत्ने यांनी प्रकाशित
अशा वेंकटप्रभूच्या शिखराकडे,
तुम्ही परमेश्वराला माझा संदेश पोहोचवाल का ?
" नाही, " ते म्हणाले.
मी जर त्यांची प्रार्थना केली,
आणि माझ्या वाकलेल्या मस्तकावर,

---

(२४) तत्रैव ४६. (२५) परमेश्वराचा निवास, स्वर्ग. (२६) तिरुविरुत्तम ३०.

त्यांनी त्यांची पावले ठेवावी असे सांगितले,
तर मेघ माझी विनवणी मानतील का ?'[२७]

अशा प्रकारे या काव्यातील अनेक श्लोकांतून नम्माळवार त्यांची ईश्वरविषयक उत्कंठा व्यक्त करतात. या काव्यातील प्रेमवेडी स्त्री म्हणजे स्वतः नम्माळवारच आहेत.

या काव्यातून जे प्रीतिनाटय उलगडत जाते, त्यात आणखीही काही पात्रे आहेत. नम्माळवार त्यांचा वेगळा असा उल्लेख करीत नाहीत. परंतु संदर्भ आणि त्या पात्रांच्या मुखातील शब्द यावरून त्यांची ओळख पटत जाते. प्रमुख पात्र जी प्रेमदिवाणी स्त्री आहे तिला जर आपण नायकी अथवा तलैवी (म्हणजेच नायिका) असे म्हटले-- आणि सामान्यतः असेच म्हटले जाते-- तर इतर पात्रे पुढीलप्रमाण उरतात : नायकीची दासी आणि सखी, तिची आई, तिची दाई, प्रियकर असणारा स्वतः परमेश्वर, त्याचा सखा आणि कट्टुवीची (भगतीण). नायकीला भुताने पछाडलेले आहे अशा समजुतीने या कट्टुवीचीचा सल्ला विचारला जातो. नायकीच्या सखीचे काम नायकीला सहानुभूत होणे, तिचे सान्त्वन करणे आणि तिच्या एकाकी अवस्थेवर भाष्य करणे हे आहे. ही सखी काय म्हणते ते ऐकू,–

' मला वाटते,–
ती अनुल्लंघनीय आज्ञा,
त्या प्रभूची, जो सजल मेघासारखा आहे,–
आज जरा ढिली पडलेली आहे,–
तसे नसते तर, हा वारा,–
जो स्वभावतःच शीतल असतो,
तो इथे अशी आग का ओकता,–
आणि जिचे मन प्रभूच्या तुलसीमागे गेले आहे,
त्या माझ्या गरीब बापुड्या सखीचे विशाल नयन–
असे अश्रू का ढाळते ?' [२८]

मत्रिणीच्या अवस्थेमुळे ती स्वतःच इतकी दुःखी होते की जणू काय तिचा प्रियकर परमात्मा समोरच असावा, अशी दूषणे ती त्याला देते :

' अथांग निळा सागर निर्दय गर्जना करीत आहे–
ती बापुडी एक स्त्री आहे याचा विचारही न करता,
तो जणू तिला आव्हाने देत आहे;
आणि तिची वेदना अधिकच आर्त होते.
हे प्रभो, तुझ्या करुणेशिवाय,

२७) तिरुविरुत्तम ३१ (२८) तिरुविरुत्तम ५.

कोणीच तिला वाचवू शकत नाही.
हे शेषशायी घननीळा,
यापुढे आणखी उशीर करणे,
हे तुला योग्य वाटते का ? ' २९

सखी नायकीला तिच्या प्रियकराची महत्ता समजावून देते. अपार करुणेमुळे तो पृथ्वीवर कसा अवतरला हे सांगते आणि तीच करुणा तिला वाचवील असे सुचविते :

'क्षणाची निद्रा न घेता तप करणारे योगी,–
जन्मचक्राचे कष्ट टळावे म्हणून त्या प्रभूला शोधतात.
जे अमर त्या देवांनाही,
तो प्रभू अज्ञेय आहे.
तीच त्याची अनंतता आहे.
पण तू चिंता करू नकोस.
त्याच्या वागण्यातील गूढताही महान आहे.
तो पृथ्वीवर अवतरला नव्हता काय ?
आणि लोणी चोरले म्हणून;
त्याने बोलणी सहन केली नव्हती काय ?' ३०

नायकीच्या दाईला नवल वाटत आहे; ही मुलगी एवढीशी आणि कोवळी असताना तिची वासना अशी उफाळून का यावी याचे. या मुलखावेगळ्या उन्मादा-बद्दल जग काय म्हणेल याचीही चिंता तिला आहे.–

अजून तिचे स्तनसुद्धा पुरते उमटलेले नाहीत–
तिचे केस दाट आणि मऊ असले–
तरी अजून वाढलेले नाहीत
तिची साडी अजून कमरेवर घड राहात नाही.
बोलणेही लाडे लाडे अस्पष्ट आहे,–
एखाद्या लहानग्या मुलासारखे.
सागर आणि धरणी याहून अनमोल तिच्या नयनांत
चंचल चमक तरळते आहे.
या एवढ्याशा चिमुरडीने
'वेंकटाद्री हा माझ्या प्रभूचा निवास आहे का'
असा ध्यास घ्यावा–
हे योग्य आहे काय ?' ३१

---

(२९) तत्रैव ६२. (३०) तिरुविरुत्तम ९८. ईश्वराने लोणी चोरले हा प्रसंग कृष्णावतारातील आहे. (३१) तत्रैव ६०.

आपली कन्या प्रभूबरोबर त्याच्या नगरीला निघून गेली याचे नायकीच्या आईला दुःख आहे. जाताना वाटेत ओसाड मरूभूमी लागली असेल. तिथे दुष्ट माणसे भटकत असतील आणि आपल्या डोळ्यांच्या दणक्याने वातावरण भीषण करीत असतील. तिथे नायकीला काय भोगावे लागले असेल याचीही तिला खंत आहे.[३२]

हे जग विचित्रच आहे. कारण आपल्या प्रियकराबरोबर निघून जावे याच एका गोष्टीची नायकीला उत्कंठा आहे. काव्यात इतरत्र स्पष्ट होते त्याप्रमाणे अजून हे जाणे घडलेले नाही. जर नायकी निघूनच गेली असेल तर काव्यात पुढे सांगितले आहे त्याप्रमाणे भगतिणीला कशासाठी बोलावून घ्यावयाचे ? आणि नायकीला भूतबाधा झाली किंवा कसे याविषयी तिचे मत कशासाठी घ्यावयाचे ? भगतीण निदान करते की नायकी प्रेमात पडली असल्याने तिची अशी अवस्था आहे. हे प्रेम अमरांच्या सम्राटाविषयी आहे आणि त्यावर उतारा तो वापरीत असलेली तुळस हा आहे. भगतीण म्हणते, "तुळशीचा एखादा हार अथवा त्या रोपाची काही पाने, एखादी फांदी अथवा मूळ, निदान तुळस वाढते तेथील मातीचे एखादे ढेकूळ–तेवढ्यानेही काम होईल."[३३]

एका श्लोकाचा अपवाद वगळता शेवटपर्यंत काव्यात नायकीला प्रियकर सामोरा येत नाही हीही गोष्ट तितकीच नवलाची आहे.[३४] त्या एका श्लोकातही प्रियकर नायकीसह एक मरुभूमी कशी ओलांडीत आहे, भूमी ओसाड असली तरी तिने अस्वस्थ होऊ नये हे तिला कसे सांगत आहे व स्वतःची नगरी जवळच असल्याचा धीर कसा देत आहे याचे वर्णन आहे. दुसऱ्या एका श्लोकात हा प्रियकर त्याच्या सारथ्याला रथ वेगाने चालवायला सांगत आहे कारण त्याची प्रिया वाट पहात आहे व त्याच्यासाठी झुरत आहे.[३५]
आणखी एका ठिकाणी परमेश्वर नायकीच्या सखीबरोबर प्रकट होतो. आपण ज्या हत्तीची शिकार करीत होतो तो हत्ती या बाजूला गेला का हे पहायला आल्याचा बहाणा तो करतो. यावेळी तो तिला प्रश्न विचारतो त्याविषयी ती नाराजी व्यक्त करते.[३६] आणखी एका श्लोकात परमेश्वर त्याच्या प्रियेच्या केसांच्या सुगंधाचे वर्णन करतो आणि मधमाश्यांना विचारतो की त्यांना फुलांचा जो प्रदीर्घ

(३२) तिरुविरुत्तम ३७. (३३) तत्रैव ५३. (३४) तत्रैव २६. याचा अर्थ नम्माळवारांना क्षणभर सत्त्वा साक्षात्कार झाला त्याकडे लावता येईल. (३५) तत्रैव. ५०. इथे एक चमत्कारिक गोष्ट आहे. प्रियकर हा ईश्वराचे प्रतीक असूनही ज्या ठिकाणी त्याची प्रिया प्रतीक्षा करीत आहे त्या वेंकटम्‌चा उल्लेख तो 'परमेश्वराची टेकडी' असा करीत आहे, वक्ता स्वतःच परमेश्वर नव्हे काय ? (३६) तिरुविरुत्तम २२.

अनुभव असतो त्यात त्यांना कुठे यापेक्षा मधुर गंध आढळला का ?[३७] एका श्लोकात ईश्वर स्वतःच्या सख्याशी बोलत आहे. त्याच्या प्रियेचे काळेभोर सुंदर नेत्र सागरासारखे विशाल, अथांग आहेत. तो मित्राला खात्रीने सांगत आहे की जो कोणी ते डोळे पाहील तो तिच्या प्रेमात पडल्याबद्दल ईश्वराला मुळीच दोष देणार नाही.[३८] तेव्हा ईश्वराचा मित्र स्वत: जातो. नायकीच्या डोळ्यांचे सौंदर्य आणि तिची पात्रता स्वत: पाहतो आणि परतल्यावर ईश्वराला सांगतो की आता त्याची खात्री पटली. ईश्वराचे प्रेमात पडणे तो अवास्तव मानत होता ही त्याची चूक आणि आंधळेपणा होता.[३९]

जीवात्मा हा परमात्म्याच्या प्रीतीत पडला आहे आणि त्याच्या भेटीसाठी उत्कंठित झाला आहे. यात अनुस्यूत असलेली नववधूची संकेतगर्भित मूळ प्रतीकात्मता साधी आणि सरळ आहे. तिच्यात इतर व्यक्तिचित्रे मिसळण्याने, त्यांच्यासाठी वेगवेगळ्या घटना कल्पून त्यानुसार त्यांच्या मुखात ते ते संवाद घातल्याने या साध्या प्रतीकात्मतेत गोंधळ निर्माण झाला असे म्हणायचे नसले तरी ती अधिक गुंतागुंतीची झाली असे वाटल्याखेरीज रहात नाही.

तामिळ काव्याच्या अभ्यासकाला या साऱ्या गोष्टी संगमयुगातील प्रेमकवितेच्या आदर्शावर बेतलेल्या दिसतात आणि प्रेमकथेच्या काव्यसंपत्तीत त्यामुळे भर पडत असली तरी प्रियकर आणि प्रिया म्हणजेच परमात्मा आणि जीवात्मा या प्रतीकात्मतेतील नेटकी अर्थवाहकताच त्यामुळे धूसर होते.

काव्याच्या शेंवटी शेवटी नम्माळवार स्वतःच या प्रतीकात्मतेचा त्याग करतात. उदाहरणार्थ ते म्हणतात :

'जन्म घेणे – मरणे –
युगामागून युगे, युगामागून युगे, –
मरणे आणि पुन्हा जन्म घेणे,–
जे जाणू शकतात,–
आणि हसू शकतात या व्यर्थतेला.–
नक्कीच ते ती संपावी असे इच्छितील.–
ईश्वर – जो आदिमूळ,
ज्याच्याभोवती पूजेसाठी अमर देव जमा होतात,–
त्याच्याकड प्रीतिपूर्वक वळल्यानंतर

---

(३७) ति.वि. ५५. (३८) तत्रैव ५७. (३९) तत्रैव ९४. काही टीकाकार हा श्लोक नायकीच्या संबंधात मानतात. त्यांच्या मतानुसार नम्माळवार इथे अशी कबुली देत आहेत की आपण ईश्वराला ओळखत नाही आणि ईश्वरासंबंधी आपण जे काही लिहिले आहे ते ऐकीव गोष्टीच्या आंधळ्या अनुसरणाने दिले आहे.

निद्रा लाभणे शक्य तरी आहे काय ?'[४०]

या ठिकाणी किंवा जेव्हा ते ईश्वर हा प्रियकर हे प्रतीक सोडून देतात आणि त्याला माता, पिता म्हणून संबोधतात तेव्हा. जसे–

'शरीरात प्रवेश करणे,–
त्यात पाचरीप्रमाणे अडकणे, पुन्हा मुक्त होणे,–
अशी ही जीवात्म्याची धडपड अंत नाही तोवर चालते,–
म्हणून वाटेल ते करून योग्य वेळीच मी वळेन,–
त्या परमात्म्याकडे जो माझी माता आहे, पिता आहे,––
आणि जो मुक्तीचा दाता आहे.'[४१]

अथवा पूजाविधीचे सर्व प्रकार आणि सर्व धर्म ईश्वरानेच निर्मिले आहेत आणि सर्व देव ही ईश्वराचीच रूपे आहेत असे ते म्हणतात.[४२] तेव्हाही ही प्रतीकात्मता ते सोडून देतात. प्रतीक आणि ज्यासाठी प्रतीक वापरले तो विषय यांची सरमिसळ होणे; प्रतीकात्मतेचे म्हणूनही काही तर्कशास्त्र असते त्याच्या मर्यादेबाहेर प्रतीकाचा विस्तार करणे; मध्येच दुसरी प्रतीके घुसडणे, मध्येच एकाएकी प्रतीकांचा त्याग करून विषयात सरळ प्रवेश करणे, ही सर्वसाधारणपणे गूढवादी काव्याची लक्षणे आहेत. तिरुविरुतम ही लक्षणे स्पष्टपणे व्यक्त करते. संगम युगातील तामीळ कवींनी प्रीतीचे आदर्शीकरण करताना ज्या 'तुरईज'* अथवा घटना वापरल्या त्याच नम्माळवारांनी उचलल्या असतील आणि त्याच साच्यात स्वतःची गूढात्म आसक्ती ओतण्याचा प्रयत्न त्यांनी केला असेल अशी बरीच शक्यता आहे.[४३] कधी कधी ही आसक्ती या साच्यातून उतू जाते. कधी कधी हे साचेच, अनुभवाची जी परिपूर्ण अभिव्यक्ती प्रतीकातून व्हावयाची, तिच्यातच अडथळा आणतात. परंतु अस्सल गूढवादी कलाकृतीचा हा गुणधर्मच आहे. कुशल कलाकार आपल्या कलाकृतीतील सारे धागे अशा रीतीने एकत्र गुंफेल की ज्यायोगे बुद्धीचेही समाधान व्हावे आणि प्रतीकाचा हेतू तर्काला बाध न येता साध्य व्हावा. जलालुद्दिन रूमी यांनी म्हटले आहे, "ईश्वर हा सूर्य आहे. तर्कबुद्धी ही ईश्वराची छाया आहे. हुशारी म्हणजे फक्त मतप्रदर्शन, वावरलेपण ही अंतस्फूर्ती आहे."[४४] तिरुविरुत्तम हे अंतःस्फूर्तीतून जन्माला आलेले काव्य आहे.

---

(४०) तिरुविरुत्तम ९७. (४१) तिरुविरुत्तम ९५. (४२) तत्रैव ९६. (*तामीळ तांत्रिक शब्द). (४३) संगम युगातील प्रेमकवितांतील संकेतांशी नम्माळवारांनी स्वतःचा परिचय केव्हा आणि कसा करून घेतला ही गोष्ट वेद आणि उपनिषदांचे ज्ञान त्यांनी संपादले या सर्वमान्य गोष्टीप्रमाणेच एक कोडे आहे. (४४) पर्शियन गूढवादी. 'The Perennial philosophy' (Fontana Books Collins-London), Page 149. यात आल्डस् हक्स्ले यांनी दिलेल्या उद्धृतावरून.

## प्रकरण चौथे

# तिरुवासिरियम

'तिरुवासिरियम' हे ७१ ओळींचे काव्य आहे. या ओळी सात विषम विभागांत पुढीलप्रमाणे विभागलेल्या आहेत—पहिल्या विभागात पंधरा, दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या आणि सातव्या विभागात प्रत्येकी नऊ, पाचव्या आणि सहाव्या भागात प्रत्येकी दहा ओळी.

काव्याच्या पहिल्या पंधरा ओळींत परमेश्वराचा सर्वप्रथम दास या आदिशेषा-वर रेललेल्या प्रभूच्या गौरवाचे गुणगान आहे:—

'रक्तरेखांकित, झळाळणाऱ्या पाचूच्या पर्वताप्रमाणे,
चकचकीत लाल मेघांची वस्त्रे परिधान करणाऱ्या,
तेजस्वी सूर्य, शीतल धवल चंद्र आणि तारे
यांनी मंडित चूडामणी धारण करणाऱ्या,
पर्वताप्रमाणे —
हे सर्वश्रेष्ठ, अतुलनीय ईश्वरा,
सागराच्या लाटावर रेलून
तू सावधपणे पहुडतोस त्या आदिशेषावर —
त्याच्या विषारी फणा वाकलेल्या – विनम्र–!
तू खाली शांत विश्रांत.
तुझे माणकासारखे ओठ आणि कमलासारखे डोळे
वेष तुझा तप्तलाल सुवर्णाचा.
किरीट तुझा आणि अगणित रत्ने तुझी.
हे पद्मनाभा,
त्रिविक्रमा,
शंकर, ब्रह्मदेव आणि इंद्र,
सारेच देवगण,
अंजली बांधून पूजा करतात तुझी – तुझीच.'[1]

(१) तिरुवासिरियम – (ओळी) १–१५.

दुसऱ्या विभागातील नऊ ओळींत ईश्वराला संबोधून कवी म्हणतात की जे ज्ञाते आहेत ते पृथ्वीवरील ऐंद्रिय सुखासाठी परमेश्वराच्या भक्तीतील मधुरतेकडे कधीही पाठ फिरविणार नाहीतः--

'हे सृष्टिनिर्मात्या, प्रभो,
या साऱ्या विश्वाला
स्वतःचे ठायी सामावून घेणाऱ्या हे प्रभो,
जे ज्ञाते आहेत, ज्यांची दृष्टी निवळली आहे,
सोडून देतील का ते, --
तो मधुमधुर अमृताचा पूर —
उसळतो आणि खळाळतो जो तुझ्या भक्तीतून ?
उत्कंठेच्या आनंदातिशयात चैतन्यच विरघळून जात आहे.
अशा अवस्थेत --
सोडतील का ते तुझे चरण, --
नूपुरमंडित स्वयंप्रकाशी ?
नाही. ज्यांना आवडी आहे
ऐंद्रिय ऐहिकाची,
राहू देत ते खुशाल चिकटून त्यालाच.
पण जे ज्ञाते आहेत
ते सोडतील काय कधीतरी
तुझ्या भक्तीतील अवीट गोडी ?
ढुंकून तरी पहातील काय ते
त्या अमरत्वाच्या देणगीकडे ?
त्या त्रिभुवनाच्या आणि त्यातील साऱ्या वैभवाच्या
व्यामोहाकडे ?
अगदी नितांत मुक्ती देणाऱ्या त्या
चिरंतनाच्या ठायीच्या निवासाकडे सुद्धा ?'[२]

काव्याच्या तिसऱ्या भागात भगवान नारायणाने क्षीरसागराचे मंथन केले. या पौराणिक कथेचा संदर्भ चित्रदर्शी तपशीलांसह दिला आहे. ईश्वराच्या भक्तांची सदाकाल अविरत सेवा करता यावी असा वर नम्माळवार इथे ईश्वराजवळ मागत आहेत.--

' त्या तीनही देवांतून,
जो सर्वश्रेष्ठ,

(२) तिरुवासिरियम ( ओळी ) १६–२४

Indian Institute of Advanced Study
117029

ज्याच्यासमोर पूजेसाठी सारे विश्व विनम्र,
ज्याची स्तुती वेद गातात,
जो आपल्या आदेशांचे पालन घडवून आणतो,--
तो, तेजोरूप परमात्मा.
त्याने फणामंडित नागराजाची रज्जू करून
महासागरात पर्वताची रवी घुसळली.
आणि लाटा उसळल्या – पर्वतांसारख्या,
घनगर्जनांनी घडघडत,--
खूप दूरवर अथांग सागरात--
आणि महापर्वत भीतीने थरथरले.
तोच, अतुलनीय असा,
तो आम्हाला वरदान देईल का ?
त्याच्या भक्तांची सेवा करण्याचे ?
युगामागून युगे, अखंडितपणे ?
सदैव – आणि सतत --?'[३]

काव्य चौथ्या विभागात पुढे सरकते तेव्हा जो सृष्टिकर्ता आहे, जो सर्व जड-चेतनाचा मूळारंभ आहे त्या परमेश्वराची भक्ती करण्याची नम्माळवारांची इच्छा प्रकट होते.

सदैव, सदाचे, अखंडितपणे,
हे वरदान आम्हाला मिळेल काय,
ईश्वराकडे त्याच्या भक्तीसाठी वळण्याचे ?
आणि म्हणण्याचे, " तुझा सदैव विजय असो "?
जेव्हा हे विश्व नव्हते,
आणि नव्हती चेतना कुठेच,
तेव्हा अंधारलेली पोकळी असताना,
तो, आरंभाचाही जो आरंभ,
बीजांचे आदिबीज,
जे जे काही आहे त्या वस्तुमात्राचे–
त्यातून अंकुर प्रगटला, चतुर्मुख ब्रह्म्याच्या रूपाने,
कमलरूप अशा त्याच्या नाभीतून,
आणि त्याने दिले आम्हाला, शिवशंकर आणि सारे देव.
हा जो सर्वातीत असा प्रभू–

(३) तिरुवासिरियम २५–३३.

हे विश्वगूढ–
त्याच्या चरणांची सदैव, सदैव पूजा करण्याचे
हे वरदान आम्हाला मिळेल का !'[४]

पाचव्या भागात त्रिविक्रम अवताराचे वर्णन आहे. परमेश्वराने दोनच पावलांत पृथ्वी आणि आकाश कशी भरून टाकली, सारी जगेव कशी व्यापिली हे सांगून शेवटी असा प्रश्न विचारला आहे की जगाने दुसऱ्या कोणासमोर शरणागतीने नम्र व्हावे?–

'उलटया धरलेल्या कळीसारखा
एक पाय समतोल
सर्व पृथ्वी व्यापून
तिला झाकून टाकीत,
तिच्यावर विस्तारीत,
विश्वात्मक पुष्पाप्रमाणे उमलत.
आकाशाची पोकळी भरून टाकण्यासाठी
दुसरा पाय अंतरिक्षात विलसत–
ब्रह्मलोक आनंदविभोर, आश्चर्यमुग्ध,
आणि सर्व देव,
आपापली जागा ओळखून पूजेत मग्न,
तो प्रभू, सृष्टीचा महान मुळारंभ
उभा, धुंद कमलवनासारखा,
फुलासारखे त्याचे नेत्र
बिंबफळासारखे लाल ओठ टपोर
सहस्र किरीट, सहस्र सूर्य, सहस्र चंद्र,
सहस्र बाहू, कल्पवृक्षाच्या[५] अगणित राया.
असा तो अमर्याद, एकी एक परमात्मा
त्याला सोडून
विश्वाने कुणाला शरण जावे ?'[६]

पुढील विभागात, जो सृष्टीचा निर्माता आणि पालनकर्ता आहे त्याची अज्ञानाने वेढलेले जग कशी उपेक्षा करते आणि इंद्रियांच्या मृगजळात ते कसे गुरफटते हे वर्णिले आहे.–

---

(४) तिरुवासिरियम् ३४–४२. (५) अमर देवांचा निवास असणाऱ्या स्वर्गातील वृक्ष. हा सर्व इच्छा पूर्ण करतो अशी समजूत आहे. (६) तिरुवासिरियम–४३–५२

' अरेरे ! असे कसे हे जग !
ज्या आईने त्याला जन्म दिला,
ती अगदी सन्निध असताना,
शुष्क काष्ठाच्या तुकड्यावर ते अर्घ्य समर्पिते.
तो,–ज्याने निर्मिली, तोलून धरली,
आत सामावून टाकली आणि पुन्हा काढली–
ही सारी विश्वे–
तो सर्वज्ञ, पालनकर्ता
आदिकारण, अनुभवातीत परमात्मा
वाट पहात असताना
दुसऱ्या अनेकविध देवांकडे वळणे–
विकृत अंधत्वात आनंद मानणे, ते अंधत्व मिरवणे,
हत्या करणे, दुराचारात बुडून जाणे
आणि जन्ममरणाच्या अनंत जाळ्यात गुरफटणे,
इंद्रियसुखांचा दाट अंधार,
त्यातच लोळत पडणे–
अरेरे ! कसे हे जग !'[७]

काव्याच्या शेवटच्या विभागात प्रलयाचे वर्णन आहे. या विलयाच्या दिवशी सारी जगे, सारे देव, सारे वस्तुजात परमेश्वराकडे आकर्षिले जाते.–

' थंडगार चंद्राला धारण करणारा,
जटाजूट झालेल्या स्वत:च्या झुलपात.
आणि तो चतुर्मुख देव
आणि सर्व देवांचा राजा
वेलीच्या पागोऱ्याप्रमाणे सजोम,
आणि पृथ्वी, आप, तेज, वायू,
अग्नितेज सूर्य आणि चंद्र यांसह अंतराळ,
सारी विश्वे, सारे चैतन्य, सारे वस्तुजात,
ही त्याच्याकडे आकर्षित झाली.
त्या परमात्म्याने त्यांना स्वत:मध्ये लपवून ठेवले.
आणि पहुडला तो वटवृक्षाच्या पर्णावर–
अनाकलनीय गूढ–
आम्ही कधीतरी वळू का,

(७) तिरुवासिरियम ५३–५६.

दुसऱ्या देवाकडे, त्याला सोडून ?'[८]

हे काव्य लहानसें असले तरी कल्पनाविलासाने समृद्ध आहे. नम्माळवारांची प्रतिभा इथे पुराणविद्येला उजळून टाकताना दिसते; ईश्वर नावाचे जे महान गूढ आहे त्यावरील त्यांची दृढश्रद्धा स्पष्ट होते.

(८) ति.वा. ६३–७१.

प्रकरण पाचवे

# पेरिया तिरुवंताती

पेरिया तिरुवंताती (पेरिया तिरु अंताती) हे काव्य सत्त्याऐंशी श्लोकांचे आहे. प्रत्येक श्लोक तामिळमधील 'वेन्बा' या चार ओळींच्या असणाऱ्या वृत्तात लिहिला आहे. या काव्याला पेरिया तिरुवंताती हे नाव का पडले, याचा खुलासा पूर्वीच केला आहे.

या काव्याच्या कोणत्याही दोन श्लोकांत तार्किक संगती शोधणे कठीण होईल. त्यातून काही फायदाही होणार नाही. तरीही धर्मशास्त्राला तसे करावेसे वाटेल व त्याने तसा प्रयत्नही केला आहे. प्रत्येक श्लोक हे एक स्वतंत्र भावगीत मानता येईल. प्रत्येक भावगीत हे एक मुक्तक आहे. नम्माळवारांची एकेक भाववृत्ती अथवा त्यांच्या आध्यात्मिक प्रगतीची एकेक अवस्था एकेका गीतात आविष्कृत झाली आहे तरीही या सर्व मुक्तकामध्ये आंतरसंबंध आहेच. ईश्वराविषयीची प्रीती, त्याच्या शोधासाठी धडपड, त्यात आलेली विफलता आणि या प्रीतीच्या प्रवासात शेवटी लाभलेले यश हाच त्या सर्वांचा एकमात्र विषय असल्याने त्यांचा परस्परांशी तसा संबंध आहेच.

या काव्यातील बरेचसे श्लोक नम्माळवारांनी स्वतःच्या अंतःकरणाला उद्देशूनच लिहिले आहेत. त्यांतील काही पुढे दिले आहेत. त्यावरून हे स्पष्ट होईल की त्यांत निर्भीड आत्मनिंदा, अविश्वास येथपासून तो आत्यंतिक आनंद येथपर्यंत पसरलेल्या वेगवेगळ्या भाववृत्ती व्यक्त झालेल्या आहेत. पहिल्याच श्लोकामध्ये नम्माळवार ईश्वराची स्तुती करण्यात त्यांना सहकार देण्यासाठी स्वतःच्याच मनाला आमंत्रण देत आहेत.

' का अरे माझ्या मना
स्वतःच्याच भाराखाली पिचणारा तू
अजून माझ्या पुढेच का धावत आहेस?
ये. थांब जरा, मला सहकार दे.
आपण दोघे एकत्र मिळून रचना करू,
शब्दांची, ऐकायला कोमल आणि बोलायला रसाळ अशा
शब्दांची, परमेशाचे स्तोत्र गाणाऱ्या,
परमेश—जो 'काय'[१] फुलांसारखा घननीळ आहे.'[२]

---

(१) गर्द निळे वनफूल. (२)पेरिया तिरु. १.

ईश्वराकडे पोहोचण्यासाठी आपल्याला एवढी उताविळी का लागलेली आहे याचे नम्माळवारांनाच आश्चर्य वाटते.

'अमरांच्या पुढे आम्ही कोण ?
ते आठ वसू,
ते अकरा रुद्र,
ते बारा आदित्य,
तेही प्रभूचीच ना पूजा करतात ?
त्या प्रभुप्राप्तीचा विचार करणे–
केवढे हे पाप ?
मना, सज्जना, तुझ्या लक्षात तरी येते का
आमचा स्वार्थ किती आत्मश्लाघी आहे ?'[३]

मनाच्या चंचलतेविषयी नम्माळवारांना चिंता वाटते.–

'कोण आहे ते सतत प्रयत्नशील–
दुःख आणि वेदना यांच्या गर्तेत मला खोल खोल लोटून देण्यात–
माझ्या मना, तूच, तूच आहेस ते.
तुला उपदेश करण्यात फायदा तरी काय ?
तू चंचल आहेस. तामसी आहेस. माझे केव्हाही ऐकणार नाहीस.
अरे, य. जरा त्या प्रभुचरणाची महती जाण.
आता कसे ! आपण करण्यासारखी एवढी एकच गोष्ट आहे.'[४]

कधी नम्माळवार स्वतःच्या मनाला धीर देतात. ईश्वराची स्तुती गाणारे शब्द कितीही दुबळे असले तरी त्यामुळे ईश्वराचे अनंतत्व कमी होत नाही.–

'माझ्या मना आधी हे जाण की–
तो सर्वज्ञ, नेत्र मिटून सागरावर पहुडला आहे.
गरजणाऱ्या लाटा त्याच्या चरणांना आलिंगन देत आहेत.
तूही आपल्या वेदनांना विसरून,
पुन्हा आणि पुन्हा त्याचे स्तुतिगीत गाऊ शकतोस.
खुळ्या, तुझी का अशी कल्पना आहे,–
की आपले क्षुद्र शब्द त्याच्या महत्तेला झीज आणतील ?'[५]

कधी नम्माळवार स्वतःच्या मनाला सांगतात की कधी कधी टिंगल करण्यासाठीही का असेना, पण नेहमी ईश्वराचेच नाव घ्यावे.–

'माझ्या मना एक क्षणभरही थांबायला अवसर नाही.

---

(३)पेरिया तिरु. १०. (४)तत्रव १२. (५) तत्रैव १५.

हवे तर तू प्रभूची निंदा करू शकतोस.
हवे तर हसूही शकतोस
विश्वगूढाच्या त्या अधिनायकाला–
सुगंधी तुळसीची माला धारण करणारा तो–
त्याला कसा चोप दिला होता.–
एका गवळणीने ?
पण प्रभूची निंदा करतांनाही तू मागेच राहातोस.
हाच तुला शाप आहे.'[६]

प्रभुकरुणा अजून आपल्यापर्यंत पोहोचली नाही याचा नम्माळवारांना कधी खेद होतो.–

'मुक्या गाईचे[७] सुद्धा संरक्षण करण्यासाठी
प्रभूच्या करुणेने गोवर्धन पर्वत उंच उचलला
मग आता असे का ?
त्याला कळवळा येतच नाही–
तो दर्शन देतच नाही–
जरी दररोज सारा दिवस मी त्याची करुणा भाकीत उभा आहे.
माझ्या मना, ज्या पृथ्वीवर आपण राहातो,
ती एवढ्या चढाची आहे काय
की प्रभूची करुणा सुद्धा वर वाहून येऊ शकत नाही ?'[८]

नम्माळवार म्हणतात, मानवाचा निवास असणारे हे जग सुंदर आहेच, पण प्रभूचा निवास असणारे जग त्याहूनही सुंदर आहे–

' सुखी असतात ते दिवस, मैत्रीच्या आस्वादात संपणारे
सुखीच असतात ते दिवस, वंशाला शाखोपशाखात विस्तारणारे
बांधवांचा स्नेह मिळतो तेही दिवस सुखाचेच,
सुखाच्याच त्या सुविधा, थोर कुळातील जन्माने लाभणाऱ्या,
माझ्या मना सज्जना, तरीही,
प्रभूच्या कीर्तनाची अवीट गोडी तू चाखच.
तोच प्रभू, जे त्याच्यावर भक्ती करतात, त्यांच्या रक्षणाला
ज्याचे धनुष्य सदैव सज्ज असते.'[९]

चित्ताने सदैव ईश्वराच्या स्तुतीतच विलीन असण्याचा प्रयत्न करावा अशा

---

(६) पे.ति. ३८. कृष्णाला त्याची आई यशोदा हिने त्याच्या खोडकरपणासाठी चोप दिला होता त्याचा संदर्भ. (७) कृष्णावतारात. (८) पेरिया तिरु- ७४.
(९) तत्रव ७८.

विनवणीत या काव्याचा शेवट होतो. परतु काव्याच्या आरंभी नम्माळवारांनीच कबूल केल्याप्रमाणे स्वत:च्या चंचल चित्ताला ईश्वराकडे नेणाऱ्या अरुंद वाटेवरून सरळ चालविण्यात ते यशस्वी झाले असावेत असे दिसते :–

‘ अहो, आमचे एकमत झाले, माझे आणि माझ्या मनाचे,–
त्या आमच्या घननीळ प्रभूच्या,–
करुणेच्या मदतीने झोडपून काढले आहे आम्ही,
आमच्या साऱ्या चांडाळ पूर्वकर्माला–
आणि पिटाळून लावले आहे त्याला अज्ञातात–दूर.’[१०]

या काव्यात चित्ताला हलवून सोडणारी परमेश्वराला केलेली आवाहनेही आहेत :—

‘ हे प्रभो, सांग आम्हाला,–
आमचे काय करावे,-
असा तुझा विचार आहे ?
‘ चालता हो आल्या वाटेने ’ असे तू सांगणार काय ?
आणि फिरविणार पाठ आमच्याकडे ?
की आंब्याच्या पालवीसारखे तेजझळाळ असे तुझे रूप
आमच्यासमोर साक्षात् करणार ?
आम्हाला ते माहीत नाही.
तू आमचे काय करावयाच्या विचारात आहेस –
हे काळाच्या आरंभापासून कधीच आम्हाला समजलेले नाही.
जी काही तुझी इच्छा असेल –
ती आम्ही सोसूच, नाही का ?’[११]

सन्मार्ग अनुसरण्यासाठी जो निर्धार पाहिजे तो नाही. यामुळे नम्माळवारांना अगतिक वाटते :–

‘ हे प्रभो, असे काय आहे, जे मी करू शकेन ?
चांगले काय आणि वाईट काय हे मला कळते.
पण एकाला अनुसरणे आणि दुसऱ्याला झिडकारणे,
हे माझ्या शक्तीबाहेरचे आहे
मग मी करू तरी काय ?’[१२]

परमेश्वर हा आपल्या आवाक्या बाहेर आहे हे समजल्यावरही नम्माळवारांचे प्रेम प्रभूकडे धाव घेते.–

---

(१०) पेरिया तिरु. २६. (११) तत्रव ६. (१२) तत्रैव ३.

'हे प्रभो, तुझी अपार करुणा हे एक मादक पेय आहे,
आमच्या डोळ्यांना गोचर न व्हावा असा सूक्ष्म आहेस तू,–
पातकीच आहोत आम्ही.
तुला जवळ कसे करावे हे,
आणि तुजकडे जाण्याचा मार्ग कोणता, हेही आम्ही जाणत नाही.
तरीही भरतीच्या लाटांनी उसळत आमचे प्रेम तुजकडे धावते,
ते कसे? का? एवढे आम्हाला सांग!'[१३]

ईश्वराने आपल्याला विसरू नये एवढे एकच वरदान नम्माळवार त्याच्याकडे मागतात ––

"हे प्रभो, तुझा महिमा अगाध आहे.
तुझ्या करुणेतच मी परिपक्व झालो.
मला हरवून बसलो.
माझी तुला प्रार्थना आहे की –
आता बदलू नकोस.
मला जन्मचक्रातून मुक्ती नको,
मला स्वर्गात तुझा दासही व्हायचे नाही.
मला हे फक्त इतुकेच वैभव हवे,
की 'तुझा विसर न व्हावा.'"[१४]

काव्यात जरी अनक ठिकाणी नम्माळवार स्वतःची वेदना आणि वरकरणी निष्फळ भासणारा सत्‌चा शोध याविषयी बोलत असले, तरी, परिपूर्तीचा आनंद दर्शविणारे काही श्लोकही आहेत,–

'जेव्हा मी पाहातो फुले –
'पूवई', 'काय', 'नीलम' आणि 'कावी'ची.
तेव्हा, मी अपात्र असलो तरी,
माझी चेतना आणि माझे शरीर
थरारते आणि विकसित होते
गर्वाने आणि हर्षाने
की ही सारी, अखेर त्या प्रभूचीच रूपे आहेत.'[१५]

नम्माळवार म्हणतात, "हे पुरेसे आहे. स्वर्ग हे ईश्वराचे अंतिम वरदान असले तरी ईश्वराची भक्ती हीच मला त्याच्यापेक्षाही बहुमोल वाटते."[१६]

---

(१३) पे. ति. ८. परमेश्वराची मनुष्यावरील करुणा सतत वाढतीच असते असा याचा दुसरा अर्थ लागतो. (१४) पेरिया तिरु. ५८. (१५) तत्रैव ७३. (१६) तत्रैव ५३.

'स्तुतीला मजहून अधिक पात्र असा कोण आहे ?
कुणाची स्तुती अधिक पात्र असू शकेल ?
मी माझे चित्त सर्वस्वाने समर्पित केलेले आहे.–
त्या प्रभूला, सागरासारख्या घननीळ अशा,
त्याच्या अपार आणि अज्ञात करुणेला,
त्याच्या महिम्याला.'[१७]

नम्माळवार सांगतात की त्यांच्या या प्रेमभक्तीचे भरपूर फळ त्यांना मिळाले. ते म्हणतात, "आला, तो प्रभू माझ्या चित्तात आला. ज्याची इच्छा धरावी असे आता काही राहिले नाही."

'तो स्वर्गीय गुराखी,–
आमच्यापासून इतका दूर,–
इतकी नानाविध रूपे धरणारा,–
की कुणाला जवळची ओळखच पटू नये
तो, अमर्याद गूढरूपी
ज्याने अति पुरातनकाळी
स्वतःच्या पावलांनी विश्व भरून टाकले
तो आज मजकडे आला,
हे घडले कसे नकळे,
आणि जीवन आनंदमय जाहले.'[१८]

कधी नम्माळवारांना आश्चर्य वाटते की परमेश्वर मोठा को आपणच मोठे.–

'ही पृथ्वी आणि दूर विस्तारात झोकलेले आकाश
ही सामावली आहेत, हे प्रभो, तुझ्यात.
पण तू माझ्या कानातून प्रवेश करून,
माझ्या चित्तात शिरला आहेस, त्यात सदासाठी सामावला आहेस.
पातक्यांच्या रक्ताची चटक असणाऱ्या, हे प्रभो,
हे चक्रधरा, आता याचा विचार कर.
तू आणि मी – यांत अधिक मोठा कोण ?
हे कोण जाणू शकेल ?'[१९]

व्याप्ती आणि मर्मस्पर्शी गुणवत्ता या दृष्टीने पेरिया तिरुवंताती हे काव्य, नम्माळवारांच्या तिरुवायमोळी या सर्वश्रेष्ठ ग्रंथाचा संक्षेपच आहे.–

(१७) पेरिया तिरु. ४. (१८) तत्रैव ५५. (१९) तत्रैव ७५.

प्रकरण सहावे

# तिरुवायमोळी

'तिरुवायमोळी' हे नम्माळवारांचे सर्वांत मोठे आणि अत्यंत महत्वाचे काव्य आहे. असे सांगतात की हे काव्य आणि आळवारांचे इतर ग्रंथ या साऱ्यालाच जग मुकले असते. परंतु नवव्या शतकातील वीरनारायणपुरम[1] येथील महान वैष्णव आचार्य श्री नाथमुनी यांच्या प्रयत्नामुळे ते हाती लागले. पारंपरिक कथेनुसार दोन व्यक्ती दक्षिणेतून नाथमुनींच्या मूळ गावी आल्या असता तिरुवायमोळीचे अकरा श्लोक[2] त्या पठण करीत असतांना नाथमुनींनी ऐकले. त्या श्लोकांनी ते मोहून गेले आणि सर्व ग्रंथ मिळविण्याची खटपट त्यांनी सुरू केली. ते कुरुहूर[3] येथे गेले. तिथे त्यांना नम्माळवारांच्या स्तुतिपर अकरा कडवी[4] फक्त मिळाली. आरंभी त्याहून जास्त काहीच मिळाले नाही. तेव्हा नाथमुनींनी या काव्याचा सतत पाठ आरंभिला. शेवटी त्यांना नम्माळवारांची सर्व काव्ये दृष्टांतरूपाने प्राप्त झाली. एवढेच नाही तर आळवारांची सारीच काव्ये त्यांच्या अंतःकरणात प्रकटली. त्यांनी या सर्व काव्यांना संगीताची जोड दिली. आणि विष्णुमंदिरातून ती गाइली जाण्याची व्यवस्था केली. ही परंपरा आजही चालू आहे. फरक एवढाच की आज श्लोक नुसते म्हटले जातात, गाइले जात नाहीत.

श्री नाथमुनी यांच्या काळापासूनच तिरुवायमोळी या ग्रंथाला नम्माळवारांच्य सर्व ग्रंथांत आणि इतर आळवारांच्याही ग्रंथांत सर्वश्रेष्ठ मानाचे स्थान लाभले आहे. नाथमुनींनी या काव्याचे स्वागत तामिळ भाषेतील वेदसागर असे केले आहे. सारी उपनिषदे आणि त्यांच्या हजारो शाखा तिरुवायमोळीमध्ये समाविष्ट आहेत. श्री रामानुजांनी वेद आणि गीता यांचा अर्थ लावताना तिरुवायमोळीचा आधार घेतला आहे हे अनेकांनी मान्य केले आहे. श्री पिल्लइ लोकाचार्य[5] यांनी त्यांच्या 'श्रीवचनभूषणम्'[6] मध्ये नम्माळवारांचा उल्लेख आदरपूर्वक केला आहे. श्री वेदांत

---

(१) दक्षिण अर्कोट जिल्ह्यात चिदंबरमजवळ. श्री नाथमुनी हे श्री रामानुजांचे पूर्वाचार्य म्हणून नामांकित आहेत. (२) तिरुवायमोळी, ५.८. (३) सध्याचे नाव आळवार तिरुनगरी. हे तिरुनेलवेली जिल्ह्यात आहे. (४) 'कण्णि णुण चिरु-तांबू' हे काव्य आळवार मधुरकवी यांचे आहे. नाथमुनींना ते परांकुशदासार यांच्याकडून मिळाले. (५) तेराव्या शतकातील वैष्णव उपदेशक. (६) श्री वचनभूषणम् ४५–५०.

देशिक[७] तिरुवायमोळींला तामिळ उपनिषद् म्हणतात. त्यांनी त्याच्यावर दोन संस्कृत ग्रंथ[८] लिहिले आहेत. त्यांतील एकात[९] ते म्हणतात की तिरुवायमोळी ग्रंथ तामिळमध्ये असल्याने विशेषतः फार महत्त्वाचा आहे. कारण त्यात व वेदात फरक असा की तो सर्वांना समजू शकतो. श्री अळगिय मणवाळ पेरुमाळ नायनार[१०] त्यांच्या आचार्य हृदयम्मध्ये हेच मत मांडतात. 'हे मातीचे मडके नाही; तर सुवर्णाचा कुंभ आहे'[११] या उक्तीचा आशय असा की मातीचे मडके एकदा एका विशिष्ट कामासाठी वापरल्यावर पुन्हा दुसऱ्या कामासाठी वापरता येत नाही. कारण ते कलंकित होते (अशी त्या काळी समजूत होती). तिरुवायमोळीचे तसे नाही. कारण जातिबंधनाचा विचार न करता हा ग्रंथ कुणालाही वाचता येईल. आणि सदैव ताजा, चकचकीत आणि निष्कलंक राहील. श्री माणवाळ मामुनी या दुसऱ्या थोर वैष्णव आचार्यांनी तिरुवायमोळीच्या एकेका कांडासाठी एकेक तात्पर्य रूप 'वेन्बा' असे शंभर 'वेन्बा' लिहून त्या ग्रंथाबद्दल आपला आदर व्यक्त केला आहे. या ग्रंथावर अनेक विद्वत्ताप्रचुर टीका आहेत. त्यांच्यामुळे वैष्णव पंथाच्या धार्मिक विद्वानांमध्ये या ग्रंथाची केवढी मोठी प्रतिष्ठा आहे ते उघड होते. या टीकांतील एक, श्री रामानुजांच्या मार्गदर्शनाखाली, त्यांचेच एक समकालीन तिरुक्कुरुगै पिरान पिल्लान यांनी लिहिली होती. इतर टीकांमध्ये श्री नामपिल्लाई[१२] यांची टीका अधिक परिश्रमपूर्वक लिहिलेली आहे. या टीकेला 'भगवत् विषयम्' (ईश्वरासंबंधीचा विषय) म्हणून ओळखतात–जणू काय तिरुवायमोळीमध्ये केवळ भगवानाचेच वर्णन आहे! दक्षिणेकडील वैष्णवांमध्ये तिरुवायमोळीला जी श्रेष्ठ प्रतिष्ठा आहे तिची कल्पना इतक्या उदाहरणांवरून येऊ शकेल.

आता आपण प्रत्यक्ष ग्रंथाकडे वळू या. ग्रंथात चार चरणांचे, वेगवेगळ्या वृत्तांतील ११०२ श्लोक आहेत. या श्लोकांना 'पासुरम्' असे म्हणतात. हे पासुरम् अकरा–अकरांच्या गटाने योजले आहेत. तेरा श्लोक[१३] असलेला एक गट याला एकमेव अपवाद आहे. प्रत्येक गटाला 'तिरुवायमोळी' म्हणतात. असे दहा गट एकत्र झाल्यावर त्याला 'पत्तु' म्हणतात. एकूण तिरुवायमोळी ग्रंथात दहा पत्तु, शंभर तिरुवायमोळी आणि ११०२ पासुरम् आहेत.

'सत्च्या शोधात', 'नम्माळवारांचे काव्य', 'नम्माळवारांचे तत्त्वज्ञान' या

---

(७) तेराव्या शतकाचा उत्तरार्ध आणि चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध यांतील वैष्णव उपदेशक. (८) द्रामिडोपनिषत्सारम् व द्रामिडोपनिषत्तात्पर्यरत्नावली. (९) तात्पर्य रत्नावली, श्लोक ४. (१०) श्री पिल्लइ लोकाचार्य यांचा धाकटा भाऊ. (११) आचार्य हृदयम् १–७३. (१२) तेराव्या शतकाच्या आरंभीचे आचार्य त्यांची टीका 'ईडु' (छत्तीस हजार) या नावाने ओळखली जाते. (१३) तिरुवायमोळी २–७.

इतर प्रकरणांतून तिरुवायमोळीतील काही भाग अनुवादरूपाने आलेला आहे. उरलेला काही भाग या प्रकरणात अंतर्भूत आहे.

ज्यांना मुद्राश्लोक म्हणता येतील असे शंभर श्लोक तिरुवायमोळीत आहेत. त्यातील प्रत्येक श्लोक तिरुवायमोळीचा शेवटचा श्लोक आहे. या श्लोकांत नम्माळवारांचा उल्लेख ग्रंथकार म्हणून येतो, तसेच जे ग्रंथाचा अभ्यास करतील त्यांना मिळणाऱ्या फलांचाही उल्लेख येतो. स्वतःची नाममुद्रा असलेला श्लोक शेवटी जोडणे ही पद्धत त्यावेळच्या काही धार्मिक आणि भक्तिपर कवींमध्ये रूढ होती असे दिसते. नम्माळवारांनी त्याच रूढीचे अनुसरण केले असावे.[१४]

काव्याच्या एकूण सुराशी आणि आत्म्याशी या सर्वच मुद्राश्लोकांचा संवाद जुळतो काय, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. काही श्लोकांचा असा संवाद जुळतो. उदाहरणार्थ, ज्या ठिकाणी नम्माळवार स्वतःचा उल्लेख परमेश्वराच्या दासांचा दास असा करतात,[१५] ते श्लोक संवादी आहेत. काही श्लोक विसंवादी आहेत. याचा एकच खुलासा शक्य आहे. प्रत्येक तिरुवायमोळी किंबहुना तिच्यातील प्रत्येक श्लोक हे त्या त्या वेळच्या भावावस्थेला यदृच्छया लाभलेले तत्कालरूप आहे. एकेका तिरुवायमोळीची रचना एकेका बैठकीत झाली की कसे, हेसुद्धा आपणास ठाऊक नाही. त्यांची व्याप्तीही अगदी अंधारात चाचपडणाऱ्या मनाच्या नैराश्यापासून ते थेट साक्षात्काराच्या परमानंदात परिणत होणाऱ्या मानसोल्लासापर्यंत आहे. शिवाय काव्यातील श्लोक एकापाठोपाठ एक इतक्या अनपेक्षितपणे येतात की वरकरणी त्यांच्यात कोणताही परस्परसंबंध दिसत नाही. सर्वसामान्य तर्कबुद्धीला धक्के देत आणि झुकांड्या देतच हे काव्य समोर येते.

काही तिरुवायमोळी वस्तुनिष्ठ आहेत. नीत्युपदेश हा त्यांचा उद्देश आहे. लोकांना ऐहिकापासून परावृत्त करणे आणि सत्च्या अस्तित्वाकडे वळविणे हे त्यांचे साध्य दिसते. सनातन परंतु सामान्यांना न समजलेली अशी काही सत्ये त्यात येतात. ऐहिक जीवनाची क्षणभंगुरता, दृश्य विश्वाची इंद्रियांवर चालणारी सत्ता, आत्म्याच्या शोधाबाबत ऐहिकाची असमर्थता, ईश्वराची करुणामयता, ममता आणि चिरंतन सौंदर्य यांकडे वळण्याची अपरिहार्य निकड—ही ती सत्ये होत. यांची काही उदाहरणे अशी :–

'जिवंत असणारी माणसांची शरीरे
विजेच्या लोळाहूनही जास्त अस्थिर आहेत.'[१६]
'त्याग करा; सर्वस्वाचा त्याग करा

---

(१४) तिरुवायमोळी व तिरुविरुत्तम या नम्माळवारांच्या दोनच ग्रंथांत मुद्राश्लोक आहेत. तिरुवासिरियम आणि पेरिया तिरुवंताती या त्यांच्या दुसऱ्या दोन ग्रंथांत ते नाहीत. (१५) तिरुवायमोळी ६–९–११; ७–१–११ आणि ८–९–११. (१६) तत्रैव १–२–२.

आणि सर्व काही सोडून दिल्यावर
जो मुक्तीचा अधिष्ठाता आहे त्या प्रभूला
तुमचा आत्मा समर्पित करा.'[१७]
'तुम्ही आणि तुमचे
याचा शाखामूलासह नाश करा
आणि ईश्वराकडे वळा.
आत्म्याला याहून मोठी परिपूर्ती नाही.'[१८]
'जे ते शब्दब्रह्म जाणतात
त्याच्यापासून स्रवणाऱ्या कल्याणाचे चिंतन करतात
आणि निर्मळ दृष्टी प्राप्त करतात;
ते मान्य करतील का शरण जाणे
आत्मसमर्पण करणे;
त्याला सोडून अन्य कोणाच्याही चरणी?
गूढस्वरूप तो—
जो दूर करतो—
जन्म–जरा–व्याधी–मृत्यू
उखडून टाकतो सारी वेदना
आणि ओढून घेतो आम्हाला आपल्या चरणाशी.'[१९]
'काय हा संसार!
मरणे, खाली खाली जाणे–
जे सगेसोयरे त्यांच्यासह
कोंडाळे करून रडत, भ्रमनिरास करून घेत–
अरेरे! काय हा संसार!'[२०]

ही जाणीव या संसारातून सोडविण्यासाठी या संताने ईश्वरासाठी फोडलेल्या टाहोमध्ये परिणत होते:—

'ईश्वरा, कळत नाही मला की बाहेर कसे पडावे
तू शेषावर पहुडला आहेस–
धाव, प्रभो मजकडे धाव.
मला तुझ्या चरणी घेऊन जा.'[२१]

---

(१७) तिरुवायमोळी १–२–१. (१८) तत्रैव १–२–३. (१९) तत्रैव ७–५–१०.
(२०) तत्रैव ४–९–२. (२१) तत्रैव ४–९–२.

इंद्रियानुभवांचा आनंद मर्यादित असतो. क्षुद्र असतो. नम्माळवार म्हणतात 'मी त्यांचा त्याग केला आहे. ईश्वराचे अपरिमित सौंदर्य पाहाण्याचा सर्वश्रेष्ठ आनंद मला हवा आहे.'

'पाहाणे, ऐकणे, अवधाण करणे, स्पर्शणे, खाणे—
यांचे अनंत भासणारे पण प्रत्यक्षात क्षुद्र असे आनंदानुभव
—त्या सर्वांचा मी त्याग केला आहे.
मी पाहिले आहे प्रभू, तुला आणि तुझ्या सहचरीला
तेजोमय—आनंददायी—अशा तिला
आणि पोहोचलो आहे येऊन तुझ्या चरणाशी.'[२२]

कधी कधी इतरांना उपदेश करता करता वरीलप्रमाणे कवी एकदम स्वतःच्या वेदनांकडे वळतो हे लक्षणीय आहे. अशा वेळी वस्तुनिष्ठेचे रूपांतर उत्कट भावाविष्कारात होते.

अशा अनेक भावकाव्यांचे संकलन म्हणून तिरुवायमोळीचा विचार करता येणे शक्य आहे. यांतील एकेक काव्य म्हणजे नम्माळवारांना परमेश्वर—भेटीची जी तळमळ लागली होती तिची एकेक भावावस्था, एकेक विभ्रम होय. ही ओढ ईश्वराकडे झेपावते. त्यातील एकेक उद्रेक 'सत्‌च्या शोधात' या प्रकरणात ग्रथित आहेत. त्यांचा भावाविष्कार द्विविध आहे. कधी ते सरळ स्वतःविषयी बोलतात तर कधी प्रतीकाच्या माध्यमातून. प्रत्यक्ष भावाविष्काराकरता पुढील काव्यपङ्क्ती उदाहरण म्हणून सांगता येतील :—

'हे प्रभो, या पाचांना तू धाडतोस—या इंद्रियांना—
तेव्हा तुला काय मिळते ?
ती माझ्यावर आदळतात, मला छळतात
आणि तुझ्या चरणाकडे येण्यास मला प्रतिबंध करतात.'[२३]
'तोच, ज्याने सप्तलोकांचा घास गिळला,
तो स्वतःहून माझ्याकडे आला आहे.
आनंदाने तो माझ्या अंतरात आहे. कधीही तेथून ढळणार नाही.
आता मला काय असाध्य आहे ?'[२४]
'मी सांगतो, जे अमर देव त्यांचाही तो प्रभू आहे
पण याने तरी महत्तेचे मापन कसे होईल ?
तिरुवेंगडमला निवास करणाऱ्या त्या प्रभूचे ?
नीचातला अतिनीच असा मी—

(२२) तिरुवायमोळी ४–९–१०. (२३) तत्रैव ७–१–३. (२४) तत्रैव २–६–७.

गुणहीन, एक प्राणी.
तरीही उंचाहूनही उंच असा तो तेजोनिधी
मला प्रेमभराने सन्मुख होण्याचे ठरवतो'–[२५]
'तो प्रभू, तुलनेच्या पलीकडे असणारा,
माझे मन त्याचे चिंतन कधीही सोडणार नाही
माझी जिव्हा सदैव त्याचेच कीर्तन करील.
आणि त्याने झपाटलेले माझे शरीर–
नाचत राहील.'[२६]
'हे प्रभो, तू आलास;
माझ्या अंतरात खोलवर मिसळून गेलास.
मी माझे समर्पण तुझ्या चरणी केले आहे.
आणि आता मला परतणे नाही.
'आत्मसमर्पण' एवढेच मी तुला देऊ शकतो–परतफेड म्हणून
पण माझे जीवन म्हणजे तरीं काय ? मी तरी कोण ?
तूच तर दिलेस आणि तूच परत घेतलेस–
त्याला योग्य आकार देण्यासाठी.'[२७]
'तो परमेश्वर मायाजाल विणीत असतो.
आकाशासारखी खोल आणि त्याहून विस्तारलेली माया
देवांच्याही दृष्टीपुढे तो भ्रम निर्माण करतो–
तोच. सांद्र मेघासारखा निळा.
कधीच विसरणार नाही मी
त्याची कमलपदे, विश्वापल्याड पोचून जी उरतात–
वेड्यासारखा मी त्यांचे गीत गाईन–न थकता–
त्यांनाच कवटाळीन,
त्यांचीच पूजा करीन–अविरत उत्कंठेने.'[२८]
'माझे अंतःकरण हाच चंदनलेप आहे–
प्रभूने सर्वांगी उटलेला–
माझे शब्द आहेत त्याची वैजयंतीमाला
आणि त्यानें नेसलेला भरजरी पितांबरही.
आणि माझे जोडलेले हात, ते आहेत त्याच्या–
तेजस्वी अलंकारातील रत्ने.'[२९]

---

(२७) तिरुवायमोळी २–३–४. (२६) तत्रैव १–६–३. (२५) तत्रैव ३–३–४.
(२८) तत्रैव १–३–१०. (२९) तत्रैव ४-३-२.

'प्रभो, तुझ्यासाठी मी नाही आणीत–
शीतलस्पर्शी फुलांचा हार.
त्याशिवायच मी तुझी पूजा करतो.
तरीही–भगवंता, तरीही–
तुझ्या मुकुटावरील पुष्पमाला
हे माझे जीवन आहे.'[३०]

वर उल्लेखिलेल्या तिरुवायमोळीमध्ये नम्माळवार स्वतःविषयी सरळ प्रथम-पुरुषी उल्लेख करीत आहेत. दुसऱ्या अनेक तिरुवायमोळयांतून प्रतीकात्मकतेने आत्माविष्कार करण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. नम्माळवार आपल्या तत्त्वज्ञानात त्यांचा उपयोग करतात. त्यामुळे त्या प्रतीकांना जी प्रतिष्ठा प्राप्त होते तिचा आणि नम्माळवार त्याची योजना कशा पद्धतीने करतात त्याचा विचार याच ग्रंथात अन्यत्र केलेला आहे. 'तिरुवायमोळी'तील प्रतीकात्मकतेच्या एका अंगाकडे येथे लक्ष वेधता येईल. परमात्मा हा प्रियकर आणि त्याच्या दर्शनासाठी झुरणारा जीवात्मा ही त्याची प्रेयसी हे प्रमुख प्रतीक आहे. अवतार घेऊन ईश्वर पृथ्वीवर उतरला तेव्हा स्त्रियांनी त्याला प्रियकर मानल्याची उदाहरणे नम्माळवारांना इतिहास आणि पुराणे यांत मिळाली. नम्माळवार स्वतःला त्या स्त्रियांच्या रूपांत पाहातात. उदाहरणार्थ गोकुळांतील गोपाळांच्या स्त्रिया असणाऱ्या गोपी ईश्वरावरील परमोच्च प्रीती करणाऱ्या स्त्रियांचा मूळ अस्सल आदर्श होत. पुढील गीतातून नम्माळवार याच गोपींतील एकीच्या रूपाने, परमेश्वराच्या विरहामुळे जाणवणारी आगळी व्यथा व्यक्त करतात :–

'वेळूसारखे माझे स्कंध
आता रोडावले, लुळे पडले.
जुगणारे कोकिळ-युगल कुंजातून कुहू घालू लागले,
त्यांना नाही फिकीर माझ्या झुरणीची–
माझ्या एकाकीपणाची–माझ्या कशाचीच.
मयूर–मयूरीही नाचू लागले
मीलनाच्या आनंदभरात.
मी करावे तरी काय ?
प्रभो, तू मला सोडून जात आहेस.
गाई–गुरांना राखायला दूर जात आहेस.
आता दिवस युगासारखा लांब होईल रे.
का विदीर्ण केलेस तू माझे हृदय ?

(३०) तिरुवायमोळी ४–३–४.

तुझ्या त्या कमलासारख्या मोहक डोळ्यांनी ?
आणि आता निघाला आहेस पशूंच्या मागे !
हे तुला शोभत नाही. मुळीच शोभत नाही.'[३१]
'तू माझ्या – संगत आहेस.
हे प्रभो, तुझ्यातील आनंदाचा महापूर
आभाळाची पोकळी भरून ओसंडत आहे;
आणि बुडाले आहे मी त्यात जाणिवांसह सर्वस्वाने.
अरेरे पण हे तर स्वप्नच; फक्त एक स्वप्नच !
तू जात आहेस
उत्कंठेचा आवेग पुन्हा उसळला आहे
ती मला खोलपर्यंत कुरतडत आहे.
नाही, नाही. माझी चेतना हे सोसू शकत नाही–
तुझे हे गाई–गुरांमागे जाणे !
ती सारी मरत का नाहीत ?'[३२]

याच्या पुढच्याच श्लोकाच्या शेवटी ही गोपी फक्त स्वत:चेच गाऱ्हाण सांगत नाही तर ईश्वरचरणी चित्त समर्पित करणाऱ्या साऱ्याच गोपींविषयी बोलते.–

'हे प्रभो, जर तू गुरांना चारण्यासाठी गेलास
तर मी मरेन.
माझा अंतरात्मा जळत आहे.
तरीही मी अजून जिवंत आहे – कारण तो चिवट आहे.
एकटीच आहे मी – निराधार.
तुझे घननीळ रुपडे डोळ्यासमोर मला वावरताना दिसत नाही
अनावर अश्रू डोळे भरीत आहेत.
सुळकांडणाऱ्या मासळीप्रमाणे नजर अस्थिर झाली आहे.
जेव्हा तू दूर असतोस तेव्हा दिवस कंटाळवाणा रेंगाळतो,
कधी संपतच नाही.
हा विरह म्हणजे आम्हा साऱ्यांना मरणच–
व्याकुळ, दीन, बापड्या–
क्षुद्र गवळ्यांमध्ये स्त्रिया म्हणून जन्मलेल्या
आम्हां साऱ्यांना. अरेरे !'[३३]

---

(३१) तिरुवायमोळी १०–३–१. कृष्ण गोकुळात गवळ्यांबरोबर राहात होते आणि त्यांच्याप्रमाणे गाईगुरे कुरणात नेऊन राखीत होते. (३२) तिरुवायमोळी १०–३–२. (३३) तत्रैव १०–३–३.

परमेश्वराने प्रियकराच्या रूपाने गोपींशी रात्री गुजगोष्टी केलेल्या असतात; त्या तिला आठवतात. ते स्मरण ही वेदना असते. संध्याकाळ ही तिला माजलेल्या हत्तीसारखी भासते आणि ती स्वतःला चिरडून टाकण्यासाठीच आली आहे असे वाटते. वारा जाईचा दाहक गंध उधळीत असतो. ती विव्हलपणे विचारते, 'हे मी कसे सोसू?' तिला वाटते तिच्याचसारख्या अनेकजणी त्याच्यावर प्रेम करीत असतील. (आणि का नाही? तो तर साऱ्या जीवात्म्यांचा प्रियकर आहे). आणि तो जिथे जाईल तिथे त्याची वाट पहात असतील. तरी ती म्हणते, "असूद्यात. पण इथे आम्ही अश्रू ढाळीत आहोत. आमची चित्ते तळमळत आहेत. नको ना — नको ना रे जाऊस. तुझे ते कुरणात जाणे म्हणजे आमची जीवने इकडे मेणासारखी वितळून जाणे." इतक्यात तिला एक शंका येते. आतापर्यंत ती फक्त आपल्याच दुःखाचा विचार करीत असते. आता तिला भीती वाटते की दूर रानात असुर जमा होतील आणि तिच्या प्रियकराला अपाय करतील. "नाही, नाही. त्याने मुळीच जाता कामा नये. त्याने माझ्याकडे पाठ फिरविली तरी चालेल. पण त्याने इथेच राहावे. त्याचे कमलनयन, त्याचे ओठ, त्याचे हात दुसऱ्या तन्वंगींचे झाले तरी चालेल. त्याने काही बिघडत नाही, तो फक्त इथे नजरेसमोर असू द्या." असा आक्रोश ही गोपी करते.

एका स्त्रीचे विचार या दृष्टीने हे मोठे नवलाईचे वाटतात. कारण जी प्रेमवेडी झालेली आहे ती नक्कीच आपल्या प्रियकराला सर्वस्वाने आपल्या आधीन ठेवील.

या तिरुवायमोळीत असे दिसते की नम्माळवार गोपीच्या मुखाने बोलतात; एवढेच केवळ नव्हे तर ती गोपीही नम्माळवारच होऊन जाते. या दशपदीच्या शब्दयोजनेत जो गोंधळ दिसून येतो, त्याआड स्पंदन पावणारे हृदय नम्माळवारांचे आहे.[३४]

सरळ स्वतःच्या रूपाने अथवा पुराणातील एखाद्या व्यक्तिरेखेच्या रूपाने नम्माळवार ईश्वराची प्रेयसी बनतात; एवढेच नव्हे तर तिरुविरुत्तममध्ये दिसते. त्याप्रमाणे कधी ते त्या प्रेयसीची आई अथवा सखी बनतात तर कधी 'कट्टुवीची' (भगतीण) किंवा प्रेयसीची दासी बनतात. परंतु या निरनिराळ्या प्रतीकांचा वापर वेगवेगळ्या तिरुवायमोळ्यांतून केलेला आहे आणि त्या प्रत्येक तिरुवायमोळीला स्वयंपूर्ण कवितेचे सामर्थ्य आलेले आहे. त्यामुळे एका प्रतीकाआड दुसरे प्रतीक झाकोळले असे झालेले नाही. एवढेच काय, ही सर्व प्रतीके, संपूर्ण रूपकाच्या स्वरूपात क्रमाने एकत्रही येत नाहींत.

---

(३४) तिरुवायमोळी १०–३.

प्रमवेडी प्रेयसी स्वतःच्या सख्यांना उद्देशून बोलत आहे अशी पुढील तिरुवायमोळी पाहा –

'हे हरिणाक्षींनो, माझ्या जिवलग सख्यांनो,
पूर्वकर्माच्या ओझ्याखाली दबून गेलेली मी–
आला दिवस, गेला दिवस–
झुरतेच आहे.
तो मात्र सांभाळून आहे आपले राजवैभव,
तिरुवल्लवाळच्या[३५] वनराईत–
जी मधाच्या पोळ्यांनी सुशोभित,
जिथे भरदार तालवृक्ष आभाळाचे संमार्जन करतात,
आणि जातिपुष्पांचा सुगंध मधभऱ्या गोडीत उसळतो.
मी त्याची दासी, त्याच्या चरणाशी कधी पोहोचेन?'[३६]

पुढील आणखी एका गीतामध्ये ईश्वराने यावयास उशीर केला म्हणन रुसलेली प्रेयसी (ही गोपी आहे) दिसते.

'जा, स्वामी, सोडा आम्हाला.
ही एवढीच साधना आम्ही संपादली,
आमच्या तपातून.–
तुमच्या हास्याने काळजाला घरे पाडून घेण्याची,
तुमच्या ओठांमुळे आणि तुमच्या कमलनयनांमुळेही.
जा. जा तुम्ही. अगणित बायका पडल्या आहेत दुसरीकडे.
सुंदरही आहेत त्या मोरासारख्या.
वाट पाहात आहेत तुमची, तुमची करुणा मिरवीत–
जा. जा त्यांच्याकडे. सोडून द्या ती गाईगुरे. भरकटू द्या त्यांना.
तुम्ही बसा वाजवीत तुमची मुरली मोठमोठ्याने—
त्यांना ऐकवण्यासाठी आणि आनंदाने उसळविण्यासाठी.'[३७]

या तिरुवायमोळीत जी नायिका बोलते ती अजून जाणती झालेली नाही. मैत्रिणींच्या संगतीत वाळूचे किल्ले बांधणारी– खेळघरे बांधणारी, त्यांत चूलबोळकी मांडून भातुकलीचा खेळ खेळणारी लहान मुलगी असावी असे दिसते. तिची तक्रार आहे की ईश्वर अजून आलेला नाही. प्रसन्न हास्याने स्वतःचा चेहरा उजळीत त्यांच्याजवळ थांबलेला नाही. त्यांनी बांधलेल्या वाळूच्या इवल्या खेळघराचे आणि त्यात केलेल्या लुटूपुटीच्या स्वयंपाकाचे कौतुक त्याने केले नाही.[३८] माणसे

(३५) केरळमधील तिरुवेल्ला. (३६) तिरुवायमोळी, ५.९.१. (३७) तत्रव ६.२.२. (३८) तत्रैव. ६.२.९.

लहान-सहान क्षुद्र कामातही परमेश्वराची करुणा भाकत असतात आणि परमेश्वर त्या घडपडींची उपेक्षा करून त्यांचे चित्त स्वतःकडे वळवितो असा या प्रतीकाचा आशय दिसतो.

पुढील तिरुवायमोळीमध्ये प्रेयसी वयात आलेली जाणती स्त्री आहे. तिची आई म्हणते,–

' सारी विश्वे भरून उरलेला तो–
जलार्द्र मेघांसारखा नीलश्याम–
कमलासारखे सुंदर नयन असलेला.
तोच तो. त्याच्यासाठी—
केसांचा सुगंध उधळणारी माझी कन्या
आपले शंखचुडे हरवून बसली आहे.' [३९] *

आईचा हा शोक पुढे चालू राहातो. तिच्या कन्येच्या तनूची कांती लोपली' तिच्या शरीराचा ताठर डौल ढिलावला आणि कौमार्य हरवले.[४०] अशी तिची तक्रार आहे. नववधूच्या रुपकाचा गूढाशय ज्यांना ठाऊक नाही त्यांना ही तिरुवायमोळी आणि आईच्याच मुखाने गाइलेल्या पुढील काही तिरुवायमोळयाही काहीशा अत्युक्त वाटतील—

अन्न जे मी खाते–
पाणी जे मी पिते, विडा जो चघळते–
आणि दुसरे सारे सारे काही–
तो माझा कृष्णप्रभूच आहे "
असा घोष करीत आहे ती– हरिणीची पाडशी.
गेले आहेत तिचे काजळकाठ अश्रूंनी डबडबून.
शोधते आहे ती सतत–
' तो आणि त्याची कीर्ती–
या पृथ्वीवर नांदते कुठे ' ते विचारीत.
आणि जे ती निवडते
आणि जिथे ती प्रवेश करते

---

(३९) तिरुवायमोळी ६.६.१. 'शंखचुडे हरवणे' हा 'प्रेमात पडणे' 'चित्त हरवून बसणे' या अर्थाचा काव्यसंकेत आहे. (* विरहिणीच्या बांगड्या कृशतेमुळे सैल होतात आणि शून्यमनस्क अवस्थेत नकळत गळून पडतात असा या तामिळ काव्यसंकेताचा मथितार्थ असावा.) (४०) तिरुवायमोळी, ६.६.२,५,१०

ते आहे तिरुक्कोलूर.'[४१]
'चिमण्या पाखरांनो मला सांगा.
तुमची तर चिवचिव त्याच प्रभूच्या नावाविषयी
आणि त्या वैजयंतीमालेविषयी.
हे गाव, ही भूमी, हे विश्वही तेच करते.
तर मला सांगा. ती, या चांडाळणीची कन्या–
वेलीसारखी नाजूकशी–
सुपीक शेतांनी वेढलेल्या–
त्या तिरुक्कोलूरला गेली काय? '[४२]
'ती कन्या– कोरलेल्या शिल्पासारखी सुंदर,
पोपटांना आणि पूवइ पक्ष्यांना,[४३]
चेंडूला आणि तिच्या पेट्यांना आणि खेळण्यांना
[४४]तिरुमल प्रभूच्या पवित्र नावांनी साद घालीत–
उठली आणि निघून गेली.
थरथरत होते तिचे बिंबफळासारखे टपोर ओठ
पाऊस पाडीत होते तिचे काळेभोर डोळे
गरीब, बापुडी, ती करील तरी काय
तिरुक्कोलूरच्या गर्द शेतात ?'[४५]

पुढील तिरुवायमोळीतून ही आई ईश्वराला हाक देत आहे. ती बावरलेली आहे. दु:खी आहे. 'ईश्वराने आपल्या कन्येला हे काय केले आहे आणि पुढे काय करायचा त्याचा उद्देश आहे' असे ती विचारीत आहे:—

'ती दिवसा झोपत नाही आणि रात्रीही–
ती सारखी शिंपीत असते हातांनी
पाणी तिच्या डोळ्यातले.
तुझ्या चक्राचा आणि शंखाचा जप करीत
जोडते ती तिचे हात तुझ्या पूजेसाठी.
"कमळासारखे डोळे" असे ती म्हणते
आणि आपल्या अश्रूत बितळून जाते.
"तुझ्यापासून दूर राहाणे मी सोसू तरी कशी?"
असा आक्रोश ती करते– हात पसरते—

(४१) तिरुवायमोळी ६.७.१. तिरुक्कोलूर हे नम्माळवारांच्या जन्मगावापासून जवळच असलेले एक खेडे आहे. (४२) तिरुवायमोळी ६.७.२. (४३) पक्षीविशेष. (४४) श्रीमन्नारायण परमेश्वर (४५) तिरुवायमोळी ६.७.३.

माती बोटाने उकरीत-- जणू शोधण्यासाठी तुला.
जिथे लाल मासे पाण्यात सुळसुळतात
त्या तिरुवरंगमच्या देवा,
तू या स्त्रीला काय केले आहेस ?'[४६]
' ती पडून राहाते, ताठ– निश्चल,
मग उठते– चालू लागते– मूर्च्छित होते.
अंजली जोडून आक्रोश करते–
" प्रीती म्हणजे वेदना !
प्रभो, समुद्रनीलवर्णा,
बघ, तू किती निष्ठूर आहेस. "
पुन्हा ती त्याला हाक देते–
म्हणते, "ये". पुन्हा, पुन्हा हाकारते.
आणि शुद्ध हरपून खाली कोसळते.
हे महान् प्रभो, तिरुवरंगमच्या नाथा,
या स्त्रीचे काय करावे असा तुझा विचार आहे ?'[४७]

मधुमक्षिका आणि पक्षी यांना दूत करून नम्माळवार परमेश्वराला निरोप धाडण्याचा प्रयत्न करतात. त्यासंबंधीच्या चार सुंदर तिरुवायमोळ्या आहेत. यांतील पहिलीचा आरंभ क्रौंच पक्ष्याला आवाहन करून होतो :—

' हे क्रौंचपक्ष्या, किती सुंदर तुझे पंख !
किती कोवळे तुझे अंतःकरण !
तू आणि तुझी ती सुंदर सहचरी–.
माझ्यावर एवढी दया करा
आणि माझे दूत म्हणून जा –
त्या प्रभूकडे –जो वर उभवतो
बलशाली पंखाच्या गरुडाची खूण असणारा ध्वज.'[४८]
' नीट विचार करा, तो प्रभू तुम्हाला फकून देईल
भीषण कारागृहात.
पण समजा, त्याने तसे टाकले म्हणून काय झाले ?'[४९]

नामपिल्लाइ यांनी याचा आशय स्पष्ट केला आहे. व्यंजना अशी आहे की, ईश्वराने कारावासात टाकणं यापेक्षा दुसरे मोठे वरदानच नाही. कारण ती कारा म्हणजे प्रभूचे हृदयच असेल.

---

(४६) तिरुवायमोळी ७.२.१. (४७) तत्रैव ७–४–२. (४८) विष्णूच्या ध्वजावर गरुडाची खूण असते. (४९) तिरुवायमोळी १–४–१.

नम्माळवार यानंतर कोकिळांकडे, मृदुलगती हंसांकडे, आणि निळ्या महानरिल[५०] पक्ष्याकडे वळतात :-

'त्याने वळवावी मजकडे नजर –
करावी दया
आणि म्हणावे, 'हे असे असता नये.'
पण तो तसे म्हणतच नाही.
तो – माझा प्रभू – जलदासारखा निळा
त्याच्यासाठी मी संदेश रचू तरी कसा ?
शब्द आहेतच कुठे ?
निळ्या महानरिला,
तू मला हे वरदान
देशील की नाही ?
त्याला जाऊन सांगण्याचे – की आता पुढे कधीही
जे काही न्याय्य असेल ते त्याची संगत धरणार नाही.'[५१]

नम्माळवार समुद्रपक्ष्यांना उद्देशून गातात, पट्टेरी पंखांच्या मधमाश्यांना उद्देशून गातात. ते पोपटांच्या पिलांशी बोलतात, पूवइ[५२] पक्ष्यांशी बोलतात. इतस्तत: झुळझुळणाऱ्या शीतल वायुलहरींशी संवाद करतात आणि शेवटी स्वतःच्या दुःखी अंतःकरणाशीही बोलतात. या साऱ्या विनवण्या निष्फळ ठरल्या असे दिसते आणि योजलेल्या एका दूतावर नम्माळवार भडकतात :—

'अरे इटुकल्या पक्ष्या, तूच तो.
ओळखले मी तुला.
माझ्या वेदनांची वार्ता घेऊन
प्रभूकडे जायला मी तुला विनविले,
तू ते केले नाहीस,
मी आता गमावून बसले,
माझी झळाळ कांती आणि सारे लावण्य.
आता निदान इथून चालता हो,
दुसरी कुणीतरी काढ शोधून–
गोड घास जी येईल घेऊन–
रोज, तुझ्या गळ्याच्या पिशवीत सोडण्यास.'[५३]

(५०) एक पक्षिविशेष. (५१) तिरुवायमोळी १-४-४. (५२) पक्षिविशेष.
(५३) तिरुवायमोळी १-४-८

वाऱ्याला केलेली विनवणी मर्मभेदी आहे :–

‘ माझ्या क्रूर दुर्दैवाने
माझे पुण्य संपले आहे–
प्रभू खेळत आहे – खेळ, मला झिडकारण्याचा,
आणि दूर राहाण्याचा.
हे थंडगार, भटक्या वाऱ्या,
मी यापूर्वीच मरायला हवे होते.
ये, तुझ्या गारठ्याने माझे शरीर विधून टाक–
आणि संपव मला.’[५४]

पक्ष्यांची निवड प्रियकराकडे दूत म्हणून जाण्यासाठी केली होती. वाऱ्याची निवड तशी नाही. उत्कंठेचा आणि त्याबरोबर आयुष्याचा शेवट करण्यासाठी त्याला आवाहन केलेले आहे.

दुसऱ्या एका तिरुवायमोळीतही[५५] याच पक्ष्यांना आणि मधुमक्षिकांना आवाहन केलेले आहे. परमेश्वर आता फारच जवळ, तिरुवानदंदुरला[५६] आहे. आता सूर अधिक आशावादी आहे. वाऱ्याने आता या संताला भाल्याप्रमाणे भोसकावे असे आवाहन नाही. दुसऱ्या एका तिरुवायमोळीत ईश्वराच्या प्रेमात पडलेली ही प्रेयसी मधमाश्यांना आपला संदेश त्याच्याकडे पोचविण्यासाठी विनवीत आहे. त्यांनी नुसता संदेशच न्यायचा नाही तर प्रभूच्या गळ्यातील तुळशीमाळेच्या[५७] मंजिऱ्यांनी स्वतःची मुखे सुगंधित करावयाची आणि हिने केसात माळलेल्या टवटवीत फुलांवर त्या मुखांनी हळुवार फुंकर घालायची. तिने स्वतःच पाळलेल्या पोपटाच्या पिल्लांना ती सांगते की जिथे असेल तिथे त्यांनी ईश्वराला शोधावे आणि तिची दुर्दशा त्याच्या कानी घालावी.[५८] आणखा एका तिरुवायमोळीत[५९] याच पक्ष्यांचा आणि मधुमक्षिकांचा उपयोग तिरुमोळिक्कळम्[६०] येथे परमेश्वराकडे दूत म्हणून धाडण्यासाठी झाला आहे. इथे परमेश्वराची ही प्रेयसी त्या पक्षांना (इथे ते चांगले पक्षी आहेत) खात्रीच देत आहे की जर ते तिच्या घननीळ त्रैलोक्यनाथाकडे तिचा संदेश घेऊन जातील तर अमरांच्या सोनेरी स्वर्गावर त्यांचीच अधिसत्ता चालेल–नव्हे–त्रैलोक्यावरही ते सत्ता गाजवतील.

---

(५४) तिरुवायमोळी १-४-९. (५५) तत्रैव ६-१. (५६) केरळ राज्यात कोट्टरक्कारापासून ३५ मैलांवर. (५७) तिरुवायमोळी ६-८-३. (५८) तत्रैव ६-८-५. (५९) तत्रैव ९-७. (६०) केरळमधील अङ्गलाइजवळ असलेले एक देवस्थान.

पण हा निरोप पाठविल्यावर, प्रेमवेडी झालेली ती अस्वस्थ प्रेयसी ते दूत परतून येण्याचीही वाट न पाहाता (आणि ते कधी तरी परत येणार का?) तिरुनावाय[६१] येथे जायला निघते. ती सारख्या हाका देतच असते.

'कधी, कधी पोहोचेन मी माझ्या प्रभूकडे ?'

तिरुवायमोळी हे जे ईश्वराचा शोध घेण्याचे आणि त्याच्या दर्शनसुखाचे एक गीत आहे त्या गीताचे हे अर्थातच ध्रुपद आहे. त्याची अगणित रूपे गीतात येतात. या काव्याची महत्ता, त्याची जी तत्त्वचिंतनाची झेप आहे तिच्यात, नम्माळ-वारांच्या आंतरिक आयुष्यावर त्यातून जो प्रकाश पडतो त्यात आणि अत्यंत सूक्ष्मगहन अनुभूतीतील विविधता आणि खोली यांचे त्यांत स्तिमित करणारे जे दर्शन घडते त्यांत आहे.

(६१) तिरुवायमोळी ९–८, तिरुनावाय हे केरळातील एक देवस्थान आहे.

प्रकरण सातवे

# सत्‌च्या शोधात

ऐहिक जीवनाचा उपभोग घेऊन अंतराला एक तळमळ वाटू लागते. काही काळ हे सारे निरर्थक वाटू लागते. अशा परिस्थितीत साधारणशः सत्‌च्या शोधाला आरंभ होतो. नम्माळवारांच्या बाबतीतही तो असाच झाला. ऐहिक जीवनाची क्षणिकता आणि अस्थिरता यांचे चित्रदर्शी वर्णन करतांना ते म्हणतात.

'हे सम्राटांचे सम्राट – सत्ता गाजवितात
राजे यांचेपुढे नम्रतेने वाकतात
किती मुकुट यांच्या चरणाशी झुकतात,
त्यांच्या राजसभेतील विजयदुंदुभी–
प्रचंड नादाने त्यांच्या सामर्थ्याची घोषणा करतो.
पण शेवटी–
तेही – ते सम्राटही धुळीला मिळतात.
जगाच्या आरंभापासून हेच घडले आहे.
त्या दिवसापासून – आजपर्यंत.
डामडौल आणि वैभवे नष्ट होत आहेत
विरून जाणाऱ्या मेघखंडाप्रमाणे.
मरून जात आहेत – विलीन होत आहेत-
शून्यांत.'[1]

नम्माळवारांना मनुष्यमात्रातील नातेबंध हा योगायोगाने जुळून येणारा आणि बिनभरंवशाचा वाटतो. भोवती पसरलेले जग अंधारलेले आहे. त्यात समाधान नाही अशी त्यांची धारणा होतो :—

'अनंत वेदना–
हे जग देते आम्हाला.
आणि जे दूर राहातात ते हसतात उपहासाने.
जवळ असलेले साधूजन शोकानेच क्षीण होतात.
अरेरे – कसले हे जग–'
'जे आपलेच असतात सगे–सोयरे
त्यांच्याबरोवर मरणे – नाश पावणे

---

(१) तिरुवायमोळी ४–१–३, ६.

भ्रमनिरास झाल्यामुळे अश्रू गाळत—
" मला घे " म्हणत येते संपत्ती आणि बनते एक आग.
" मला घे " म्हणतो अज्ञानाचा अंधार आणि—
व्यापून टाकतो सर्वांगाने.
ते—ते दुष्ट दुरात्मे स्वतःच्या कष्टांना
दुसऱ्यांना जुंपतात आणि चिरडून टाकतात.
ते छळ करतात—हत्या करतात आणि खातात.
गुणाची त्यांना ओळख नाही.
अरेरे – कसले हे जग ... ... ...'[२]

या साऱ्यातूनच पुढे अंतराची तळमळ शांत होण्यासाठी नम्माळवार ईश्वराकडे, त्या अंतिम कल्याणनिधानाकडे वळतात. त्यांचेच शब्द ऐकू या :—

' हे प्रभो, हे शरीर – जे तू मला दिलेस
एक साधन – त्या साधनाभोवतीच
मी फेऱ्या घेत आहे.
काळाचे हे दाहक अस्तित्व
केव्हा बरे संपेल ?
केव्हा बरे मी उखडून टाकेन कर्मचक्राला ?
केव्हा, केव्हा बरे, हे ईश्वरा मी होईन
तुझ्याशी एकरूप ?'[३]
या निर्घृण कर्मचक्राच्या दाट झाडोऱ्यात
अडकलेला मी—
आक्रोशत आहे – आक्रोशत आहे.
पातकी असा हा मी
अंत नसलेल्या गुंतावळयात—
गोंधळलेला भटकत आहे
कुठे ? कुठे बरे मला ईश्वर भेटेल ?[४]

ज्या ऐहिकाला नम्माळवार झाडझाडोरा मानतात आणि अंत नसलेल्या ज्या गुंतावळयातून स्वतःला सोडवू पाहतात त्या सहजी नाकारता येण्यासारख्या गोष्टी नाहीत. देह आणि इंद्रिये या गोष्टींशी त्यांना जखडून ठेवतात. एवढेच नाही तर इंद्रियांना त्या बंधनांतच सुख वाटू लागते आणि त्यांचा कल ती कायम करण्याकडे

(२) तिरुवायमोळी ४.९.१,२,४,६. (३) तत्रैव ३.२.१. (४) तत्रैव ३.२.९.

असतो. नम्माळवार याविरुद्ध कडवटपणे तक्रार करतात आणि ज्या अंतिम सत्याला ते शोधत असतात त्यावरच याची जबाबदारी टाकतात :—

'पाच मदांध जुलमी राजे मजवर सत्ता चालवितात[५]
दिवस रात्र ते मला इकडून तिकडे टोलवत असतात
चेंगरत असतात. तूच त्यांना पाठवले आहेस.
तुझ्या दर्शनाला मला वंचित करून
तू तुझ्या वळणावर गेला आहेस–'[६]
'या पाच व्याधींवर
काहीच औषध नाही – उपाय नाही.
त्या माझा छळ करीतच आहेत.
या पाच ज्ञानेंद्रियांना –
ईश्वरा, तूच तर आकारले आहेस –
एक चरकच जणू –
जो मला भरडीत आहे– चुरडीत आहे.
मागून, पुढून, साऱ्या बाजूंनी
तुडवून तो माझा लगदा करीत आहे.
हे अमरेश्वरा
कोण मला यातून सोडवील ?'[७]

इंद्रियांचे हे निर्घृण नाटय– अस्तित्वात तरी कसे आले ?

'हे ईश्वरा, तूच पसरवले आहेस
माझ्याभोवती हे मायाजाल
मला नकळत.
हे ईश्वरा, मला या पाचांच्या दयेवर सोडून
तूच अडथळा करीत आहेस
तुझ्या चरणकमलाकडे पोहोचण्याच्या मार्गात.'[८]

इंद्रिये आणि मन यांचा कल ऐहिकात गुंतण्याचा असतो. त्यांच्यावर विजय मिळविणे ही पहिली पायरी असते. हा विजय इंद्रियांची उपासमार करून साध्य होऊ शकतो काय ? मन आणि इंद्रियांच्या शक्ती यांना गुदमरवून त्यांचे दमन करणे हा तपस्व्यांचा पंथ आहे. नम्माळवारांना त्याची जाणीव होती. पण त्याच-

---

(५) चक्षुरिंद्रिय, श्रवणेंद्रिय रसनेंद्रिय, स्पर्शेन्द्रिय, घ्राणेंद्रिय ही पाच परंपरेने मानलेली इंद्रिये, त्यांचाच उल्लेख नम्माळवार इथे 'जुलमी राजे' असा करतात.
(६) तिरुवायमोळी ७.१.२. (७) तिरुवायमोळी ७.१.५. (८) तत्रैव ७.१.४.

'बरोबर ' ऐहिकाची विरक्ती (जिचा तपस्व्यांना ध्यास असतो आणि जी आत्मिक उन्नतीकरता इतकी आवश्यक वाटते ती ) ईश्वराविषयीच्या आसक्तीतूनच लाभू शकते, हेही नम्माळवारांना ज्ञात होते.'[९] इंद्रियदमनाने ईश्वरप्राप्ती न होता केवळ आत्मगौरव, संकुचितपणा आणि अहंता यांचाच लाभ होईल असा विचार आपल्याला नम्माळवारांच्या ग्रंथात दिसत नाही. ऐंद्रिय शक्ती आणि ज्या ऐहिकाशी त्या निगडित असतात ते जीवन यांच्यावर विजय मिळवता येतो अशी त्यांची श्रद्धा होती. पण हा विजय इंद्रियांचे, ऐहिकतेचे अस्तित्वच नाकारून पोकळी निर्माण केल्याने– ( जर यदाकदाचित अशी पोकळी निर्माण करणे कोणाला शक्य झाले तर )– लाभत नसून त्यांना ईश्वराच्या आसक्तीत गुंतवून ऐहिकतेकडील त्यांचा कल निष्फळ केल्याने लाभतो अशी त्यांची विचारप्रणाली होती. या बाबतीत श्रेष्ठ तामिळ सूत्रकार तिरुवल्लवार यांच्याशी त्यांचे एकमत आहे.

पण हे शक्य आहे काय ? ईश्वरासंबंधी आपणास काहीच माहिती नसताना कुणी झाला तरी हे कसे साध्य करू शकेल ? स्वतः नम्माळवार म्हणतात त्याप्रमाणे आपली स्थिती याबाबतीत आंधळ्या गाईसारखी असते. गोठा जवळच आहे हे तिला दिसत नाही तरीही इतर गाईंबरोबर तीही आनंदाने हंबरू लागते.[१०] नम्माळवारांच्या साधनेचा हा तिसरा टप्पा आहे. नम्माळवार इथे ईश्वराचे स्वरूप अनिर्वचनीय आहे हे ओळखतात पण तरीही मार्ग आणि गन्तव्य दोन्ही तोच आहे हे जाणून त्याच्याकडे वळतात. 'सत्' च्या अपरिमितत्वाची जाणीव त्यांना थक्क करून सोडते. त्याला आकळण्याच्या, त्याच्या जवळ जाण्याच्या बाबतीतील स्वतःची अक्षमताही त्यांना तेवढीच प्रकर्षाने जाणवते. ईश्वर हा अज्ञेय आहे असे ते म्हणतात–

' कितीही प्रयत्न करा तुम्ही–
ईश्वराला समजून घेण्याचा, आणखी समजून घेण्याचा, पूर्ण समजून घेण्याचा–
ही खोली अशी आहे की जिचा थांग लागणार नाही
ही रुंदी–हो उंची अशी की तिला मोजमाप नाही.
ही अवस्था – नामरूपाचे अतीत.
तुम्ही कसे जाणू शकाल ?
अरे धडपडणाऱ्या प्राण्यांनो,
तुम्हाला कधीही – कधीही – उमगणार नाही.'[११]
' मला समजत नाही, मी त्याला कोणत्या नावाने हाक मारू ?
मनात तरी त्याची संकल्पना कशी करूं ? मला समजत नाही.

---

(९) तिरुवायमोळी १.२.१. (१०) तिरुविरुत्तम ९४. (११) तिरुवायमोळी १.३.६.

माझे ज्ञान इतके थिटे आहे –
पण या साऱ्या वस्तू तोच आहे. तोच प्रत्येकजण आहे.
ज्यांनी साही दर्शनांतील गुंतागुंतीची उकल केली
त्यांच्याही गणतीच्या पलिकडे तो पार उंच आहे.
तो साऱ्यांच्याच आटोक्यापलिकडे आहे.
कोणीही त्याचे वर्णन करू शकत नाही.
पण चैतन्याचे केंद्र तो, आत्म्याचेही केंद्र तोच
त्याच्याकडे पोहोचणे शक्य आहे –
संपूर्ण विरक्तीतून –'[१२]

हा एक मोठा लक्ष्यवेधी विचार आहे. ईश्वराकडे पोहोचणे असेल तर दुसऱ्या कशाचीही आसक्ती असता नये. आणि आसक्ती सोडण्यासाठी ईश्वराकडे वळायचे– त्या ईश्वराची आपल्याला काहींच माहिती का नसेना. स्वतःच्या क्षुद्रतेची नम्माळवारांना नको तितकी स्पष्ट जाणीव आहे. ऐहिकाशी बांधलेले मन आणि इंद्रिये यांची आपण शिकार आहोत याची त्यांना पूर्ण कल्पना आहे.–

'मला अगदीच थोडे कळते–
तरीही मी टाहो फोडतो
ईश्वराला पाहण्यासाठी
साऱ्यांच्या आटोक्याबाहेर असलेल्या त्याला पाहण्यासाठी.
याहून अधिक दमविणारे, अधिक व्यर्थ
काही असू शकेल काय ?'[१३]
'माझ्या गाठीला साधुत्व नाही की पुण्य नाही.
माझ्यात काहीच चांगले नाही.
मी थिटा–दुबळा
माझे पूर्वकर्म मात्र अमर्याद.[१४]
हे ईश्वरा, मी तुला हाक घालीतच असतो
मस्तकावर हात ठेवून–जोरजोराने.

---

(१२) तिरुवायमोळी १.५.६,७; १.३. (१३) तत्रैव १–५–७. (१४) तिरुवायमोळी या ग्रंथावरील आपल्या महान भाष्यात नामपिल्लाई 'कर्म' याचा अर्थ 'पाप' असा करतात तो अगदी बरोबर आहे. (नम्माळवार 'विनई' हा तामिळ शब्द वापरतात.) ईश्वराची करुणा अमर्याद असली तरी आपली पापे त्या करुणेपेक्षाही मोठी आहेत असे नम्माळवारांना येथे सुचवायचे आहे, हेही ते स्पष्ट करतात. इंद्रिये आणि मन यांच्या क्रीडेतून घडलेली कोणतीही ऐहिक क्रिया असाही 'कर्म' या शब्दाचा अर्थ संभवतो.

पण तू मात्र माझ्या हाकेला ओ देत नाहीस-तुझ्याकडे बोलावीत नाहीस.
तुझे रूपही माझ्या डोळ्यांना दाखवीत नाहीस.'[१५]
'माझ्या देहात आणि आत्म्यात
आणि त्यापलिकडे
तूच आहेस सगळीकडे– सदैव.
अनंत. सर्वव्यापी– थोडीही पोकळी न सोडणारा–
आणि मी– अडाणी, आंधळा
शोधत राहतो तुला माझ्या अंतरात्म्यात
माझी क्षुद्र जीभ लांब काढून तुला हाकारतो
तुला पाहण्यासाठी तळमळतो –
तुला जाणण्यासाठी– आणखी जाणण्यासाठी.'[१६]

नम्माळवार म्हणतात, "मी अज्ञानी असेन पण एक गोष्ट मी नक्की जाणतो की ईश्वर आहे आणि तो सर्वज्ञ आहे. म्हणून मी त्याचा धावा करीत असतो की मी कितीही अपात्र असलो तरी त्याने स्वतःची बिरुदे सांभाळण्यासाठी मला दर्शन द्यावे. मला त्याचे ज्ञान घडवावे."

'मी या भयान्क दुष्ट पंचेंद्रियांना
कसे जिंकू ? कसे जिंकू ?
ही तर क्षणभरही स्वस्थ बसत नाहीत
ईश्वरा, तुझी करुणा नसेल
तर मी यांना कसे जिंकू ?'[१७]
'हे प्रभो, तूच माझ्यावर करुणा कर
आणि या पंचेंद्रियांना –
मला खोल, भयानक दरीत लोटून देणाऱ्या,
माझ्या चैतन्याचा झराच उद्ध्वस्त करणाऱ्यांना–
मुळापासून उखडून काढ.'[१८]
'हे प्रभो तू मजसाठी अमृत बनून ये –
आणि हे अंधारगूढ उखडून टाक मुळापासून.
या गूढाच्याच आधारे तू पूर्वी धाडली आहेस
ही पाच शीघ्रकोपी इंद्रिये.'[१९]

पंचेंद्रियांची ओढणी आणि ऐहिक जीवन यातून मुक्त होण्यासाठी नम्माळवार ज्या 'सत्' चा आधार घेतात ते हे अंतिम सत्य म्हणजे केवळ बुद्धिगम्य असलेले

(१५) तिरुवायमोळी ४–७–१. (१६) तत्रैव ४.७.६. (१७) तत्रैव ७.१.७.
(१८) तत्रैव- ७.१.९. (१९) तत्रैव ७.१.८.

अमूर्त तत्त्व नसून अत्यंत सुंदर असा ईश्वराचा मूर्त अवतार आहे. हे अवताररूप एवढे मनोहर आहे की आत्मतत्त्वाबरोबर इंद्रियेही त्याजवर खिळून राहावी.[२०] सत्च्या या सौंदर्याचे आणि करुणेचे कीर्तन करीतच नम्माळवार प्रथम ऐहिक बंध झटकून टाकतात. ते म्हणतात, "तुझ्या रूपाचे वर्णन करावे असे मी ठरविले तरी ते मला कसे शक्य आहे? कमल अत्यंत सुंदर असते. पण तुझ्या डोळ्यांच्या, चरणांच्या, करांच्या तुलनेने ते फिकेच ठरते. अग्नीमध्ये शुद्ध केलेले सोनेही तुझ्या रूपसौंदर्याच्या जवळपासही कुठे येऊ शकत नाही. तुझ्याशी तुलना करण्यासाठी या जगात जे जे काय निर्माण होते ते सारे तुझ्यापुढे निष्प्रभ होऊन व्यर्थ होते"[२१] या अवस्थेत नम्माळवार आपली सारी इंद्रिये आणि शक्ती सौंदर्यात्म अशा परमेश्वराशी संपर्क साधण्यासाठी वापरतात. त्यामुळे ती अंतिम सत्याशी निगडित होऊन त्यांच्या क्रियांची दिशाच बदलते आणि नम्माळवार त्यांना वश करून घेतात.

'हे घननीळा, तुझे कीर्तन सतत करून
माझे अंतःकरण शांत राहाते.
हे किरीटमंडित ईश्वरा,[२२]
मी कीर्तन करतो– तुझ्या चरणांचे
त्रिजगाला पूज्य असणाऱ्या तुझ्या चरणांचे.
हे शरण्य प्रभो, माझे शब्द सतत तुझ्याचकडे वळतात
माझे हृदय हे तुझ्या निवासासाठी विस्तारलेली विशाल नगरी आहे.
माझे हात, सतत चाचपडत शोधीत असतात, फक्त तुला–हे अमरेश्वरा !
माझी दिठी ओठंगली आहे
तुझ्या संपूर्ण रूपात तुझे दर्शन घेण्यासाठी–
क्षणाचाही विसावा न घेता –
सदाची – सदाची ...
माझे कान सदैव आतुरले आहेत
तो आवाज ऐकण्यासाठी –
तुझ्या गरुडाच्या पंखांचा
माझे अंतर्कर्ण भरून राहिले आहेत
तुझ्या मधु मधुर कीर्तनाने –
दीर्घकाळ रचलेल्या ...
हे सुवर्णाचे चक्र धारण करणाऱ्या ईश्वरा,
माझी चेतना शोधीत आहे तुलाच –

(२०) 'नम्माळवारांचे तत्त्वज्ञान' हे प्रकरण पहा. (२१) तिरुवायमोळी ३.१.२
(२२) नामपिल्लाई यांच्या भाष्याप्रमाणे पृथ्वी व स्वर्ग हाच किरीट.

ऐहिकाकडे पाठ फिरवून – न शमणाऱ्या ओढीने.
हे लावण्यमय ईश्वरा,
घननीळा, कमलनयना,
माझ्या आत्म्याला ओढ लावणाऱ्या करुणामया ...[२३]

या संताचा अंतिम सत्याचा जो शोध चाललेला आहे त्यात तो इथे अशा एका टप्प्याशी येऊन पोहोचला आहे की तिथे हे जग आणि भोवतीचे सारे विश्व जे इंद्रियांना खाद्य पुरवते आणि पोसते तेच–त्यांना ईश्वराचे अधिष्ठान झालेले दिसते. ऐहिकाच्या साऱ्या उणीवा जमेस धरूनही त्याचे ईश्वराकडे नेणाऱ्या मार्गात परावर्तन होते. आता इंद्रियांना मोकळे सोडायला प्रत्यवाय नसतो. कारण आता ती शारीरबंधनात नसतात. भौतिकाच्याच मार्गाने ती भौतिकापासून मुक्त होऊन अखेर ईश्वराला मिळतात. भौतिकातील सौंदर्य हे अदृश्य विश्वातील सौंदर्याची फक्त छाया असते किंबहुना त्याहूनही अधिक म्हणजे ते अंतिम सत्चा एक अंशच असते आणि त्याची यथोचित अनुभूती आल्यावर त्यातूनच अंतिम सत् आपल्या पूर्णत्वाने आकारते. नम्माळवार सत्च्या शोधाला सुरुवात करतात तेव्हा आरंभी ऐहिकाकडे पाठ फिरवतात तशी आता फिरवत नाहीत, उलट आता ते ऐहिकातील दृश्ये आणि ध्वनी यांचा, सूर्याच्या उन्हाचा, पावसाच्या धारांचा, फुलांचा, टेकड्यांचा आणि जलाशयांचा, हिरव्यागार शेतांचा आणि खाजणांचा ममतेने आस्वाद घेतात. कारण ही सारी आता ईश्वराचीच रूपे असतात. त्याच्याच सौंदर्याने उजळलेली असतात. निसर्गातील प्रत्येक वस्तू त्यांना आता ईश्वराच्या अनुभवातीत भव्यतेचे स्मरण करून देते. आपले वेगळे अस्तित्व याच पूर्णाचा अंश आहे असे त्यांना अनेकदा भावते.

प्रवासाच्या पुढच्या टप्प्यावर नम्माळवारांना परमेश्वराचा क्षणमात्र साक्षात्कार होतो. एका विशिष्ट तिरुवायमोळीच्या संदर्भात (४.७) पहिल्या सहा श्लोकांत परमेश्वर दर्शन देत नाही अशी तक्रार आहे. तेथील भाववृत्ती निराशेची आहे. सातव्या श्लोकात एकाएकी आनंदाने फुलून जाऊन नम्माळवार घोषणा करतात: " माझ्या देवा, तू मला सापडला आहेस.–तुलसीमाला धारण करणारा तू मला सापडला आहेस." पुढील तीन श्लोकांत पुन्हा पूर्वीच्याच निराशेला स्पर्श करणारा सूर आहे.–

'मी ईश्वराला धुंडतो आहे–
कुठे, कुठे बरे मला दिसेल ?
तो माझा चक्रधारी ?
मी आक्रोश करतो. आणि माझ्या साश्रू नयनांनी

(२३) तिरुवायमोळी ३.८

सगळीकडे पाहातो–
पण हा शोध व्यर्थ आहे.
मी त्याला पाहू शकत नाही कारण–
कारण मी पातकी आहे.–'[२४]

ईश्वर पृथ्वीवर अनेक वेगवेगळ्या रूपांनी अवतरला यावर नम्माळवारांची श्रद्धा होती. त्यांना ईश्वराचे जे क्षणिक दर्शन घडते त्यापाठोपाठ त्याच्या अवतारातील अनेक घटनांचीही स्पष्ट दर्शने घडत असतात. त्यांच्या मुखातून प्रकटलेला हा आनंदाचा सूर–अत्यानंदाची घोषणा पहा–"ईश्वरानेच भारतीय युद्ध घडवून आणले, कारण त्याला पृथ्वीवरील भार कमी करावयाचा होता. त्याने मोठे मायाजाल विणले आणि लढणाऱ्या शस्त्रधारी सैन्याचा नाश घडवून आणला. मी या मूळ रूपातील परतत्त्वाच्या जवळ पोहोचलो आहे, त्याच्या पायाशी त्याची पूजा केली आहे, माझा प्रभू दुसरा कोण असू शकतो? ...मला आता आणखी कशाची गरज आहे? ...या अफाट विश्वात माझ्यासारखा धन्य कोण आहे?"[२५]

'तो आता माझ्या डोळ्यांत आहे–
तो कमलनयन' 'कावी'च्या फुलासारखा निळा,
शंख आणि चक्र ही रणायुधे धारण करणारा–
तो विमलरूप – गूढ स्वरूप –
तो मानवी ज्ञानाच्या अतीत –
पहा! तो माझ्या स्कंधावर आहे!
मी त्या प्रभूचे वाहन आहे.'[२६]

आणि पुढे पुन्हा ते म्हणतात –

'प्रभो, अरे मी तुला पकडले आहे.
आकळले आहे मी तुला निमिषार्धात –
घट्ट, मजबूत पकडून.'[२७]

पण ही अवतारांची दृश्यचित्रे जशी एकाएकी प्रकटतात तशीच अदृश्य होतात. त्याबरोबर नम्माळवारांची आनंदोर्मीही ओसरते, पूर्वीहून अधिक गडद, अधिक असहनीय अंधार दाटतो, पूर्वीहून अधिक उत्कट, अधिक सैराट असा शोध पुन्हा चालू होतो. ईश्वराविषयीची प्रीती आर्त व्याकुळतेत परावर्तित होते. या व्याकुळतेतून घडपडत शब्द येतात आणि ते अर्थापलिकडील अर्थापर्यंत पोहोचतात.–

'हे प्रभो, कमलनयना, प्रवालोष्ठा,

---

(२४) तिरुवायमोळी ४.७.९, १०. (२५) तत्रैव ६-४. (२६) तत्रैव १.९.
(२७) तत्रैव २.६.१.

माझ्या हरितरत्ना,
माझ्या चैतन्याच्या अमृतरूपा,
लाटांनी खळाळणाऱ्या सागराचे मंथन करणाऱ्या
हे प्रभो, मला तुझे दर्शन घडव.
' मला तुझे दर्शन घडव
असा टाहो मी फोडीत आहे, बावरलेला, अश्रू ढाळणारा
मी तुझी नामावली जपतो --
जितक्या शक्य तितक्या तऱ्हांनी -- सहस्र तऱ्हांनी
मी ही नावे माझ्या हृदयात जतन करतो --
मला तुझे दर्शन घडव --
शीतल जलाने वेढलेल्या पृथ्वीला
वर उचलणाऱ्या प्रभो, मला दर्शन दे.
' हे चेतना, चैतन्याच्या चैतन्या,
तूच निर्मिलीस ही सारी विशाल विश्वे
तूच उद्धरलीस, गिळून टाकलीस
आणि पुन्हा बाहेर टाकलीस
मी तुला कुठे, कुठे बरे पाहू ? '
' कुठे पोहोचेन मी तुझ्याजवळ ?
हें सारे सहा लोक तर तूच आहेस.
त्यांची दैवतेही तर तूच आहेस
आणि त्यांच्या साऱ्या लीला-- त्याही तूच
आणि याच्याही पलिकडे काही असेलच
तर तेही तूच.
आणि जे जे सूक्ष्म ते तू
डोळ्यांना अगम्य -- केवळ शुद्ध चैतन्य
स्वर्गाच्याही अतीत
कुठे -- कुठे तुला शोधू सांग. '
' अजून कळत नाही मला तुझी उपासना कशी करावी --
आणि कळावे तरी कसे ?
माझे मन, माझी वाणी, माझी करणी
ही सारी तुझ्यापासून -- फक्त तुझ्यापासून.
आणि मीसुद्धा तूच.
' सर्व काही तूच आहेस म्हणून
नरकही तूच आहेस

मग मी स्वर्गात उंच गेलो
अथवा इथे या नरकात राहिलो
तरी त्याने काय फरक पडणार आहे ?
तरीही हे प्रभो, मला अतिशय भय वाटते की–
मला विसरून तू सदैव स्वर्गातच बसून राहशील
प्रभो मजवर दया कर आणि
तुझ्या चरणांचा मला आसरा दे.[२८]

अनेकदा विचार आणि भावना इतक्या तीव्रतेने एकमेकांत मिसळतात की त्यातूनच जे शब्दातीत असे त्याकडे शब्दांचा ओघ सुरू होतो :

'नाही, नाही. मला काहीही कर्तव्य नाही
तुमच्याशी– हे पाळीव पोपटांनो,
कोकिळांनो, मयूरांनो आणि 'पूवई'नो
आता माझा तुमच्याशी काहीही संबंध नाही.
त्या प्रभूने माझी कंकणे नेली.
माझे तेज आणि माझे हृदयही.
आणि तो वैकुंठाला निघून गेला–
कदाचित क्षीरसागरात
अथवा वैकुंठाच्या निळ्या पर्वतावर
ते जवळच आहेत.
पण तो प्रभू मला त्यांच्याकडे पोहोचू देणार नाही–
जोपर्यंत मी तुम्हा सर्वांची माया सोडली नाही–
सर्वांच्या ममत्वाचा सदासाठी त्याग केला नाही–
एक तो प्रभू सोडून साऱ्यांना तोडले नाही तोपर्यंत.'[२९]
'मी काय करावे ?
ही इकडे त्याच्या वेणूची साद–
मी सहन तरी कशी करू ? तिचे वर्णन तरी कसे करू ?'
मी प्रयत्न करण्यापूर्वीच–
त्याचे सुंदर डोळे मला संकेत करतात एका गोष्टीचा–
त्याच्या शब्दाचा अनुरोध दुसराच असतो.
आणि त्याच्या गीताने माझ्या हृदयाची तडफड होते.
आणि ते थांबून गेलेसे होते.
मला कळत नाही, मला काहीच कळत नाही.

---

(२८) तिरुवायमोळी ८.१ (२९) तत्रैव ८.२.८

एवढे मात्र कळते – सांज आली–
तो आलेला नाही.'[30]

नम्माळवार हाक देतात–

'ये ये. कमलांनी भरलेल्या विशाल पुष्करणीप्रमाणे
शीतल, सुगंधी असणाऱ्या प्रभो,
ये, सजल मेघासारखा,
चतुर्भुज रूप घेऊन,
प्रवालवर्ण ओठ आणि सुभग कुंडले मिरवीत
शिखरावरून सूर्याचे घनविभव उदयाला येणाऱ्या–
हरितघन–पाचवर्णी पर्वतासारखा तू ये
तेजझळाळ मुकुटाने मंडित
परमेशा, ये
एक दिवस या डोळयांना--
तुझे दर्शन घडू दे,'[31]

या अवस्थेतून साक्षात्कार फक्त एक पायरी पलीकडे आहे. नम्माळवारांच्या 'तिरुवायमोळी' या ग्रंथाच्या शेवटच्या खंडात असे सांगितले आहे की नम्माळवार हा प्रवास करतात आणि त्या अंतिम सत्याकडे पोहोचतात, ईश्वराचे भक्त अंतिम मक्ती कशी पावतात त्याचे वर्णन उपान्त्य तिरुवायमोळीमध्ये येते ते असे :–

'आभाळाच्या विस्ताराला वेढून रांगा धरणाऱ्या ढगांनी–
त्यांची तुतारी मोठयाने फुंकली
अगाध महासागराने लाटांचे हात उंच उचलले
आणि तो आनंदाने नाचला
ज्या वेळी–
ते ईश्वरावर प्रीती करणारे त्याचे भक्त
त्या सह्या लोकांच्या आधाराकडे–
त्या चिरंतन स्तुतिपात्राकडे–
आपल्याच घराकडे–
वळले, तेव्हा'[32]

वळले आणि होय, पोहोचलेही. तिरुवायमोळी काव्याचा शेवट आपणाला सांगतो की नम्माळवारही या 'पोहोचणाऱ्यांपैकी' एक होते. पण या पोहोचण्याचे वर्णन करू शकतील असे शब्द कुठे आहेत ? जे शब्दांच्या अतीतच आहे त्याला पकडण्या-

(३०) तिरुवायमोळी ९.९.९. (३१) तत्रैव ८.५. (३२) तत्रैव १०.९.१.

साठी वेताल ओढाताण करीत आणि अर्थाची मळणी घालीत शब्द आवर्तात फिरत असतात. परिपूर्ती ? 'ती का वरून, खालून आणि भोवती वेढून टाकणारी पोकळी आहे ? का त्याच्या अतीत उंचावणारी ती कुसुमकोमल कीर्ती आहे ? ती का प्रकाशरूप आनंदमयता आहे की त्याच्याही पलिकडील जाणीव आहे ? कोण सांगू शकेल ? पण याची मात्र मला खात्री आहे की हे प्रभो, तू मला कवेत धरले आहेस आणि माझी तळमळ शांत झाली आहे.'[३३]

ही तळमळ विराम पावली तोच सत्‌च्या शोधातील प्रवासाचाही विराम आहे.

(३३) तिरुवायमोळी १०.१०

## प्रकरण आठवे

# नम्माळवारांचे तत्त्वज्ञान

सत्कडे पाहण्याची नम्माळवारांची दृष्टी ही एका गूढवाद्याची आहे, कवीची आहे. तांत्रिक अर्थाने तत्त्वज्ञाची नाही. तत्त्वज्ञानातील कोणत्याही एका दर्शनाची पद्धतशीर प्रस्थापना करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न त्यांच्या ग्रंथात कुठेही दिसून येत नाही. याउलट त्यांच्या निवेदनाची गती अनेकदा अडखळलेली, मागे वळलेली दिसते. अनेकदा ते ईश्वराचा शोध घेताना क्षुब्ध आणि व्याकुळ झालेले दिसतात. अनेकदा त्यांच्या भावावेगात प्रकट होण्यास एक आततायी निकड जाणवते जिच्यामुळे शब्दांनाही संदिग्धता येते. विचार भावनात गुरफटले जातात. या सर्व गोष्टी त्यांना ईश्वराविषयी असलेली आंतरिक तळमळ व्यक्त करणाऱ्या निर्णायक खुणा आहेत. परंतु तत्त्वज्ञाला आवश्यक असलेल्या निखळ तर्ककर्कशतेला, शिस्तीला आणि एकोद्देशतेला या गोष्टींचा अडथळाच होतो. तरीही नम्माळवारांच्या काव्यातून जे अनुभवविश्व साकारते त्यातून एक सुसंगत तत्त्वविचार उभा राहातो. तो लक्ष्यवेधी आहे. तो इकडे तिकडे विखुरलेला असला तरी त्यातून एक सुसंगत संपूर्ण विचार उभा करणे शक्य आहे. महान वैष्णव चिंतक आणि उपदेशक श्री रामानुजाचार्य यांनी जेव्हा वेदांतसूत्रे आणि गीता यावरील त्यांची विख्यात भाष्ये लिहिली तेव्हा त्यांच्यावर नम्माळवारांच्या या तत्त्वचिंतनाचा परिणाम झालेला आहे असे म्हणतात.

या तत्त्वविचाराचा किती भाग नम्माळवारांना वेद आणि उपनिषदे यांतून सरळ प्राप्त झाला हे नेमके सांगता येत नाही. नामपिल्लाई आणि पेरियावचन पिल्लाई हे महान भाष्यकार एकीकडे नम्माळवारांच्या रचना आणि दुसरीकडे वेद, उपनिषदे, इतिहास पुराणे यांतील बरीच साम्यस्थळे दाखवितात. परंपरेला मान्य असे नम्माळवारांचे चरित्र आपण स्वीकारले तर जन्मापासून पुढे अनेक वर्षे त्यांचा जगाशी कोणताही संपर्क नव्हता. शिवाय समाजाच्या त्या वर्गाला त्या काळात वेदांच्या मूळ संहिता अप्राप्य होत्या. आयुष्याच्या सोळा वर्षांनंतर जेव्हा नम्माळवारांनी प्रथम मौनव्रत सोडले आणि मधुर कवीच्या प्रश्नांना ती अविस्मरणीय उत्तरे दिली, त्या वेळी त्यांना वेद आणि उपनिषदे यांचे ज्ञान रूढ चाकोरीतून सरळ लाभलेले असणे संभवनीय नव्हते. त्यामुळे नम्माळवारांच्या रचना आणि संस्कृतमधील पवित्र धर्मग्रंथ यांत जे साम्य आढळून येते, त्याचे कारण त्या दोन्हींचे समान

स्वरूप. दोन्हीही (वेद आणि उपनिषदे यांचा काही भाग[1] तर निश्चितपणे) स्फूर्त उद्गार आहेत. गूढ अनुभूती आणि सत्याचे अंतःस्फूर्त ज्ञान यांतून उमटलेले; असा विचार करणे तर्काला धरून होईल. शिवाय नम्माळवारांचे काळी जे हिंदु धर्माचे पुनरुत्थान झाले त्यात वेदोपनिषदांतील अनेक कल्पनांचा समाजात प्रसार झाला. पुराणे आणि इतिहास यांनी तो यत्नपूर्वक आणि भक्तीने जतन केला. त्यातून या कल्पना जनसामान्यांपर्यंत पोहोचणे शक्य आहे. आणि शिवाय नारायण किंवा तिरुमल यांची उपासना तामिळ लोकांत नम्माळवारांच्या पूर्वीही बऱ्याच काळापासून चालू होती.[2] परंतु हा प्रश्न इथे असाच अनिर्णित ठेवून मी नम्माळवारांचे साहित्य या ' सत् ' बद्दल– या चरम सत्याबद्दल– काय म्हणते याकडे वळणार आहे. उपनिषदे, दुसरे हिंदू धर्मग्रंथ आणि तामिळ लोकांमध्ये प्रचलित असलेली तिरुमलाची उपासना यांचे नम्माळवारांवर ऋण किती याचा शोध घेण्याचा किंवा त्यासंबंधी निर्णय देण्याचा प्रयत्न मी करणार नाही.

नम्माळवारांच्या दृष्टीने ईश्वर हेच ' अंतिम सत्य ' आहे. त्यांचे चिंतन संपूर्ण आस्तिकतावादी आहे. त्यांच्या दृष्टीने जग आणि जीवात्मा हेही सत्यच होत. तरीही ज्या अर्थी त्यांना ईश्वरनिरपेक्ष असे स्वतंत्र अस्तित्व नाही, ज्या अर्थी ते ईश्वरात आहेत आणि ईश्वर त्यांच्यात आहे त्या अर्थी ते 'सत्'चे–चरम सत्याचे – अंश आहेत. म्हणून चरम सत्य हे शेवटी खरोखर एकच आहे.–

' त्यानेच दिली आहे शिवाला – त्रिपुरारीला –
स्वतःची उजवी बाजू.
त्याच्याच नाभिकमलातून
निर्मिला त्याने ब्रह्मा–अवकाशाच्या चारी दिशा पाहणारा.
हे जग, आणि तो स्वतः दृष्टिगोचर व्हावा म्हणून.
तोच त्याच्या हृदयात.
आणि मला जर त्याचे– त्या जगाचे वर्णन करायचे झाले
तर– तर– सारेच आहे त्याच्याच अंतर्भूत.
हीच त्या ईश्वराची किमया. '[3]

---

(१) ' ईशावास्यमिदं सर्वम् ' (हे सर्व ईश्वराचा निवास आहे) हे निधान तर्काने सिद्ध केलेले नाही. ते ईशोपनिषदाचे आरंभीचे वाक्य आहे. तसेच 'श्रीमन्नारायण हे आदितत्त्व आहे ' यासंबंधीही तार्किक चर्चा घडलेली नाही. तैत्तिरीय उपनिषदात तसे फक्त प्रतिज्ञावचन आहे. (२) संगमयुगाची कविता हे तामिळमधील सर्वात पुरातन लिपिबद्ध साहित्य. त्यात याचे पुरावे मिळतात. (३) तिरुवायमोळी १.३.९.

म्हणजे काही मायावादी ज्याप्रमाणे हे जग एक माया आहे असे मानतात तसे ते नम्माळवार मानीत नाहीत. ते क्षणभंगुर आहे यात संशय नाही पण ते ईश्वरी योजनेनुसार वृद्धी, क्षय आणि पुनरुत्थान आणि जन्म आणि मरण अशा अनंत कालचक्रात सतत नित्य नवे रूप धारण करीत आहे. त्याचा उगम अंतिम सत्यापासून होतो. त्याच्याशिवाय त्याला वेगळे अस्तित्व नाही. ते त्याच्यामुळेच अस्तित्वात येते. तोच त्याचे धारण करतो आणि प्रलयकाळी ते त्यामध्येच सामावले जाते. आणि हा विलयही फक्त नव्या सृष्टीचा आरंभच असतो. विलय हा कायम असत नाही. सृष्टीची पुन्हा नव्याने उत्पत्ती होते आणि त्याच्याच इच्छेने जग आणखी एका कालचक्रावर अलगद आरूढ होते. –

'शिवाच्या रूपाने
विश्वाचा संहार करीत
आणि ब्रह्म्याच्या रूपाने
त्याचे पुनर्निर्माण करीत
ईश्वर मायाजाल विणीत असतो–
देवांनाही न समजणारे.[४]
सागराने वेष्टित पृथ्वी
ती मी निर्मिली.
ती पृथ्वी म्हणजे मीच.
तिच्यावर माझी सत्ता आहे
मीच तिचा विध्वंस करतो
शेवटी – प्रलयकाळी – मी तिचा घास घेतो
मीच तो ईश्वर आहे.'[५]

'ती पृथ्वी मीच आहे' हे शब्द अर्थपूर्ण आहेत. ईश्वर जग निर्माण करतो, त्याची धारणा करतो, त्याचा विनाश करतो, त्याचे पुनर्निर्माण करतो आणि हे सर्व–या त्याच्या लीला अव्याहतपणे चालूच असतात. एवढेच नव्हे तर हे जे दृश्यमान विश्व, सतत बदलत असते, विनाश पावत असते आणि त्याच्या अनंत रूपांनी पुन्हा निर्माण होत असते–हे सारे त्या ईश्वराचेच विराट स्वरूप असते. या अर्थाने 'ईश्वर हा जग आहे'.

विश्वाच्या प्रत्येक लहान-मोठ्या अंशात, अगदी अवकाशातील अतिसूक्ष्म कणापासून, जलाच्या सूक्ष्म बिंदूपासून[६] वाटेच्या कडेवरील रानटी फुलापासून[७]—

(४) तिरुवायमोळी १.१.८. (५) तत्रैव ५.६.१. (६) तत्रैव १.१.१०
(७) पेरिया तिरुवंताती ७३

तो अत्यंत परिणत अशा ताऱ्यापर्यंत,[८] सर्व वस्तुमात्रात ईश्वर 'अंतर्यामी' म्हणून निवास करतो. सर्वाभूती आणि सर्वत्र त्याचाच निवास असतो फक्त तो जाणण्याची शक्ती आपणास हवी :–

'अनंत आकाश,
अग्नी, वायू, पाणी आणि पृथ्वी–
सारे तो ईश्वरच आहे.
आणि या साऱ्यावर अपरिमेय जे विस्तारले आहे
त्या साऱ्यातही
जसा देहात प्राण असावा
तसा ईश्वर निवास करतो– अदृश्य, सर्वदूर
आणि तरीही वेदांचीच प्रतिष्ठा असणारा तो ईश्वर
साऱ्यांचे चिरंतन निवासस्थान आहे.
खरोखर सारे त्रैलोक्य त्याच्यातच सामावले आहे.'[९]

त्यामुळे माणसाचे मन हेही ईश्वराचे अदृष्ट अधिष्ठान आहे हे ओघानेच येते मानवी चैतन्याच्या अगदी खोल गाभ्यात याचा निवास असतो. नम्माळवार म्हणतात–

'तो माझ्यातच विलीन झाला आहे'[१०]
'तो जर माझ्यात नसेल
तर मी कसा असेन ?'[११]
'तो त्याच्या मर्जीने आला
नकळत माझ्या अंत:करणात शिरला–
माझ्या देहाशी एकरूप होऊन गेला
आणि माझ्या आत्म्यात गुंतून गेला.'[१२]

'आत' आणि 'बाहेर' हे अर्थ व्यक्त करणारे तामिळ भाषेतील शब्द नम्माळवारांनी जाणीवपूर्वक वापरले आहेत –

'तो अंतर्यामी आहे आणि तोच बहिर्भागी.'[१३]
'ईश्वर अंतर्यामी आहे असे तुम्ही म्हणाल,
तर तो आहेच.
आणि ही सारी त्याची रूपे आहेत.
त्याबद्दल जर तुम्हाला शंका असेल तर –

---

(८) तिरुवायमोळी ३.१.८ (९) तत्रैव १.१.७. (१०) तत्रैव २.५.३
(११) तत्रैव १.१.६. (१२) तत्रैव १.७.७. (१३) तत्रैव १.३.२

तर मग – या साऱ्या सावल्या म्हणज तो आहे
त्याचीच सावली आहे.
परंतु तो आहे. निश्चित आहे.
या दोन्ही विरोधी लक्षणांनी युक्त –
अंतर्यामी असणे, अंतर्यामी नसणे –
यांनी युक्त असा तो आहेच '[14]

सर्व व्यापून असलेला आणि सर्वापलीकडे असणारा, अस्तित्वाची द्विविधरूपे मिरविणारा असा तो ईश्वर आहे. पुढे नम्माळवारांचा हा शोध – हे चिंतन संपलें आणि त्यांना त्या परतत्त्वाचा साक्षात्कार झाला तेव्हा त्या परिणत अवस्थेत ते अधिक स्पष्ट शब्दांत सांगतात :–

' ईश्वर, ती अपरिमित माया,
नटखट असा तो मनचोर –
तो कोण्या एका अज्ञात महाकवीच्या वेषात आला,
कुणालाही नकळत त्याने प्रवेश केला,
माझा प्राण, माझे मन याशी एक झाला;
अरे ! पण त्याने तर त्यांचा घासच केला.
स्वतःच फक्त उरण्याची दक्षता घेऊन
तो एकटाच फक्त, बाकी काहीही नाही
फक्त तो – एक अपार परिपूर्ती.'[14]

ईश्वर माणसाच्या आतही आहे आणि बाहेरही – कर्णगोचर आणि नयन-गोचर अशा या विश्वात जिथे त्याचे सेवक, त्यानें बंधमुक्त सोडलेल्या त्या निसर्ग-शक्ती – ज्यांना मृत्यू नाही ते ' अमर ' – देव, ईश्वराच्या इच्छा पुरवण्यासाठी अथकपणे झटत आहेत. भूत, वर्तमान, भविष्य – त्याच्याच निर्मितीतून विकसित झालेले हे कालतत्त्वही तोच आहे.

' हे प्रभो, तूच तो काळ आहेस
निघून गेला तो आणि यायचा आहे तोही.'[16]

दुसऱ्या संपूर्ण वेगळ्या अर्थानेही ईश्वर ' आत 'ही आहे आणि ' बाहेर 'ही आहे. एकहार्टच्या शब्दांत सांगावयाचे तर या साऱ्या विश्वात प्रत्येक सजीव आणि निर्जीव वस्तूत त्या अदृश्य चिरंतन साक्षीदाराचे अधिष्ठान आहे, म्हणून ते माण-सातही आहे आणि तरीही तो या साऱ्याच्या बाहेर आहे. साऱ्याच्या अतीत, स्पर्शाच्या पार. तो स्थलकालाच्या आणि बदलत्या वस्तुजाताच्या पलीकडे आहे.

(१४) तिरुवायमोळी १.७.९. (१५) तत्रैव १०.७.१. (१६) तत्रैव ३.८.८.

तो सत् आहे, आणि म्हणूनच तो माणसाच्या मर्यादित बुद्धीच्या आणि त्याहूनही मर्यादित वाणीच्या अतीत आहे.

'ईश्वर– एक माया– माझ्या अंतरात आहे.
आणि दुसऱ्याही सर्वांच्या.
देह तोच. प्राण तोच.
तोच वायू. तोच अग्नी.
तो जवळ आहे
तरीही तो दूर आहे
बुद्धीच्या पार
अस्पृष्ट, निष्कलंक.'[१७]
'हे सचेतन प्राण्यांनो
तुम्ही कितीही प्रयत्न करा
जाणण्याचे, पुन्हा जाणण्याचे, आणखी जाणण्याचे–
ही अगाध खोली
आणि ही अमेय रुंदी आणि उंची
नामरूपाच्या पलिकडची ही अवस्था–
तुम्हाला कशी कळेल ?
तुम्हाला कधीच कळणार नाही.'[१८]

सत् एकच असले तरी नम्माळवारांच्या दृष्टीने त्याची दोन रूपे आहेत. एक 'अंतस्थ' आणि दुसरे 'अतीत'. त्याचप्रमाणे एका व्यक्तीच्या दृष्टीने ते त्रिविध भासते. 'मनुष्य, विश्व आणि ईश्वर' अशा तीन रूपांत. मनुष्याच्या जीवात्म्याला वरकरणी स्वतंत्र अस्तित्व असते तसेच जगालाही. पण ईश्वर या दोघांतही असतो आणि ही दोघे ईश्वरात असतात. मनुष्य आणि विश्व यांना अस्तित्व असले तरी ते स्वतंत्र, ईश्वरनिरपेक्ष नसते. ते सर्वार्थाने 'त्याचे' असतात.

माणसाच्या मर्यादित शब्दशक्तीला 'सत्'चे वर्णन फक्त नकारात्मकच (नेति नेति अशा रूपातच) करता येते. 'अमेय, अतर्क्य, अनिर्वचनीय, मनुष्यमात्रास अज्ञेय, स्थलकालाच्या अतीत, त्यानेच निर्माण केलेल्या अमर देवांनाही अप्राप्य' अशाच काहीशा गूढ शब्दांत नम्माळवार ईश्वराचे वर्णन करतात :–

'तो एक ईश्वर–
त्याला कोण जाणू शकेल ?
शिव आणि चतुर्मुख ब्रह्मा
जे त्याची फक्त रूपे आहेत

(१७) तिरुवायमोळी १.९.६. (१८) तत्रैव १.३.६.

त्यांना तरी शक्य आहे का
माझ्या ईश्वराला जाणणे ?'[१९]
'तो विश्वाचा आरंभ– त्याला आरंभ नाही
जें जे आहेत त्यांचा तो मूळारंभ
जर ही विश्वव्यवस्था डळमळेल
उलटी-सुलटी होऊ पाहील
तर केवळ आत्मबळावर तो ते पुन्हा निर्मील.
मग या भूतलावर कोण असा आहे
जो त्याला आकळील ?'[२०]
'इतका उन्नत इतका संपूर्ण कल्याणमय कोण ?
की ज्याच्यासमोर उंचीच्या आणि कल्याणाच्या
साऱ्या कल्पनाच मावळाव्या ?
तो ईश्वर होय.'[२१]
'त्याचेजवळ हे आहे काय
किंवा ते नाही काय ?
विचार करणेही कठीण आहे.
साकार आणि निराकार–
या पृथ्वीवरील आणि आकाशातील
साऱ्याची एक चिरंतन संततकल्याणकारी शक्ती–
इंद्रियाच्या पार असा तो ईश्वर आहे.
आम्ही कधीतरी त्याच्याजवळ पोहोचू काय ?'[२२]

काही ठिकाणी सत्चे हे अनिर्वर्णनीय, सर्वसमावेशक रूप विरोधाभासातून वर्णन करण्याचा प्रयत्न नम्माळवार करतात–

'तो माझा परमेश्वर, माझ्यावर त्याची सत्ता.
तो दारिद्रच आहे आणि लक्ष्मीही
नरकही तोच आणि स्वर्गही तोच.
शत्रू आणि मित्र
विष आणि अमृत - सारे तोच.
असा त्याचा विविध आविष्कार.'
'आम्ही भोगतो तो
आनंद तो. आणि दुःखही तो.

---

(१९) तिरुवायमोळी २.७.१२. (२०) पेरिया तिरुवंताती २४. (२१) तिरु-वायमोळी १.१.१. (२२) तत्रैव १.१.३.

संभ्रम तो आणि भ्रमनिरासही तो.
शासन तो आणि करुणाही तोच.
ऊन तो आणि सावलीही तोच.
तो अगम्य आहे हेच खरे.'
'तो पुण्य आहे तो पाप आहे.
तो संयोग आणि तोच वियोग
स्मृती आणि विस्मृती
ते जे आहे आणि ते जे नाही–
हे नव्हे. ते नव्हे.
दुसरेही काही नव्हे.'
'दुराचार तो आहे आणि सदाचारही तोच.
लाल, काळा, पांढरा
तोच सत्य आहे. तोच असत्य आहे.
तोच तारुण्य आणि वार्धक्यही.
तोच सनातन आणि नूतन—
आनंद तो, संताप तो–
तोच कीर्ती आणि तोच अकीर्ती–
'तळपता सूर्य तो–तोच शीतल छाया.
तोच लघिमा, तोच गरिमा.
संकोच तो आणि विस्तारही तोच
जे चल आहे ते तो
आणि जे स्थिर आहे तेही तोच.
तो सर्वच आहे पण कुणाचाच नाही.'[२३]

आणि एवढे असूनही नम्माळवारांची सगुण ईश्वररूपावर श्रद्धा आहे. ईश्वर हा अनिर्वचनीय आहे आणि 'तो आहे' एवढे म्हणण्यातच, 'तो कल्याणमय आहे', 'तो महान आहे', 'तो पूज्य आहे' इत्यादी सारी वचने अंतर्भूत आहेत.[२४] या सत्याची नम्माळवारांना जाणीव नाही असे नव्हे; पण जेव्हा ईश्वराच्या विचाराने ते व्याकुळ होतात तेव्हा ते श्रीमन्नारायण या सगुण मूर्तीकडे वळतात. या नारायणाचे वर्णन तैत्तिरीय उपनिषदात आहे. तो चक्रधर, शंखधर आहे. कंठात सुगंधी तुळसीमाला आहे. तो पीतांबरधारी आहे, सुवर्णकिरीटमंडित आहे, श्यामवर्ण आहे, कमलनयन आहे, मूर्तिमंत लावण्य आहे. याच नारायणाला तामीळ लोक तिरुमल म्हणतात. त्याच्या उपासनेचा उल्लेख वेदात आहे. तामीळमधील

(२३) तिरुवायमोळी ६.३.१,५,६ आणि १०. (२४) सेंट बर्नार्ड.

जुन्यात जुने साहित्य म्हणजे संगमयुगाचे काव्य. त्यातही या उपासनेचा उल्लेख आहे.[२५] नम्माळवार नारायणालाच परमात्मा मानतात आणि अनेक ठिकाणी त्याचे वर्णन मूर्त आणि अमूर्त, निर्गुण आणि सगुण अशा संमिश्र पद्धतीने करतात आणि ते समजण्यासारखे आहे.

' ईश्वर – सुवर्ण मुकुटमंडित
सर्वश्रेष्ठ योद्धा
माझा चतुर्भुज परमात्मा
शीतल तुलसीमाला धारण करणारा
घननीळ – रत्नासारखा माझा ईश्वर '[२६]

अशी सुरुवात करून लगोलग ते म्हणतात,

' तो नर नाही की नारी नाही
तो आमच्या बुद्धीच्या पलिकडे आहे.
तो असा आहे आणि असा नाहीही.
त्याला शरण फक्त जायला हवे –
मग भक्ताला हवे असेल त्या रूपात तो दर्शन देतो.
आणि तरीही ते रूप त्याचे नसू शकते. '[२७]

जरी कुठे कुठे सगुण मूर्ती अशा तऱ्हेने अनिर्वचनीय निर्गुणात मिसळून जात असली तरी प्रामुख्याने नम्माळवार नारायण या सगुण रूपाचेच कीर्तन करतात:–

' हे प्रभो, मला सांग –
तुझ्या मुखाचे कीर्तितेज
तुझ्या सुवर्ण मुकुटात झळकते आहे का ?
तुझ्या चरणांची प्रभा.
तू उभा आहेस त्या कमलात विकसली आहे कां ?
तुझ्या तनूचा सोनसळी प्रकाश.
तुझा पितांबर बनून राहिला आहे का ?
आणि तुझ्या अंगावरील तेजस्वी रत्नेही ?
—तीही त्या प्रकाशाचीच रूपे ? '[२८]

---

(२५) संगमयुगाची व्याप्ती साधारणशः ख्रिस्तपूर्व दुसरे शतक ते ख्रिस्तोत्तर दुसरे शतक एवढी मानतात. (२६) तिरुवायमोळी २.५.८,९. (२७) तत्रैव २.५.१०. (२८) तत्रैव ३.१.१.

इथवर सगुणाचे वर्णन आहे. इथून पुढे त्यात निर्गुणाचा शिरकाव होतो :

'हे प्रभो, तू चिरंतन प्रतिष्ठा आहेस.
तुला उमलणे नाही की कोमेजणे नाही.
तू अनंत—विशुद्ध—ज्ञानस्वरूप आहेस.
तूच सर्व आहेस. पूर्णता आणि परिपूर्ती.'[२९]

नम्माळवारांची अशी श्रद्धा आहे– आणि ती त्यांच्या काव्यात अनेकदा व्यक्त झाली आहे– की सर्वांतर्यामी म्हणून ईश्वर या सर्व जगाशी संबंधित आहेच पण त्याशिवायही वेगवेगळ्या वेळी मूर्त आकार घेऊनही तो पृथ्वीवर अवतरला आहे. स्वतःला त्याने नरदेहाच्या, स्थलकालाच्या बंधनात अडकवून घेतले आहे. क्षण-भंगुरतेच्या अंधाऱ्या जाळ्यात स्वतःला जखडून घेतले आहे. जन्ममृत्यूच्या चक्रात त्या अर्थात परमेश्वराचे हे येणे म्हणजे अक्षरशः 'अवतरण'– खाली उतरणे– आहे. परमेश्वराने हे सारे अवतार स्वेच्छेने घेतलेले आहेत. मानवासाठी त्याला वाटणारी अपार करुणा हे त्याचे एक कारण आहे. आणि दुसरे कारण, जे भगवद्गीतेत सांगितले आहे आणि नम्माळवारही ठामपणे मांडतात ते म्हणजे पापाचे निर्दाळण आणि धर्माचे संस्थापन :—

'ईश्वरा, तू सोडलेस
तुझे मूळ दिव्य रूप स्वर्गातले
आणि जन्म घेतलास इथे
साधूंचा छळ करणाऱ्या
कंसाचा नाश करण्यासाठी'[३०]
'तो परमेश्वर–
मानवी रूपात अवतरतो
वेदनांनी व्याप्त असे हे जीवन स्वीकारतो
आणि आमच्या डोळ्यासमोर वावरतो
आमच्या वेदनांतून आमची मुक्ती करण्यासाठी
आम्हाला त्याच्या दिव्य धामाला नेण्यासाठी.'[३१]

काही विद्वान असे मानतात की 'अवतार' हे जीवशास्त्रीय उत्क्रान्तीची प्रतीके आहेत. आनंद के. कुमारस्वामी आणि आल्डस हक्सले यांच्यासारखे दुसरे काहीजण

(२९) तिरुवायमोळी ३.१.८. (३०) तत्रैव ३.५.५. (३१) तत्रव ३.१०.६.

अवतार हे मानसशास्त्र आणि अध्यात्मविद्या यांतील शाश्वत सत्ये प्रकट करण्यासाठी एका विशिष्ट क्रमाने आलेली प्रतीके मानतात.[३२]

नम्माळवारांच्या दृष्टीने अवतार ही ऐतिहासिक सत्ये आहेत, आणि त्याच वेळी सदैव पुनरावृत्त होणारी आध्यात्मिक सत्येही आहेत. नम्माळवार अनेक ठिकाणी स्वतःच्या ग्रंथात अवतारांचा उल्लेख घडून गेलेल्या गोष्टी असा करतात. जेव्हा ते प्रत्यक्ष घडले तेव्हा उपस्थित असण्याचे भाग्य आपल्याला नव्हते अशा शोकाचीही जाण त्यात असते. परंतु मानवी चक्षूला ईश्वर आज जरी अदृश्य असला तरी मनाने त्याचे ज्ञान होऊ शकते. त्यामुळे नम्माळवारांच्या दृष्टीने अवतार हे दोन दृष्टींनी सत्य आहेत. इतिहासात केव्हातरी ते प्रत्यक्ष घडले आहेतच. शिवाय मनुष्याच्या मनोविश्वात ते सतत घडत असतात आणि त्यात परिवर्तन घडवीत असतात. अवतारांची – त्यांच्या सगुण लीलांची – वर्णने नम्माळवार तपशीलवार करतात. त्यांच्या प्रसन्न रूपाच्या वर्णनासाठी ते गोकुळातील खोड्या करणारा बाळकृष्ण निवडतात तर रौद्ररूपाच्या वर्णनासाठी हिरण्यकशिपूला[३३] ठार करणारा सिंहमुखी नरसिंह किंवा त्रिविक्रम[३४] वामन. ईश्वर अवतार घेतो तेव्हा उन्नताहूनही अत्युन्नत असा तो क्षुद्राहूनही क्षुद्र पातक्यापर्यंत खाली उतरून सामान्यांच्या दु:ख – कष्टांचा भार स्वतः वाहतो. ही जी अवताराची अमर्याद व्याप्ती आहे तिच्या दर्शनाने नम्माळवार थक्क होतात. मुळापासून हेलावून जातात. उदाहरणार्थ जो अखिल विश्वाचा एकमेव स्वामी तो सामान्य गुराख्यांबरोबर वावरतो; स्वतःला लाकडाच्या उखळीला बांधून घेतो आणि तेही कशासाठी तर चोरीसाठी आणि तीही चोरी कशाची तर सामान्य अशा लोण्याची.[३५]

नम्माळवारांच्या काव्यावर याचा जो परिणाम झालेला आहे त्याचा परामर्श याच पुस्तकात अन्यत्र घेतलेला आहे.

---

(३२) "वैष्णवी धर्मग्रंथात कृष्णभक्तांना अशी सावधगिरीची सूचना केली आहे की कृष्णलीला हा इतिहास नाही तर मानवी अंतःकरणात सदैव विकसणारी एक क्रमपद्धती आहे."

Hinduism and Buddhism. Ananda K. Coomarswamy. (मराठी भाषांतर प्रस्तुत लेखिकेचे) "कृष्णलीला ही मानसशास्त्र आणि अध्यात्मविद्या यातील चिरंतन सत्याचे प्रतीक आहे. ईश्वराच्या संदर्भात जीवात्मा हा नेहमी स्त्रीलिंगी आणि निष्क्रिय असतो." – 'द पेरेनिअल फिलॉसफी '– ऑल्डस् हक्सले.

(३३) हिरण्य या असुराचा वध ईश्वराने सिंहमुखी भयानक नराच्या रूपाने केला.

(३४) या वामनावतारात ईश्वराने एका पावलाने सर्व पृथ्वी व्यापली आणि दुसऱ्या पावलाने आकाश. (३५) तिरुवायमोळी ११.३.

नम्माळवारांच्या कीर्तनातून ज्या देवमंदिरांचा उल्लेख येतो त्यांतील बहुतेक दक्षिण भारतात आहेत– बरीचशी केरळात आहेत. नम्माळवारांनी स्वत: या स्थानांना भेटी दिल्या होत्या का? नवलाची गोष्ट आहे. त्यांच्या जीवनाचा परंपरामान्य इतिहास सांगतो की तिरुनगरी (त्या वेळी तिला कुरूहूर म्हणत) येथील चिंचेच्या झाडाखालील निवास त्यांनी केव्हाही सोडला नाही. उलट या वेगवेगळ्या देवळांतील निवासी ईश्वरच त्यांना दर्शन देण्यासाठी त्यांच्याकडे आले. ते कसेही असो, नम्माळवारांनी मंदिराची जी वर्णने केली आहेत ती निसर्गवर्णनांनी परिपूर्ण आहेत. निसर्ग हा नम्माळवारांच्या दृष्टीने ईश्वराचे– तो ज्या विशिष्ट रूपाने एखाद्या अवतारात दिसतो त्या अवताररूपाचे – शरीरच आहे. तिरुनेलवेली जिल्ह्यातील ताम्रपर्णी नदीच्या काठावरील तिरुप्पुलिंगुडीचे वर्णन करताना तेथील मंदिरातील मूर्तीला नम्माळवार म्हणतात,

'हे ईश्वरा तू तिरुप्पुलिंगुडी येथे लवंडलेला आहेस '[३६]

नम्माळवारांच्या दृष्टीने प्रत्येक मंदिर हे चतन्यमय ईश्वराचे निवासस्थानच आहे. वेंकटम[३७]विषयी ते म्हणतात–

'सर्वातिशायी तू –
थंड, शीतल वेंकटावर तू राहातोस
तुझी तुलसीमाला
सुगंधाचा वर्षाव करते.'[३८]

ईश्वराच्या दर्शनासाठी नम्माळवारांनी जी धडपड केली तिचे अत्यंत हृदयंगम चित्रण करतानाच ते आपला निष्कर्ष सांगतात की केवळ धडपडीने काहीही साधत नाही. ईश्वरचरणी सर्वस्वाने शरणागती हाच त्याला पावण्याचा एकमेव मार्ग आहे.

'हे प्रभो,
तुझ्या स्तुतीला तुलना नाही.
तिन्ही जगांचा तू स्वामी
माझ्यावर तुझी सत्ता.
देव आणि ऋषी तुलाच शरण जातात.
हे तिरुवेंकटेशा,
मला दुसरा कोणी शरण्य नाही.
म्हणून मीही तुझ्याच पावलांकडे वळतो
तिथेच मला अभयदान आहे.'[३९]

---

(३६) तिरुवायमोळी ९.२. (३७) तिरुमलाइ–तिरुपती (आंध्र प्रदेश) (३८) तिरुवायमोळी २.६.१०. (३९) तत्रैव ६.१०.१०.

नम्माळवारांच्या मताने हे जे अभयदान मिळते ते आपण त्याला लायक होतो याचे फळ म्हणून नव्हे तर ईश्वराची करुणा अमर्याद आहे म्हणून. ईश्वराची भक्ती करणे म्हणजेच या अभयदानाचा मार्ग मोकळा करणे. या भक्तीचा एकदा छंद जडला म्हणजे दुसऱ्या कशालाही जागा उरत नाही. आणि अशी ही असीम भक्ती नम्मळवारांना ईश्वराचे सर्वश्रेष्ठ वरदान जे वैकुंठ किंवा स्वर्ग त्यापेक्षाही अधिक फलदायिनी आणि आनंदकर वाटते. ते ईश्वराला पुढील शब्दांत आळवतात :-

'हे ईश्वरा, मला तुला काहीतरी
सांगावयाचे आहे.
तू विचार करीत आहेस, की
जे तुझ भक्त आहेत त्यांचेसाठी काय करावे ?
त्यांना काय द्यावे ?
अरे, तो स्वर्ग, ते वैकुण्ठ –
जे तुझी करुणा म्हणून
तू त्यांना दान करू शकतोस –
तो का अधिक मधुर आहे,
अधिक धन्य आहे,
तुझे सतत गुणकीर्तन करणारा
जो भक्तिभाव त्यांच्या मनी आहे त्यापेक्षा ?' ४०

नम्माळवारांच्या मते ईश्वराची भक्ती आणि त्याच्यापुढे संपूर्ण शरणागती हे दोन मार्ग आहेत. आणि अंतिम सत्याच्या गावी ते मार्ग जातात :-

'सारे प्राक्तन – सारे पूर्वकर्म
युगायुगांचे ते दाहक ओझे, संपून जाईल.
ददात कसची उरणार नाही.
व्यंग म्हणून रहाणार नाही.
तुम्ही फक्त तुमचे मन आणि अंतःकरण निर्मळ करा
सारा वासनामल धुवून काढा
आणि प्रतिदिन संकीर्तन करा –
लक्ष्मीपतीच्या त्या करुणाघन चरणांचे. ४१
जरी मृत्यू आला तरी–
कीर्तनात रंगलो असता मरणे
हीच तुमची शक्ती आहे – विजय आहे.' ४२

---

(४०) पेरिया तिरुवंताती ५३. (४१) लक्ष्मी ही श्रीमन्नारायणाची दिव्य सहचरी आहे. ती ईश्वराची मूर्त करुणा आहे. (४२) तिरुवायमोळी १.३.८.

अंतिम सत्य हे स्वतः प्रीतिस्वरूप आहे. भोवतीच्या जगात सगळीकडे ते आपल्याला वेढून असते. अवताराच्या रूपाने आपणासमोर येते. कीर्तनात रंगून आपण आपली इवली अहंता हरवली की ते आपल्याला स्पर्श करते. ईश्वर इतरांना तर्काने कितीही अगम्य असला आणि अप्राप्य असला तरी जे त्याची भक्ती करतात त्यांना तो अगदी सहजपणे आकळतो.[४३]

नम्माळवारांच्या तत्त्वज्ञानात साधकाच्या मार्गातील दुर्घटता आणि मनातील संदेह व्याकुळता यांचे जरी स्पष्ट दर्शन होत असले तरी हे तत्त्वज्ञान एकंदरीनें आस्तिकतावादी आणि आशावादी आहे. ईश्वर निश्चितपणे आहे. जीवात्म्याची मुक्तीही निश्चित आहे कारण त्याने आपल्याकडून स्वल्पसा प्रयत्न[४४] करण्याचा अवकाश – ईश्वरी करुणा अनंतातूनही त्याच्याकडे झेप घेऊन येते आणि चिरंतन शांती, ज्ञानाचा प्रकाश आणि प्रीती यांचा त्याला लाभ घडवून देते.

' उजाडले प्रकाश – सर्वत्र प्रकाश – लख्ख प्रकाश !

---

(४३) तिरुवायमोळी १.३.१. (४४) शरणागतीविषयी नम्माळवारांची जी भूमिका आहे तिचा अर्थ दोन भिन्न पद्धतींनी लावला जातो. एक अर्थ ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकात श्री पिल्लाइलोकाचार्य यांनी मांडला आणि श्री माणवाळ मामुनी (१३७३–१४४३) यांनी त्यांचे अनुसरण केले. या अर्थाप्रमाणे ईश्वरी करुणा ही मानवी प्रयत्नावर मुळीच अवलंबून नसते. तिची अनंतता सर्व जीवात्म्यांना व्यापून असते. ती स्वतःच्या प्रेरणेनेच त्यांना मुक्त करीत असते. शरणागती हे साध्याकडे नेणारे साधन नाही. ईश्वरावर सर्वस्वाने विसंबणे ही जी माणसाची स्वाभाविक अंतःप्रेरणा असते तिच्याशी ही शरणागती फक्त माणसातील चेतनाचा सूर जुळवून देते. दुसरा अर्थ पिल्लाइलोकाचार्य यांना समकालीनच पण वयाने जरा तरुण असणारे श्री वेदांतदेशिक यांनी दिलेला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे शरणागती हे मनुष्यमात्राचे पवित्र कर्तव्य आहे. (पाहा : भ. गीता – ' सर्वधर्मान् परित्यज्य… इ.) आणि स्वतः नम्माळवारांनी त्याचा स्वीकार केला आहे. परंतु त्यांनाही हे मान्य आहे की शरणागती हे ईश्वरी करुणेचे कारण नव्हे. ते एक फक्त निमित्त असते. एक दर्शनी कारण मात्र असते असे त्यांना वाटते. या निमित्ताद्वारे ईश्वरी करुणेच्या महापुराचा लोट साधकाकडे वळविणारे दरवाजे खुले होतात. जीवात्म्याची शरणागती आणि ईश्वराची करुणा या दोन, देशिकांच्या मते, एकामागून एक येणाऱ्या, एकमेकापासून वेगळ्या अशा, घटना मानू नये. त्या एकसमयावच्छेदेकरून घडणाऱ्या आणि माणसाच्या मुक्तीचा एकच सलग आलेख काढणाऱ्या घटना आहेत. श्री रामानुजांच्या कालानंतर दक्षिणेतील वैष्णवविचार बऱ्याच मतभेदांमुळे वादळवाऱ्यात सापडला. वरील दोन विवरणांत जो सूक्ष्म भेद आहे त्यातूनच हे वादविवाद उत्पन्न झाले आहेत.

जीवनातला शापाचा अंधार निवळला
मरणाला मृत्यू आला.
नरकाचा पाया ढासळला.
मृत्यूकरता आता इथे काहीच उरले नाही.
तमलांछित कलियुगही संपणार आहे.
पहा. पहा. ईश्वराचे सेवक –
समुद्रनील अशा आमच्या प्रभूचे सेवक –
जमले आहेत आणि गर्दी करीत आहेत
पृथ्वीवर – सर्वदूर
नाचत, गात – त्याचीच स्तोत्रे.'[४५]

हिंदू दैवतसमूहाकडे पाहण्याची नम्माळवारांची दृष्टी अर्थपूर्ण आहे. या दृष्टीत अनेक बदलत्या छटा असल्या तरी श्रीमन्नारायण हेच परब्रह्म होय ही त्यांची श्रद्धा केव्हाही ढळली नाही. इतर देवांची उत्पत्ती या परब्रह्माने केली असे ते म्हणतात. हे देव त्याची पूजा करतात आणि देव असले तरी ते त्याला पुरते जाणू शकत नाहीत.[४६] श्री नारायण हाच सर्वश्रेष्ठ असा विचार मांडताना ते पुढील पुराणकथेचा भाग वर्णन करतात– शिवाने ब्रह्मयाचे एक मस्तक खुडण्याचे घृणास्पद पाप केले. आणि ते पाप त्याची पाठ सोडीना, तेव्हा नारायणाने त्याला वाचवले.[४७] आदिमूळ असलेला नारायण जगाचा उद्धार करण्यासाठी उत्सुक असताना जग आंधळेपणे इतर देवांकडे वळतेच का याचे नम्माळवारांना नवल वाटते.[४८] सर्वांनी श्री नारायणाचीच उपासना करावी अशी हाक ते देतात. कारण सर्व माणसांनाच केवळ नव्हे तर ज्या देवांना ती माणसे शरण जातात त्यांनाही नारायणानेच निर्मिले आहे असे त्यांचे सांगणे आहे.[४९] लिंगोपासक शैव, जैन, बौद्ध आणि जे जे कोणी ईश्वराविषयी अंत न लागणाऱ्या निरर्थक चर्चा करतात ते– या साऱ्यांना विशेषकरून त्यांचा आग्रह आहे आणि त्यांना त्यांचे असे सांगणे आहे की ज्या कुणाला म्हणून ते देव मानीत असतील तो शेवटी श्रीनारायणच असतो.[५०]

असे असूनही, लोकांनी ब्रह्मा, विष्णू आणि शिव या त्रिमूर्तीचे कीर्तन करावे असा ते लोकांना उपदेश करतात. 'हे कीर्तन त्यांनी सतत चालूच ठेवावे आणि त्यांच्याविषयी अधिकात अधिक ज्ञान प्राप्त करून घ्यावे'[५१] असे नम्माळवारांचे सांगणे आहे. ते म्हणतात, 'सर्व देव ही नारायणाने घेतलेली ती ती रूपे आहेत.'–

'ईश्वर– सर्व देवतांचा अधिपती

---

(४५) तिरुवायमोळी ५.२.१. (४६) तत्रैव २.२.१०, २.७.१२, ४.१०.४. (४७) तत्रैव २.२.२. तिरुविरुत्तम ८६. (४८) तिरुवायमोळी ४.१०.१ (४९) तत्रैव ४.१०.२ (५०) तत्रैव ४.१०.५ (५१) तत्रैव १.३.६.

तो ईश्वर– त्यानेच आपले रूप निर्मिले–
अनेक वेगवेगळे देव मिळून.'[५२]
'मी ईश्वराचे कीर्तन कसे करू ?
ज्याला सारीच स्तोत्रे पोहोचतात
तो हरितवर्णाचा प्रभू असे का मी त्याला म्हणू ?
की शीतल चंद्राला जटेत मिरवणारा
असे त्या देवाला म्हणू ?
की चतुर्मुख ब्रह्मा असे म्हणू ?'[५३]

इथे श्री नारायण हा नम्माळवारांचा परमात्मा त्यांच्या दृष्टीला विष्णू–ब्रह्मा–शिव या त्रिमूर्तींच्या रूपात दिसतो. ते म्हणतात, 'लोकहो, कीर्तन करा. सारख्याच भक्तीने आणि एकाच वेळी कीर्तन करा. शिव, ब्रह्मा, इंद्र आणि साऱ्याच इतर देव-देवतांचे. ते देव म्हणजे सर्व विश्वात पसरलेली परमेश्वराचीच रूपे आहेत. त्या साऱ्यांची स्तुती गा, म्हणजे अंधारयुगाचा अंत होईल.'[५४] दुसरीकडे त्यांना परमेश्वराचे रूप शिव, ब्रह्मा आणि लक्ष्मी यांच्यात विभागलेले दिसते.[५५] याच्याही पुढे जाऊन श्री नारायणाचा उल्लेख ते 'त्रिनेत्र' असा[५६] करतात. सर्वसाधारणपणे या विशेषणाने शंकराचाच बोध होतो तरीही.

ही विधाने परस्परभिन्न आहेत. परमार्थचिंतनात गुंतलेल्या भाष्यकारांनी यात एकवाक्यता शोधण्याचा आणि नम्माळवारांच्या मते श्री नारायण हा आरंभाचाही आरंभ आहे हे सिद्ध करण्याचा खूप कष्टपूर्वक प्रयत्न केला आहे. 'श्री नारायण हेच परमतत्त्व होय' अशी नम्माळवारांची श्रद्धा आहे, यात मुळीच शंका नाही. परंतु त्यांच्या श्रद्धेच्या कक्षा गूढात्म जाणिवेत जेव्हा विस्तारू लागल्या तेव्हा प्रत्येक ठिकाणी आणि प्रत्येक वस्तुमात्रात, एवढेच नव्हे तर इतर लोक ज्या देवांची भक्ती करीत त्या देवांतही, इतरांना मान्य असलेल्या धर्मश्रद्धांतही, त्यांना नारायणच दिसू लागला :–

'प्रत्येकजण –
जशी त्याची बुद्धी त्याला वाट दाखविते
तसा स्वतःच्या देवाला भजतो आणि त्याला पावतो.
हे सर्व देव निर्दोष आहेत –
आणि त्यांना भजणारे भक्तही –
जो तो ज्याच्या त्याच्या मार्गाने

(५२) तिरुवायमोळी ५.२.८ (५३) तत्रैव ३.४.८ हरितवर्ण परमेश्वर म्हणजे विष्णू अथवा नारायण. शीतल चंद्राला जटेत धारण करणारा तो शिव. (५४) तिरुवायमोळी ५.२.१० (५५) तत्रैव ४.८.१ (५६) तत्रैव १०.१०.१.

अखेर त्या परमात्म्याच्याच चरणी पोहोचतो.'[५७]

'हे ईश्वरा,
तू निर्मिल्या आहेस उपासनेच्या कितीतरी वाटा
आणि निर्मिलेस माणसांच्या मनांतील विचारभेदातून
किती किती धर्मपंथ –
एकमेकांना विरोधी.
आणि त्या प्रत्येक धर्मात अनेक देवता
आणि अशा रीतीने तू निर्मिलीस
तुझ्याच रूपाची अगणित विविधता.
हे निरुपम प्रभो,
तुझी तुलना कुणाशीही होऊ शकत नाही –
मी माझी भक्ती तुझ्याचसाठी प्रज्ज्वलित केली आहे.'[५८]

तिरुविरुत्तम ही नम्माळवारांची सुरुवातीची कृती मानली जाते. त्यात नम्माळवारांनी वरील विचार मांडला आहे. साधनेच्या शेवटी त्यांनी साक्षात्काराची उंची गाठली तेव्हा ते निर्गुण प्रतिमांच्या आश्रयाने बोलू लागले. आणि अनिर्वचनीय अशा त्या परमतत्त्वाचा मार्ग दाखवू लागले :–

' सर्वदूर भोवती विस्तारलेली–
आभाळाची पोकळी तू आहेस.
खोलीच्या पलिकडील खोली.
उंचीच्या पलिकडील उंची.
तू आहेस ते अतिमहान तेज–उमलणारे–
पोकळी प्रकाशाने भरीत पार जाणारे–
तू त्याहूनही महान आहेस–आनंदाचे निधान,
मला वेढून असलेला
माझी आग्रही उत्कंठा तृप्त करीत–
तुला शोधणाऱ्या माझ्यातील 'मी'ला संपवीत.'[५९]

याच पोकळीला, या तेजाला, या आनंदमयतेला ते नारायण असे नामरूप देतात. या नारायणाकडे जाण्याचा जो मार्ग त्यांनी दाखविला आणि स्वतः अनुसरला तो शरणागतीचा आहे–सर्वस्वाचा त्याग करून उसळणाऱ्या तद्विषयक प्रीतीचा आहे. या शरणागतीतून आणि प्रीतीतून सत्याचा शोध घेत पिरपिरणाऱ्या क्षुद्र अहंतेचे रूपांतर अमर्याद आणि अनंत अशा साक्षात्कारी जाणिवेत झाले आहे.

(५७) तिरुवायमोळी १.१.५. (५८) तिरुविरुत्तम ९६. (५९) तिरुवायमोळी १०.१०.१०.

## प्रकरण नववे

# नम्माळवारांचे काव्य

नम्माळवार गूढवादी होते. गूढवादी 'सत्'च्या शोधात असतात. श्रद्धा आणि अंत:प्रेरणा यांच्या साहाय्याने त्यांना सत्ची प्रतीती होत असते. असे गूढवादी कवी केव्हा बनतात, याचे उत्तर देणे सोपे नाही. त्यासाठी आपल्याला काव्यविषयक उपपत्तीच्या जगात प्रवेश करावा लागेल. हे विश्व विशाल आणि गुंतागुंतीचे आहे. यात काव्याचे अनेक प्रकार आहेत; पातळ्या आहेत. या विश्वातून आपण बाहेर पडू तेव्हा कदाचित वाग्देवतेच्या उद्यानातील दवबिंदूंनी चिंब भिजलेले असू, परंतु चिकित्सेच्या सिद्धांतांचे आणि व्याख्यांचे धुके आपणाभोवती पसरलेले असेल. त्यामुळे मी येथे ती सैद्धांतिक चर्चा टाळत आहे. नम्माळवारांच्या काव्याच्या स्वरूपाचे सोदाहरण विवेचन करणे हा माझ्यासमोरील निकडीचा प्रश्न आहे.

'अनुवादाच्या माध्यमातून काव्याच्या आस्वादाला सामोरे जाणे, ही गोष्ट वकिलाच्या मध्यस्थीने प्रेयसीवर प्रेम करण्यासारखी आहे' असे रवींद्रनाथ टागोरांचे एक वचन आहे. मी नम्माळवारांवर येथे इंग्रजीतून लिहीत आहे त्यामुळे कवी म्हणून नम्माळवारांची गुणवत्ता काय होती याची कल्पना देताना माझ्यावरही आता अनुवादावर विसंबून राहण्याचा त्रिकट प्रसंग आला आहे. (काव्याशयाच्या अभिव्यक्तीला अनुवाद नेहमीच अपुरा पडतो आणि नम्माळवार यांच्या काव्याचा इंग्रजी अनुवाद जवळजवळ अशक्यच आहे असे श्री अरविंद यांनी आधीच दाखविले आहे.) नम्माळवारांच्या ग्रंथांचे धर्मसिद्धांतविषयक आणि बुद्धिवादी विश्लेषण महान मणिप्रवाळ टीकाकारांपासूनच सुरू झाले आणि आजतागायत चालूच आहे. परंतु त्या चिकित्सेच्या स्वरूपामुळे नम्माळवारांचे एक कवी म्हणून महत्त्व काही प्रमाणात झाकोळले गेले आहे. धर्मसिद्धांत आणि काव्य यांत अधिक श्रेष्ठ काय हा इथे प्रश्न नाही. त्याचप्रमाणे नम्माळवार कवी म्हणून अधिक श्रेष्ठ की रामानुजांच्या वैष्णवी विचारपंथाचे पूर्वाचार्य–धर्मोपदेशक संत–म्हणून अधिक श्रेष्ठ हाही प्रश्न नाही. अशा चर्चांना अंत असण्याचा संभव नाही आणि त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. मला इथे एवढेच म्हणावयाचे आहे की नम्माळवार यांच्या जीवनाला दुसऱ्या कितीही कक्षा असल्या आणि त्या प्रत्येक कक्षेत त्यांना मोठी प्रतिष्ठा असली, तरी त्याबरोबरच ते एक कवीही होते आणि तामीळ साहित्याला त्यांचे फार मोठे योगदान आहे.

प्लेटोच्या तत्त्वचर्चेत जेव्हा सारथी येतो किंवा गुहेचे प्रतीक येते अथवा भौतिक जगाची क्षणभंगुरता सिद्ध करण्यासाठी शंकराचार्य जेव्हा रज्जुसर्पन्यायाचा आधार घेतात तेव्हा तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्र यांच्या चर्चेला काव्याची डूब मिळते, परंतु

प्रत्यक्षात धार्मिक सिद्धांत आणि तात्त्विक चर्चा ही काव्य असू शकत नाहीत. काव्याचे जग ही एक जादूनगरी असते. या नगरीत प्रवेश मिळण्यासाठी अमूर्त कल्पनांना प्रथम अनुभवांचें प्रामाण्य प्राप्त व्हावे लागते. आणि नंतर या अनुभवांचे भावनेशी, नयनगोचर आणि श्रवणगोचर अशा जगाशी नाते जुळण्यासाठी त्यांना शब्द आणि लय यांचे माध्यम सापडावे लागते. नम्माळवारांच्या बाबतीत ही जादू घडते.

आपण कवी असल्याचा दावा नम्माळवार स्वतः मात्र क्वचितच करतात आणि जेव्हा करतात तेव्हाही ते आपली कविता ईश्वरापासून स्रवते असेच म्हणतात.

'म्या पामरे काय बोलावे ?
माझ्या जीवनातील जीवतत्त्व, त्या जीवनाशी एकरूप असा,
तोच माझ्या शब्दांनी काव्य रचतो.
नव्हे, ते शब्दही त्याचेच आहेत
त्याच्याच शब्दांनी तो त्याचे कीर्तन करतो.'[१]

तितक्याच दृढपणे नम्माळवार असेही मानतात की आपले सारे काव्य हे 'त्याच्या'च चरणाकडे धाव घेत आहे आणि तो म्हणजे चक्रधारी परमेश्वर.[२] कवींनी माणसाचे गोडवे गाणे सोडून द्यावे असे आवाहन नम्माळवार करतात. आपण चिरंजीव आहोत अशा गोड भ्रमात मनुष्य जगतो; आत्मगौरवाचे पिसारे फुलवितो आणि धनदौलतीलाच श्रेय मानण्याची चूक करतो. 'अशा माणसाचे गोडवे गाण्यात काय अर्थ आहे' असे नम्माळवार विचारतात.[३] नम्माळवार कळकळीचे आवाहन करतात, "कवींनो, या. तुम्हाला जगायचे आहे तर हातांनी कष्ट करा. निढळाचा घाम गाळून आपली भाकरी कमवा. श्रीमंतांची स्तुतिगीते कशासाठी गावयाची ? आणि खरे म्हणाल तर या विश्वात श्रीमंत तरी कोण आहे ? मला तर कोणी दिसत नाही. तुम्ही तुमच्या दैवतांची थोरवी गा. परमेश्वर श्रीलक्ष्मीचा पती आहे. ज्वलंत विजेसारखा लाल माणकांचा मुकुट त्याच्या मस्तकावर विराजतो. तुमची सारी स्तुतिगीते त्याला पोहोचतील.'[४] नम्माळवार पुढे म्हणतात, 'माझ्या-पुरते म्हणाल तर मी माणसाचे गोडवे केव्हाही गाणार नाही. माणूस म्हणजे एक मायाभ्रम आहे. मी त्याचे गुणगान गाईनच कसा ? "[५] ही विचारधारा सनातन आहे. (जुन्या करारात म्हटले आहे) 'कोष्टयाच्या धोटयाच्या वेगापेक्षाही अधिक वेगाने माझे दिवस संपले, नाहीसे झाले... माझे सारे जीवन हे फक्त एक निःश्वास आहे हे ध्यानात असू दे.'[६] 'पृथ्वीवर उभा असणारा प्रत्येक मनुष्य म्हणजे

---

(१) तिरुवायमोळी ७–९–२.
(२) तत्रैव : ३–९. (३) तत्रैव ३–९–२. (४) तत्रैव ३–९–६.
(५) तत्रैव ३–९–८. (६) The Book of Job : 7–6

वाऱ्याचा एक झोत आहे. जो जो चालताना दिसतो तो माणूस म्हणजे एक छाया आहे.'[७]

अर्थातच असा विचार फक्त मनुष्यच करू शकतो. फक्त माणसालाच मायेच्या क्षणिकतेची जाण असते. चैतन्य आणि ज्या नश्वर देहात ते बंदिवान असते तो देह, या दोन्हींतील भेद भक्त माणूसच ओळखतो. जे जे म्हणून मानवी असते ते ते काव्याचा विषय होऊ शकते. मग तो इहलोकीच्या मानवी जीवनाविषयी कमालीचा असंतोष का असेना ! नम्माळवारांच्या काव्यात काही ठिकाणी हे घडले आहे.[८] त्यांच्या दृष्टीने मनुष्याचे अस्तित्व विजेच्या लोळाप्रमाणे अस्थिर आणि क्षणिक आहे आणि इहलोकीचे जीवन हा फक्त देखावा आहे. 'पावसाच्या धारेबरोबर दिसणारा आणि फुटणारा बुडबुडा आहे.'[९]

वार्धक्यातील कारुण्य आणि वैय्यर्थता यावरही नम्माळवारांनी लिहिले आहे. तारुण्य आणि श्रीमंती यांतील समृद्धीच्या तोऱ्यात जो खाण्यापिण्यात जीवन व्यतीत करतो, मृदू आवाजाच्या स्त्रियांची मिष्टान्नाने भर करतो तोच वार्धक्यातील दारिद्र्यात स्वतःचा वाळून गेलेला काटकुळा हात घासभर अन्नासाठी पुढे करतो.[१०] राजदरबारी दणाणणारा ढोल आता शांत झालेला असतो.

'ज्यानी या पृथ्वीवर अधिसत्ता गाजविली–
ते अपरात्री भटकत आहेत.
रस्त्यातील काळी कुत्री–
त्यांच्या तंगड्यांचे लचके तोंडीत आहेत.
त्यांच्या हातात आहेत फुटकी खापरे–
भीक मागत आहेत ते अन्नासाठी सारे
सगळ्या जगासमोर.'[११]

अळवार ज्या चिरंतनाचा शोध घेतात त्याचा आरंभ अशा कल्पनाविलासातून (आणि या कल्पना प्रतिमांतून पुढे प्रत्यक्ष झालेल्या दिसतील) होतो आणि त्यात ऐहिकाचा धिक्कार जाणवतो. नम्माळवारांच्या आधीचे संगमयुगातील[१२] कवी

---

(७) बायबल, स्तोत्रे ३९–५–६.

(८) 'सत्‌चा प्रवास' या प्रकरणातील पहिला परिच्छेद पहा.

(९) तिरुवायमोळी १.२.२ आणि ४. १. ६. (१०) तत्रैव ४. १. ७.

(११) तत्रैव. ४. १. १.

(१२) याला अपवादही आहेत. 'तिरुमुरुकत्‌म्पडइ' आणि 'परिपदल'च्या काही कविता ईश्वरासंबंधी आहेत. परंतु अळवार आणि नायनमार यांच्या काव्यात जे वैयक्तिक गुंतलेपण आणि जी वेदनात्म ओढ दिसते ती या काव्यात फारशी दिसत नाही.

निसर्ग आणि मानव यांच्या चिंतनात गुंतलेले दिसतात. आसमंताचे निरीक्षण करून बारीक तपशील नोंदणाऱ्या त्यांच्या दृष्टीपुढे जीवनाचे बहुढंगी नाटय उलगडत असताना त्यांना निसर्ग हा रंगभूमीच्या स्वरूपात आणि मानव हा नटाच्या स्वरूपात भावत होता. या कवींपासून नम्माळवार दूर गेलेले दिसतात. गूढवादी आणि धार्मिक काव्य लिहिणाऱ्या समकालीन कवींच्या गटात ते मोडतात. ऐहिक अस्तित्वामागील चिरंतनाचा शोध घेणे हा त्यांचा युगधर्म होता. हा शोध घेणाऱ्यांत नम्माळवार हे सर्वश्रेष्ठ होते.

ऐहिकाचे अस्तित्व नाकारणे, त्याचा धिक्कार करणे, या ध्रुवापासून त्या ध्रुवापर्यंत आपण अज्ञानाच्या अंधारात बुडालो आहोत असे मानणे, यातूनही काव्य-निर्मिती होऊ शकते हे खरे, फक्त त्यासाठी या जाणिवांचे नाते चिरंतनाच्या विश्वाशी जोडण्याची प्रतिभा कवीजवळ हवी. नम्माळवारांच्या बाबतीत नेमके हेच पुन्हा पुन्हा घडले आहे. एक उदाहरण घेऊ. इथे ऐंद्रिय सुखोपभोगांची निरर्थकता अशा तपशिलांनी व्यक्त केलेली आहे की त्यातून अमूर्ताला स्पर्श होऊ नये.

'आणि ते, जे मशगूल राहिले–
गोड आलिंगनात –
रत्नालंकृत सुंदरींच्या, मृदुकेशिनींच्या.
कळण्यापूर्वीच की आपण कुठे आहोत–
ते भटकत आहेत, भग्न, परित्यक्त–
टिंगल होत आहे त्यांची,
थव्याकडून–सामान्यांच्या '[१३]

माणसांतील नाती ही अतृप्तिकारक असतात ही कल्पना पुढील शब्दांत व्यक्त होते.

'त्या स्त्रिया, ज्यांच्याशी आम्ही लग्ने केली,
ती आमची मुले, भाऊबंद–
आम्ही त्यांना भेटतो– दूर जातो.
त्या प्रत्येकाला अंत आहेच;
मग प्रीती कुठे ?– कुठेच नाही.[१४]

ईश्वरी करुणा आपणासमोर येते ती 'शीतल, मृदुल, विस्तीर्ण पुष्पशय्ये'-सारखी येते.[१५] आपल्याजवळ जेव्हा संपत्ती येते तेव्हा आपल्याला मदत करण्याच्या मिषाने नातेवाईक आणि दुसरेही इतर आपणाभोवती जमतात, पण ते म्हणजे जळवाच असतात. आणि त्यांच्याप्रमाणेच आपले रक्त पितात.[१६] हे जग काटेरी

---

(१३) तिरुवायमोळी ४.१.५ (१४) तत्रैव ९.१.१ (१५) तत्रैव ४.१.५
(१६) तत्रैव ९.१.२.

जाळी आहे. ते सुटकेचा मार्ग नसलेला चक्रव्यूह आहे.[१७] पाच ऐंद्रिय जाणिवा म्हणजे एक फसवे मायाजाल आहे; जणू असाध्य अशा पाच रोगांची पाती असलेली ती गिरणी आहे. आणि ती निर्घृणपणे आपणाला भरडून काढीत आहे.[१८]

इथे ऐहिकाचा धिक्कार आहे काय ? असे दिसते खरे. परंतु ज्या ऐहिकाकडे पाठ फिरविण्याचा प्रयत्न अळवार करतात त्याच ऐहिकातून निवडलेल्या दृष्टांतांच्या आधारे ते तो विचार मांडतात. अळवारांच्या दृष्टीने जग हे प्रथम एक मायारूप मृगजळ आहे. परंतु असे म्हणता म्हणताच अळवार त्याचे वर्णन करू लागतात आणि भ्रमनिरास हा मूर्ताचा आकार घेतो.

अळवार जेव्हा ‘सत्’चा शोध घेत जातात, तेव्हा त्या शोधाची ओढ त्यांना ग्रासून टाकते. त्यांना ही ओढ चौफेर फैलावताना दिसते आणि भोवतालच्या निसर्गातील वस्तुमात्राला आच्छादताना दिसते. पुढील ओळींवरून हे स्पष्ट होईल—

‘अरे, खाजणाकाठच्या बिचाऱ्या बगळ्या,
जिथे लांब लाटा वळकटतात, तिथे तू उभा आहेस;
लाटा—निरंतर; न थकता स्वतःच्या शोधात असणाऱ्या.
माझी आई झोपते,
न झोपणारे देवही स्वर्गात झोपतात,
पण तू झोपत नाहीस.
तू माझ्यासारखा आहेस का ?
प्रीतीच्या वेदनेत सापडलेला ? फिकुटलेला ?
तूही तुझे अंतःकरण ईश्वराच्या प्रेमात हरवून बसला आहेस ?’
‘हे प्रेमपाखरा,
तुझे सूर तीव्र, काळीज कापीत जाणारे—
आणि शोकभरे—
रात्रीच्या सर्व प्रहरातून ऐकू येतात.
तूही स्वतःला ईश्वराच्या प्रेमात हरवून बसला आहेस ?
तुलाही ओढ लागली आहे—
त्याच्या कंठातील कुसकरलेल्या तुलसीदलाच्या सुगंधाची ?
केवढे हे आश्चर्य ! अशांत सागरा,
की तूही क्रंदन करावेस, रात्रंदिवस !
तूही ईश्वराला हरवून बसलास ?
आणि माझ्यासारखा शोधीत आहेस वेदना भोगत ?
त्याच्या पावलांच्या आश्रयासाठी तहानलेला आहेस ?

(१७) तिरुवायमोळी ३.२.९ (१८) तत्रैव ७.१.

ज्याने लंका जाळली आणि खड्गबळाने जिंकली त्याच्या ?
' हे भणाणणाऱ्या वाऱ्या,
तू सतत हिंडत असतोस–
दिवसां– झगमग प्रकाशांत–
आणि रात्रीं– तारकांच्या चमचमाटात–
शोधीत– आंधळ्यासारखे चाचपडत–
सागरावर, पर्वतावर, आभाळाच्या पोकळीत,
तूही माझ्यासारखाच अस्वस्थ, कावराबावरा–
युगामागून युगे–
तेजोमय चक्र धरणाऱ्या प्रभूच्या प्रीतीपायी ?
' हे अंतराळा, तूही धन्य !
तूही आमच्याचसारखा अश्रूत विरघळून -
त्या अप्राप्य प्रभूच्या–
प्रीतिवलयात अडकून पडलास ?
' विचाऱ्या चंद्रा ! तू क्षयाचा बळी झालास–
आपले सारे तेज गमावून बसलास
तू निरर्थक थांबला आहेस–
काळ्या आकाशाला झाकोळणाऱ्या अंधारात.
का रे तू सुद्धा आमच्यासारखाच
त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवलास ?
त्याचे शब्द– जे खरोखरीचे सत्य आहे ?
मग दुसरे काय ?
तूही त्याच्यावर विश्वास ठेवलास काय ?
आणि तेजोमय चक्र धारण करणाऱ्या–
त्या ईश्वरासाठी झुरत आहेस काय ?
' हे अंधारमय वैरिणी निशे
तू चिरंजीव हो.
तू आमंत्रणाशिवाय येतेस आमच्याकडे.
आम्ही–ईश्वरासाठी हृदये हरवून बसलेले,
निराधार, अश्रू ढाळणारे.
त्याच्या क्रूरतेत तू तुझी क्रूरता मिसळतेस–
तू चिरंजीव हो. '[१९].

---

(१९) तिरुवायमोळी २.१.

असे वाटते की हे अळवार एकटेच नाहीत, तर त्यांच्याबरोबर सारे विश्वच ईश्वराला स्पर्श करण्यासाठी व्याकुळ झाले आहे.

या काव्याची रचना प्रेमगीतासारखी आहे. प्रेमात पडलेली स्त्री किंवा अधिक नेटक्या शब्दात सांगायचे तर प्रेमात पडलेल्या स्त्रिया हे भाव व्यक्त करीत आहेत. स्त्री आणि पुरुष यामधील प्रेमच केवळ नव्हे तर माणसातील साऱ्याच नात्यांना नम्माळवारांनी ईश्वराकडे नेणाऱ्या मार्गाचे रूप दिले आहे. नवल असे की मुळात त्यांना भावली होती ती या नात्यांची क्षणिकता आणि त्यांची अविश्वसनीयता, 'तिरुविरुत्तम' हे त्यांचे काव्य ईश्वराचे वर्णन जगन्माता, जगत्पिता, लक्ष्मीपती असे करते. या स्वरूपात ईश्वर त्यांच्या तपाला सफल करतो, त्यांना जे हवे असेल ते प्राप्त करून देतो. काळाच्या आरंभापासून जे जन्ममरणचक्र सुरू झालेले असते, त्यातून त्यांना मुक्त करतो. या अंत नसलेल्या परंपरेचा अंत करतो.[२०] तिरुवायमोळी या ग्रंथात या ईश्वरस्वरूपाचा, या अप्रतिम गूढतत्त्वाचा निर्देश 'जीवनाचे जीवतत्त्व' असा तर केला आहेच; पण त्याबरोबरच त्याचे वर्णन नम्माळवारांना जन्म देणारी जगन्माता म्हणून, जगत्पिता म्हणून, अज्ञेयाची अनुभूतो देणारा ईश्वर म्हणूनही केले आहे.[२१]

पुढील काव्यात ईश्वर 'राजा' बनून येतो :—

एक दिवस सत्ता गाजवून संपून जाणाऱ्या
या पृथ्वीवरील सम्राटांप्रमाणे
सूर्य अस्तास गेलेला आहे.
अंधार प्रस्थापित झालेला आहे.
हे महाराजा, आम्ही आता करावे तरी काय ?
साऱ्या जगाचे मापन तूच केलेस,
हे स्वर्गीच्या सम्राटा,
तू आणि फक्त तूच एक सम्राट आहेस.
आम्हावर तुझी कृपा असू दे.
पण तू तर...अरेरे—
आम्हाला टाकून दिले आहेस—
आमची प्रतारणा केली आहेस.
आणि आता फक्त अंधार तेवढा पसरला आहे.'[२२]

आणखीही हे वर्णन पहा : 'ईश्वर राजा आहे. त्याच्या अविच्छिन्न आणि अतुलनीय अशा राजदंडाची सत्ता सात लोकांवर (जगावर) चालते. त्याच्या

---

(२०) तिरुविरुत्तम ९५
(२१) तिरुवायमोळी २.३.२ (२२) तत्रेव. ८०

सत्तेला मर्यादा नाही. ती कधीही क्षीण होत नाही.'[२३] त्याचप्रमाणे ईश्वर हा 'सर्वज्ञ आहे. स्वतःच्या बुद्धीनेच गोंधळून गेलेल्या जगाकरता तो ईश्वर त्याच्याकडे घेऊन जाणाऱ्या साऱ्या वाटा स्वच्छ करतो.'[२४] ईश्वर एखाद्या आचार्याप्रमाणे प्रकाश दाखवितो. तो सदैव साथ देणारा मित्रसुद्धा आहे.[२५] या सर्वाहूनही अधिक म्हणजे परमेश्वर हा प्रियकर आहे. नम्माळवार त्याला शोधतात. त्याच्यासाठी झुरतात. मानवी वासना ही अत्यंत मूलभूत अशी ओढ आहे. ती स्त्री-पुरुषांना एकत्र ओढते. पण ही वासना नम्माळवारांच्या काव्यांत ईश्वराविषयीची त्यांची ओढ व्यक्त करणारे प्रतीक, त्यांनी वापरलेल्या सर्व प्रतीकांतील अधिकतम स्पष्ट असे प्रतीक बनते. तिरुविरुत्तम आणि तिरुवायमोळी या दोन्ही काव्यांत अशा अनेक जागा आहेत. तेथे नम्माळवार स्वतःचे विचार याच प्रतीकाने स्पष्ट करतात. ज्या ज्या वेळी ते या प्रतीकाचा वापर करतात तेव्हा ते या मानवी प्रीतीलाच एक प्रगाढ स्वरूप देतात. हे प्रगाढत्व एवढे महान, एवढे शक्तिशाली असते की या प्रीतीचा उगम जरी पृथ्वीवर होत असला तरी आपण तिच्या प्रवाहाबरोबर अतीताकडे जातो. नम्माळवार त्यांच्या नकळत एकाच वेळी दोन पातळ्यांवर विहरत असतात. पार्थिव प्रीतीचे त्यांचे वर्णन इतके हुबेहुब, प्रत्ययकारी असते की ते केवळ कृत्रिम आध्यात्मिक रूपक राहात नाही. मन हेलावून टाकणारी जिवंत शक्ती त्यात असते. आणि हे करीत असतानाच नम्माळवार या प्रतीकाला दैवी आशयाने सतत ओत-प्रोत भरलेल्या अवस्थेत सादर करतात. त्यामुळे पार्थिव प्रीतीची केवळ आणखी एक कविता एवढेच त्यांच्या काव्याचे स्वरूप राहात नाही. त्या प्रतीकाचे आपोआप उन्नयन होते.

तरीही पार्थिव प्रीतीच्या वर्णनाचे सारे तपशील आणि आवेग त्यात कायम असतात. त्यामुळेच त्याला काव्यात्मता येते. प्रेमवश असणाऱ्या कुणा स्त्रीप्रमाणे नम्माळवार स्वतःच्या प्रियकराला संदेश पाठविण्याचा प्रयत्न करतात. संदेश नेणारे दूत भोवतालच्या निसर्गातून निवडलेले असतात. पक्षी, मेघ, मधुमक्षिका, वारा असे हे दूत. नम्माळवारांची नजर या प्रत्येकावर असतेच.

'हे क्रौंच पक्ष्या, किती सुंदर तुझे पंख !
किती निरागस, किती कोवळे तुझे काळीज !
तू आणि तुझी ही रूपमती प्रिया,
माझ्यावर एवढी करा दया
माझे दूत व्हा आणि त्या प्रभूकडे जा'[२६]

---

(२३) तिरुवायमोळी ४.५.१ (२४) तत्रैव ४.८.६
(२५) तत्रैव ७–५–९. (२६) तिरुवायमोळी. १-४–१.

एखादा पक्षी आपली उपेक्षा करीत आहे असे नम्माळवारांना वाटले तर ते सतात:–

'हे इवल्या पक्ष्या, तूच आहेस तो.
मी ओळखले तुला,
तू माझ्या विश्वासाला खोटा ठरलास.
माझ्या वेदनेची कहाणी माझ्या प्रियकराकडे न्यायला–मी तुला विनविले.
तू ते काम केलेले नाहीस.
मी नि:सत्त्व झालो आहे. हरवलो आहे.
हरवून बसलो आहे–
माझा रसरशीत वर्ण आणि माझे सौंदर्य.
कशाला थांबलास तू ? दूर जा.
दुसरा कुणीतरी शोध.
जो गोड घास घेऊन येईल रोज–
तुझ्या गळयाच्या पिशवीत सोडण्यासाठी.'[२७]

नम्माळवार कोकिळांना म्हणतात,

'प्रेमी कोकिळ युगलांनो,
मूक राहाणे तुमच्या स्वभावातच नाही.
माझा संदेश घेऊन प्रियकराकडे गेलात,
तर तुमचे काय उणे होईल ?
अखेर मला तुमच्याकडून असे काय हवे आहे ?
तुम्ही माझ्या प्रियाकडे जावे, त्याला सांगावे—
'ही मी इथे आहे : असहाय—
माझ्याच पूर्वकर्मामुळे
त्याच्या चरणांची सेवा करायला असमर्थ.
आणि मी दूरदूरच जात आहे. त्याच्यापासून दूर.
माझ्याच प्राक्तनाचा भार वहात.'[२८]

नम्माळवार नंतर महानरिल पक्ष्यांना म्हणतात—

'हे महानरिल पक्ष्यांनो,[२९]
मला तुम्ही हे वरदान देणार किंवा नाही ?
माझ्या प्रियाकडे माझा संदेश घेऊन जाण्याचे ?
पण मी त्याला निरोप तरी काय देऊ ?

---

(२७) तिरुवायमोळी १–४–८. (२८) तत्रैव १–४–२ (२९) तामीळनाडूतील पक्षिविशेष

तो मेघश्याम, तमोनील, माझा नाथ—
माझी अवस्था आधीच जाणतो.
आणि तरीही माझ्यावर करुणा करीत नाही.
'तुझी वेदना निश्चितपणे नाहीशी होईल.'
एवढे आश्वासनही देत नाही,'[30]

नम्माळवार गोंधळून गेल्यासारखे पुढे विचारतात :—'कोण बरे माझा संदेश घेऊन जाईल ? इथं कुणीच नाही का ?' जवळच एक मधमाशी गुंजारव करीत असते. तिला नम्माळवार म्हणतात,

'हे फुलवेडया मधुमक्षिके,
किती आकर्षक तुझ्या रंगरेषा आणि तुझी भिरभिर !
जा, आणि तुझी आणि त्याची—
त्या चक्रपाणीची — भेट झाली—
तर कृपा करून त्याला सांग,
"तू फार उशीर करीत आहेस
तिचा जीवनप्रवाह सुकण्याआधी तिजवर कृपा कर.
तुझ्या गरुडावर आरोहण करून ये.
त्याचे पंख सागराइतके रुंद पसरलेले असतील.
या इवल्या पायवाटेकडे ये. इथे ती उभी आहे."'[31]

भिरभिरता वारा नम्माळवारांना स्पर्श करतो. अरेच्चा ! हा तर वाटेल तिकडे जाऊ शकतो. हा नेऊ शकेल संदेश, तेवढयात वाऱ्याची एक झुळूक नम्माळवारांना स्पर्श करते. पण तिच्याबरोबर जो निरोप पाठवायचा तो नम्माळवारांच्या कंठात रुद्ध होतो. त्यांना शंका येते या वाऱ्यानेच काही दु:खद वार्ता आणली असावी ईश्वर म्हणजे अनंत कृपेचे निधान. त्याचे चरण म्हणजे सदा प्रफुल्ल पद्मे. त्या अम्लान कमलांना भेटायची जेवढी ओढ जीवाला असते तेवढीच त्याला मुक्त करण्याची ओढ त्या दयानिधान ईश्वराला हवी. पण 'तो ईश्वर आता उदासीन झाला आहे. स्वत:चे ब्रीद विसरला आहे. नम्माळवाराला विसरला आहे' अशी वेदनावार्ता वाऱ्याने आणली असावी असे वाटून नम्माळवार म्हणतात, "असे असेल तर बा मारुता, तू हिमशीतल होऊन या माझ्या देहाचे तुकडे करून टाक. मला मरू दे."[32]

नम्माळवार जेव्हा जेव्हा नववधूचे प्रतीक वापरतात तेव्हा तेव्हा ही आर्तता त्या प्रतीकाला व्यापून राहाते, त्याला चैतन्य देते. झुरणारी प्रिया अशा प्रियकराच्या प्रेमात पडल्याबद्दल स्वत:लाच दोष देत आहे अशा आशयाच्या या पुढील ओळी पहा:—

'सारे गावठाण झोपले आहे.

(३०) तिरुवायमोळी १-४-४ (३१) तत्रैव १-४-६ (३२) तत्रैव १-४-९

सारे विश्व अंधाऱ्या मध्यरात्रीत बुडाले आहे.
सारा अनादि–अनंत काल, हिच्यातच साठल्यासारखी
ही रात्र लांबत आहे, लांबतच आहे.
'तो' जर आला नाही तर–
मला वाचवील असा दुसरा कोण आहे ?
मी तर ही अशी पातकी,
पूर्वेला आपल्या रथावर आरूढ होऊन
तो रविराज कधीच का येणार नाही–
लाल रंग उधळीत ?
या रात्रीला कधीच का अंत नाही ?
ती अशी पुढे-पुढेच जात राहणार काय ?
मरत मरत–माझ्याचसारखी–
अंशा अंशाने–
कणाकणाने ?
सारे जग झोपले आहे. थंड, उदासीन.
पण मी जागी आहे.
अरे माझ्या वेड्या मना,
तू त्याच्या प्रीतीत का पडलास ? का ?[३३].

याच सुरावरील आणखी दुसरे गीत पहा,–

जाईगंधाने लहडलेला दक्षिणवारा मला कट्यारी मारीत आहे.
कुरिंजिप्पनचे[३३*] आर्त सूर संध्यारंगावर तरंगत आहेत.
संध्या लालुसली आहे.
मला धुंद करीत आहे.
पश्चिमेचे संदीप्त मेघ.
मला फाडून टाकीत आहेत.
माझा प्रियकर, तो जादुगार परमेश्वर.
त्याचे डोळे त्या निळ्या कपळांसारखे आहेत काय ?
हे खांदे–ही स्तने–
त्याने चुंबिली आहेत.
आणि आता आम्हाला कळत नाही–
आम्ही कोणाला शरण जावे ?
स्वर्गीय मधुकराने ज्यात मधुपान केले,

---

(३३) तिरुवायमोळी ५–४ (३३*) तामीळ विरहगीत.

आणि ज्याला विशीर्ण केले–
ते फूल मी आहे.
हे सारे कोणी कसे सोसावे ?
हे माझे मनही आता माझे राहिले नाही.
मला त्याचा काहीच उपयोग नाही.
आणि मला समजत नाही–
आता कोणाला शरण जावे ?'[३४]

या काव्यात भावाभिव्यक्ती स्त्रीमुखी आहे. कधी ही स्त्री एकटीच नसून तो एक स्त्री-समुदाय आहे. ही अभिव्यक्ती कधी ईश्वराला तर कधी स्वतःला, कधी भोवतीच्या स्थिर वस्तूंना तर कधी चर वस्तूंना उद्देशून आहे. कधी मनीचे भाव स्वतःच्या आईला सांगितले जातात, तर कधी गावठाणातील साऱ्याच आयांना. कधी नायिकेचे भाव तिची सखी व्यक्त करते तर कधी माता. सखीच्या किंवा लेकीच्या व्याकुळ अवस्थेने त्या गोंधळलेल्या असतात. दुःखी असतात. अशा तऱ्हेने नाट्यमय भावगीतांची एक मालिकाच तयार होते. शब्द वेगवेगळ्या व्यक्तींच्या मुखांतून निघतात पण त्या सगळ्यांना तीच एक वेदनाकहाणी सांगायची असते. ही कहाणी म्हणजे ईश्वराविषयी नम्माळवारांना वाटणारी कमालीची तीव्र उत्कण्ठा.

प्रेयसी प्रियकराला पुन्हा पुन्हा हाक देत असते. पण प्रतिसादच येत नाही.

' मी इथे तुला हाका मारीतच आहे.
सतत. सर्वकाळ. मस्तकाला दोन्ही हातांचा आधार देऊन
मोठमोठ्याने हाका मारीत आहे.
पण तू येत नाहीस.
आणि माझ्या डोळ्यांना तुझे ते रूपडे दिसत नाही.
माझ्या हाकेला तू उत्तरही देत नाहीस.
मी हाका मारीतच राहाते–
" ये रे. माझ्या दृष्टीसमोर ये.
तप्त सुवर्णासारखे तेजाळ तुझे रूप
आनंदाने नाचणारे–कमलासारखे तुझे डोळे..."
मी बोलावीतच राहाते–सारी लाज सोडून–
पण माझ्या बडबडण्याचा इथे काय उपयोग आहे ?
तो तर अगोचर आहे बुद्धीला–
अमर अशा देवांच्याही. '[३५]

या विरहीणी गाणारी स्त्री (–जी 'नायकी' म्हणून ओळखली जाते)

---

(३४) तिरुवायमोळी ९–९–१–४ (३५) तत्रैव ४–७–१–४.

गावटाणातील गुरुजनांशी बोलत असते. तिला समजून घेण्याची शक्ती त्यांना नसते. तिच्या प्रीतीचा विलक्षण उन्माद त्यांच्या संतापाला कारण होतो.

' का गे आयांनो माझेवर रागावलात ?
ज्या क्षणी मी त्याला–
त्या तिरुक्कुरुंगुडीच्या [३६] स्वामीला–पाहिले.
चक्रधारी–शंखधारी–कमलनयन–
बिंबफळासारखे लाल ओठ असणाऱ्या त्याला–
माझ्या नाथाला–
तेव्हाच माझे हृदय त्याचे मागे गेले.
मी त्याला काय करू ?
या, आणि माझ्या या मनातून बघा,
म्हणजे तुम्हालाही दिसेल,
की माझ्यासमोर सर्वदूर
तोच माझा प्रियकर उभा आहे.
आयांनो, मला रागावू नका.
मी गोंधळले आहे. शिणले आहे.
माझ्या डोळ्यांत आणि माझ्या मनात
सतत तोच उभा आहे–
त्याचे विजयी धनुष्य घेऊन–
आणि शंख, चक्र, गदा आणि खड्गहीं.[३७]

प्रेमव्याकुळ नायिकेने आपल्या सख्यांना संबोधून म्हटलेल्या पुढील काव्य-पंक्ती पहा–

हे हरिणाक्षींनो, माझ्या जिवलग सख्यांनो,
मला सांगाल का ?
मी पापिणी आहे तरी,
त्याच्या प्रीतीने क्षीण झाले तरीही,
मी त्याचेशी केव्हा वरे एकरूप होईन ?
तो माझा प्रियकर–तिरुवल्लवाळ[३८] येथे निवास करणारा–
जिथले आकाश सुभग तालवृक्षांनी
संमार्जिले जाते
जिथे मधुमयी जुई-फुलांचा गंध मधुरतो–

---

(३६) तिरुनेलवेली जिल्ह्यातील एक गाव. (३७) तिरुवायमोळी ५.५.
(३८) केरळातील एक गाव

तिथल्या निवासी—तो माझा प्रियकर—
मी त्याच्यात केव्हा विरून जाईन ?
अग सख्यांनो,
तुम्ही मला बोल लावता त्याचा काही उपयोग नाही.
तिकडे तिरुवल्लवाळमध्ये तो उभा आहे.
जिथे दक्षिणेचा वारा
सोनेरी 'पुन्नाङ्' फुलांना कुरवाळतो,
वकुळ आणि माधवीलतेला आलिंगन देतो,
त्यांच्या गंधांनी लहडून भारावतो.
त्या माझ्या प्रियकराची पायधूळ,
केव्हा बरे माझ्या मस्तकी पडेल ?[३९]

सखीलाच उद्देशून असलेली ही आणखी एक कविता:—

'गावठाण माझ्याबद्दल तिरस्कार पसरवीत आहे—
पण त्या जननिंदेचे फक्त
माझ्या मनाच्या शेताला खतपाणी होते.
माझ्या आईचे संतापाचे शब्द या शेताला शिंपतात.
प्रीतीच्या साळीचे जिवंत बीज—
जे त्याने तिथे पेरले आहे—
ते अंकुरले आहे—वाढले आहे.
सागरासारखे विस्तीर्ण.
पण माझा तो घनश्याम प्रियकर—
सख्यांनो, आता निष्करुण होत चालला आहे.'[४०]

ही प्रेयसी प्रियकरावर नाराज झाल्याचे, रागावल्याचे मिष करते—अगदी एखाद्या लहान मुलीप्रमाणे बोलते. तिच्या प्रियकराने तिला आणि तिच्या मैत्रिणींना फसविले आहे. आणि याहूनही दुःखद गोष्ट म्हणजे त्या जे जे करतात—खेळात वाळूची इवली घरे बांधतात, भातुकलीत स्वयंपाक करतात—त्या साऱ्याबाबत तो उदासीन आहे. 'नाही. नाही,' नम्माळवार म्हणतात, 'तुझ्या प्रेमाशी माझा काहीच संबंध नाही. आता हे पुरे झाले.' या आक्रंदनाचा प्रतिध्वनी कितीएक मानवी मनांतून उमटत असतो. माणसे कल्पनेच्या विश्वात जी मनोराज्ये करतात त्यांच्या बाबतीत ईश्वर एवढा उदासीन कसा होऊ शकतो याचे त्यांना सखेद आश्चर्य वाटते.

'मी तुला ओळखतो—
तूच तर तो—

---

(३९) तिरुवायमोळी ५.९ (४०) तत्रैव ५–३–४

लंकेचे अभेद्य कोट जाळून टाकणारा
तुझे सारे कावे मी जाणतो.
तू यापुढे आम्हाला फसवू शकणार नाहीस.
आमचे खेळणे आम्हाला परत दे.
आणि जा, आम्हाला सोडून निघून जा.
अरे देवा. पुन्हा तुझ्या त्या भूलथापा ऐकवू नकोस.
स्वर्ग आणि पृथ्वी–सारेच तुझ्या थापा जाणतात.
संहारक चक्राचा तू स्वामी.
मी तुला एकच सांगते.
आमच्याशी असा खेळ नको खेळूस–
कृपा करून नको खेळूस.
आमचा वडवडणारा पोपट आणि पूवई
यांच्यात तू मूळीच लुडबूड करू नकोस.
मद्य-मधुर भोळा भाव बोलणाऱ्या आम्ही पोरी.
आम्हाला उगीच झुरणीला लावून–
कोमेजवू नकोस[४१]

नायकीची सखी गावठाणातील स्त्रियांना म्हणते–

आयांनो, तुमची तिजवर माया नाही.
तिला तिच्या वाटेने जाऊ द्या.
ती इकडे उभी आहे.
निळ्या कमळासारखे तिचे डोळे–
अश्रूंनी डबडवले आहेत.
आणि ती बोलते आहे.
प्रियकराच्या शुभ्रधवल शंखाविषयी
आणि त्याच्या चक्राविषयी–
त्याच्या कमलनयनाविषयी.
ती पूजा करते
त्याच्या रत्नखचित सौधाची–
तोलाइविल्लिमंगलम[४२] येथील
तिला तिच्या वाटेने जाऊ द्या.
'आयांनो, तुम्ही तर तिच्याकडे पाठच फिरवलीत.
बरे असू द्या तिला एकटीला.

---

(४१) तिरुवायमोळी ६.२ (४२) तिरुनेलवेली जिल्ह्यातील एक गाव.

ती जाऊन पोहोचली आहे–
तोलाइ विल्लिमंगलमला.
तिचे काजळकाठ अश्रूंच्या विहिरी झाले आहेत.
ती मृदु–मधुर शब्दात बोलते आहे–
तिच्या त्या प्रियकराबद्दल–
उसळणाऱ्या लाटांच्या सागरावर पहुडणाऱ्या,
गाईंना कुरणात चरायला नेणाऱ्या
तिच्या प्रियकराबद्दल.
आयांनो, तिला अशीच गाऊ द्या,
आपल्या वाटेने जाऊ द्या.' [४३]

पुढील गीतात नायकीची आई तिला म्हणते -

या विश्व गूढाचा तो स्वामी
सजल मेघासारखा निळा.
साऱ्या विश्वाचेच मापन करणारा
तोच कमलनयन प्रभू–
त्याच्याचसाठी–
सुगंधी मृदु-मुलायम केस असलेल्या माझ्या कन्येचे
शंखचूडे हरवले आहेत.*
जो आपल्या मुकुटावर
थंडगार तुलसीदले मिरवितो त्याच्याचसाठी
हिच्या गालांची लाली फिकुटली आहे.
तोच तो मेघश्याम
साऱ्या विश्वाचा घास करणारा,
लाल-चुटुक ओठांचा,
कावेबाज–इवलासा मनचोर,
भरभिरत्या चक्राचा स्वामी,
त्याच्याच चरणी अर्पित आहे
हिचे सौंदर्य
आणि कौमार्य.' [४४]

पुढील गीतात नायकी सखीला म्हणते–

---

(४३) तिरुवायमोळी ६.५
( *या तामीळ वाक्प्रचाराचा अर्थ प्रेमात पडणे असा आहे. )
(४४) तिरुवायमोली ६.६

‘ सखे, गावठाण माझा तिरस्कार करते.
हा तिरस्कार माझे काय वाकडे करील ?
मी तर त्या जगन्नाथासाठी वेडी झाले आहे.
माझे मन, माझी बुद्धी हरवून बसले आहे.
गावठाणाचा धिक्कार मला काय करील ?’
‘ तो बरोबरच घेऊन गेला आहे
माझी लज्जा, माझे कौमार्य
आणि माझे मनही.
आणि जाऊन बसला आहे उंच आकाशात
साऱ्या देवांचा स्वामी म्हणून-
हो. मी अगदी शपथ घेऊन सांगते,
की मी गावभर फिरेन,
हा कलंक जगजाहीर करेन.
कुणा गरतीने करू नये ते करेन
ताडाचा घोडा करून
निलाजरेपणे त्यावर आरूढ होईन
आणि प्रियकराने केलेली वंचना
साऱ्या जगाला जाहीर करेन.’[४५]

गावातील वृद्ध स्त्रियांनी नायकीला झपाटलेली समजू नये यासाठी तिची सखी त्या स्त्रियांना म्हणते:—

‘ ही माझी रूपतेजाळ, अविचारी सखी—
हिला हा रोग जडला.
आम्ही आता मदतीसाठी कुणाकडे जावे
आणि कसे ?
आयांनो, सांगाल का ?
ही तर बावरलेली
शोधीत आहे त्यालाच

(४५) तिरुवायमोळी ५.३. ताडाच्या पानांनी घोड्यासारखी आकृती बनवून सार्वजनिक ठिकाणी तिच्यावर बसणे ही प्रेमिकाची प्रेमात फसवणूक झाल्याची घोषणा करण्याची सांकेतिक रीत आहे. रूढीनुसार ही प्रतीकात्म घोषणा करण्याचा अधिकार पुरुषांना असतो. नम्माळवार तो अधिकार प्रेमात पडलेल्या (आणि वंचित झालेल्या) स्त्रीलाही देतात. तिरुमंगइ अळवार-सुद्धा हे स्वातंत्र्य स्त्रीला देतात.

त्या जादुगार सारथ्याला
पांडवांना संग्रामासाठी सज्ज करणाऱ्या–
आणि अंती विजय मिळवून देणाऱ्या. '
' हे बघा. आयांनो.
हिच्या – या भगतिणीच्या
बोलण्याकडे लक्ष देऊ नका.
उगीच दारू आणि मांस
यांची नासाडी करू नका.
कीर्तन करा तुम्हीही–
त्याच्या – त्या विश्वचमत्काराच्या चरणांचे
तो मधुगंधी तुलसीदले मिरवितो त्याचे
तोच आणि फक्त तोच एक
रामबाण उपाय आहे
हिच्या आजारावर,
' नका, नका करू आयांनो हे व्यर्थ प्रयास
भुताखेतांवर मंत्रतंत्र करण्याचे.
तुम्हाला वाटते त्यांनी हिला झपाटले आहे.
तुम्ही जितके हे प्रयत्न अधिक कराल
तेवढा हिचा विकार अधिक बळावेल.
उपाय आहे फक्त एकच.
त्या इंद्रनीलश्याम प्रभूवर
त्या विश्वचमत्कारावर
ज्यांचे प्रेम आहे
त्यांच्या पादधूलीचा हिच्यासाठी अंगराग करा [४६]

नायकीची माता म्हणते :–

' ती भूमीवर बसते '
आणि तिला गोंजारून म्हणते,
' ही माझ्या वामनाची[४७] भूमी. '
ती आकाशाकडे वर बघते श्रद्धाभावाने
आणि तिकडे बोट दाखवून म्हणते,
' ते तिथे त्याचे वैकुंठ आहे '
ती उठते. आणि अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी

(४६) तिरुवायमोळी ४–६, (४७) विष्णूचा वामनावतार

आक्रोश करते, ' अरे समुद्रनीला, सख्या ! '
' गे सुवासिनींनो, मला सांगा
ज्याने ही अशी जादूभरी भूल
माझ्या लेकीला घातली
त्याला मी करावे तरी काय ? '
' ती चंद्राकडे बोट दाखविते—
म्हणते, ' तो तिथे आहे माझा इंद्रनीलश्याम सखा '
ती समोरच्या टेकडीकडे पाहाते,
आणि हाक देते, ' माझ्या प्राणसख्या, ये. '
काळेंशार मेघ बरसतांना पाहून
ती म्हणते, ' आला, माझा प्रभू आला. '
या मुलीला मी उदरात वाढविले—
—पापिणीच मी—
आणि आता तो तिला धरून
चालवीत आहे.
या वेडच्या खेळात पुढे काय होणार
मला कळत नाही.[४८]

इथवर नम्माळवारांच्या साहित्यातील उतारे (अनुवादरूपाने) दिले. संगम-युगातील[४९] प्रेमकाव्याशी हे उतारे मिळते—जुळते आहेत. सागराचा मर्मरध्वनी; अंधाऱ्या रात्रीची अनंत भासणारी प्रदीर्घता आणि एकलेपणा, स्वतःच्या स्पर्शाने चटके देणारा दक्षिणवारा, रात्रीच्या साऱ्या प्रहरातून साद घालीत राहणारा प्रेम-पक्ष्याचा (चक्रवाकाचा) आवाज, चांदण्याची असहनीय लगट, विरहाची वेदना वाढविणारा वर्षाकाल इ. इ. संगम—प्रेमकाव्यातील साचेबंद प्रतीकांची थोडीशी उदाहरणे आहेत. या प्रतिमा आजपर्यंत चालू आहेत. प्रीतीने विव्हल झालेली स्त्री रोडावते आणि फिकुटते, तिच्या लावण्याचे तेज मलूल होते, ' कंकणे प्रियकराला अर्पित आहेत ' असे म्हणते इ. गोष्टीसुद्धा कदाचित अजाणता झाल्या असल्या तरीही संगम कवींच्या प्रीति—विषय हाताळण्याच्या पद्धतीचे हे प्रतिध्वनीच आहेत. प्रेमात पडलेली नायिका वर्णन करण्यासाठी निर्मिलेले घटनाबंध, तिचे झुरणे, प्रिय-कराला बोल लावणे, सखीला विश्वासात घेणे, प्रीती समजून घेण्यास असमर्थ अस-लेल्या आईचा अथवा गुरुजनांचा निषेध करणे, ताडपानांच्या अश्वाकृतीवर उघड-पणे बसण्याची प्रतिज्ञा करणे, नायिका झपाटलेली आहे असा इतरांचा (गैर)—समज होणे, हे प्रेमात पडलेल्या नायिकेचे वर्णन करण्यासाठी उपयोजिलेले घटना-

(४८) तिरुवायमोळी ४·४. (४९) नम्माळवारांचे ग्रंथ, तिरुविरुत्तम प्रकरण पहा.

वंधही संगम-युगाच्या परंपरेला अनुसरूनच आहेत.[५०] नायिकेची आई, दाई, सखीस्वत: प्रियकर, त्याचा सखा, नायकीला झपाटणाऱ्या भुतावर तंत्रप्रयोग करण्या, साठी आलेली भगतीण-या प्रीतिनाटयातील गीतबन्धांत सहभागी होणाऱ्या व्यक्ती आहेत. याही साऱ्या आदर्शतेची डूब दिलेल्या, संगम परंपरेतील प्रेमकाव्यात नेहमी भेटणाऱ्या ढोवळ व्यक्तिरेखा आहेत. अर्थात नम्माळवारांच्या काव्यात त्यांना ओसंडून वहाणाऱ्या पुराच्या पाण्याला वाट करून देणाऱ्या द्वारांचे रूप प्राप्त होते आणि त्यांतूनच त्यांच्या मनातील ईश्वरभक्तीच्या महापुराचा लोंढा आपणाकडे फुंफाटत येतो, हे खरे आहे. तरीही नम्माळवार जेथे मानवी प्रीतीचे प्रतीक वापरतात त्या कविता आणि संगमपरंपरेतील प्रेमकाव्य यांत साम्य आहे हे निश्चित. आपल्या अगोदरच्या काव्याची अनेक वैशिष्टये नम्माळवारांनी कशी आणि केव्हा आत्मसात केली याचा खुलासा त्यांचे जे चरित्र प्रकाशात आले आहे आणि जे सर्वमान्य आहे त्यांत होत नाही पण ती वस्तुस्थिती आहे. मग तिचे महत्त्व तामीळ काव्येतिहासाच्या अभ्यासकांपुरते मर्यादित का असेना.

काही घटना आडून सुचविण्याची रीत संगमकवींत दिसते. तशी ती नम्माळवारांतही दिसते. एक उदाहरण द्यायचे तर :-

' सांजवेळ झाली. तो आला नाही.
गाई तृप्तीने शहारत आहेत
कारण बैलांनी गळयातील घंटा घुणघुणावत
त्यांचेशी समागम केला आहे.
जीवघेणे मुरलीचे सूर किती वेळ येतच आहेत.
जाईच्या झगमग उमलत्या बहरातून
आणि निळया कमळांतून
घिरटया घालीत मधमाश्या नाचत आहेत.
सागर फुटून, उसळून, उचंबळतो आहे
आकाशापर्यंत-गर्जत, आक्रोशत,
बेहोषीची गर्जना-आक्रोश !
मी काय वरे म्हणू शकते ?
अशा अवस्थेत त्या ईश्वराची जवळीक नसेल तर
माझे मन कसे व्यक्त करू ?

---

(५०) संगमपरंपरेतून नम्माळवार एका बाबतीत वेगळे आहेत. ताडपत्रांच्या अश्वावर आरूढ होण्याची प्रतिज्ञा त्यांनी स्त्रीच्या मुखी घातली आहे. परंपरा हे स्वातंत्र्य फक्त पुरुषांना देते. तिरुमंगई अळवार नम्माळवारांचेच अनुसरण करतात.

कशी सुटका करू यातून स्वतःची ?
कशी वाचवू मी मला ?'[५१].

कवितेत सांजवेळेच्या निसर्गदृश्यातून कवीने मुद्दाम निवडलेले तपशील हेतुगर्भ आहेत. त्या साऱ्यातून सूचित होणारा आशय सहज स्पष्ट होतो. गाईगुरे, फुले, सागर, एकतर प्रीतीच्या समागमसुखाचा ब्रह्मानंद आस्वादत आहेत किंवा तृप्तीनंतरच्या क्षणी येणारी मूक शांतता अनुभवीत आहेत. या साऱ्याच्या पार्श्वभूमीवर प्रेमविव्हल मनाची वेदना विरोधाने अधिकच तीव्र होते, काव्याचा विषय तोच आहे.

निसर्गाच्या वर्णनातून साधली जाणारी या जातीची सूचकता आणि कारुण्याचा आभास यांची गल्लत करता कामा नये. ही सूचकता अधिक सूक्ष्म आहे. आणि पूर्वसूरीप्रमाणे नम्माळवारही तिच्यातून साम्य-विरोध ध्वनित करून अर्थघन आणि तरल अशी काव्यात्मता साधतात.

या निसर्गदृश्यांबरोबरच नम्माळवारांच्या काव्यात पुराणग्रंथातील नाना विषय समृद्धपणे एकत्रित झाले आहेत. ईश्वराने पृथ्वीवर लोक–अवतार घेऊन ज्या लीला केल्या त्यांचे वर्णन आणि वृत्तांत पुराणे देतात. नम्माळवारांची या अवतारांवर श्रद्धा होती. त्यामुळे पुराणात वर्णिलेल्या एखाद्या घटनेशी किंवा एखाद्या पात्राशी ते सहजी एकरूप होऊन जातात आणि अशी संधी त्यांच्या काव्यात त्यांना अनेकवार मिळाली आहे ते कृष्णाला बोल लावणारी गोपी होऊ शकले. स्वतःला झिडकारून गाईगुरांमागे गेल्याबद्दल त्याजवर रागावू शकले. (त्यांनी अशी कविता लिहिलीच आहे.) अवतारकार्यामध्ये जे जे घडले त्याचे त्यांनी मोठ्या आत्मीयतेने वर्णन केले आहे. ईश्वर बटुवामनाचे रूप घेऊन येतो आणि बळिराजाकडे तीन पावले भूमीचे दान मागतो. मग एकदम तो अनंत अवकाशात विश्वरूप धारण करून त्रिविक्रम रूपाने दोनच पावलात पृथ्वी आणि आकाश व्यापून टाकतो. रामाच्या रूपाने तो पायी अरण्ये तुडवतो, समुद्र ओलांडतो, लंका जाळतो आणि शस्त्राच्या बळावर ती जिंकून अयोध्येला परत येतो; अयोध्येचा राजा म्हणून तेथील जे जे काही सचेतन–अगदी गवताची इवली पातीही–त्यांना त्यांना ईश्वरी साक्षात्कार घडवितो. वराहरूपाने ईश्वर पृथ्वीला सागरातून उचलतो आणि तिचे रक्षण करतो. कृष्णावतारात मित्र म्हणून अर्जुनाच्या रथावर सारथ्याची भूमिका करतो, त्याचा आणि त्याच्या भावांचा दूत बनतो–या सर्व लीलांचे वर्णन नम्माळवार फार प्रेमभराने करतात. त्यामुळे त्यांच्या काव्याला प्रत्यक्षाची विविधता आणि चित्रमयता तर येतेच पण याशिवाय या अवतारांतून ज्या मानवी भोगांचा आणि नात्यांचा स्वीकार परमेश्वर करतो ते भोग आणि ती नाती नम्माळवार पूजनीय मानतात. त्यांच्या दृष्टीने ती केवळ प्रतीके उरत नाहीत. तर 'सत्'ची वेगवेगळी रूपे होतात. त्यामुळे

(५१) तिरुवायमोळी ९–९–१०

त्यांनी वापरलेल्या प्रतीकात्मकतेला एक वेगळेच तेज येते. त्यात सरळ भिडणारी प्रत्ययकारित्ताही असते आणि विश्वासार्हताही असते. आपल्या स्वतःच्या अथवा पुराणातील व्यक्तीच्या भावावस्थांची ईश्वराच्या लीलांशी आंतरिक जोड घालून नम्माळवार अनुभवांच्या बहुविध छटा व्यक्त करू शकतात. उदाहरणार्थ ईश्वराच्या प्रीतीत विफल झालेल्या नायिकेची माता तिच्यादृष्टीने जी ईश्वराची क्रूरता आहे त्याबद्दल तक्रार करीत आहे :—

अहो, पण माझी तेजस्वी कन्या
वेडी होऊन नाचत आहे
ज्योतीवर पेटलेले तिचे काळीज वितळत आहे.
'नरसिंह, नरसिंह–' असे ती एकसारखे गात आहे –
आणि तेजोहीन होत आहे.'[५२]

'नरसिंह' हा ईश्वराने हिरण्याला ठार करण्यासाठी घेतलेला भयानक सिंहमुखी अवतार. आई विचारते, माझी बापडी लेक त्या भयानक देवाला हाक तरी कशी मारते ? पुढच्याच कडव्यात सहस्रबाहू बाणाचा नाश करणाऱ्या, लंकेचा विध्वंस करणाऱ्या, तीक्ष्ण दातांचे ज्वलंत सुदर्शन चक्र चालवणाऱ्या ईश्वराचा उल्लेख आहे. बावरून गेलेल्या आईच्या मनाला या साऱ्या रूपातून ईश्वराची हृदयशून्यता जाणवते. एकीकडे नम्माळवार आईच्या मुखाने बोलत असतात. तिच्या वेदनाव्याकुळ आणि अगतिक दृष्टीतून स्वतःची अवस्था वर्णन करीत असतात आणि असे करता करता ते ईश्वराच्या भक्तीत अलगद प्रवेश करतात आणि त्याचे गुणगान करू लागतात. तो शीतल तुलसीदले धारण करणारा कसा आहे, सर्वस्व–समर्पणाला पात्र कसा आहे, आपल्यातील चैतन्याला अमृतस्पर्श करणारा कसा आहे त्याचे वर्णन करतात.[५३] त्यामुळे नाट्य आणि काव्य यांचे एक रसायन तयार होते. गुणवत्तेत ते साहित्यातील अत्युत्तम आकृतिबंधाच्याही पार जाते, आणि परिणामकारितेच्या बाबतीत भक्तांच्या हृदयाचे स्पंदनच जणू होऊन येते. इतर अनेक निराळ्या, गेयतेला प्राधान्य देणाऱ्या श्लोकांतूनही नम्माळवार सतत या अवतारांचा उल्लेख करतात. हे श्लोक निव्वळ वर्णनात्मक असले तरी त्यांतील बारकावे कवीच्या भाववृत्तींकडे आपल्याला खेचून नेतात. पुढे मी काही श्लोकांचा अनुवाद देत आहे.[५४] त्यावरून अगदी अल्पशी का होईना पण नम्माळवार ज्या झपाट्याने ही किमया साधत त्याची कल्पना येईल. मुळातील, चित्तवृत्तींना जागविणारा ताल आणि आवेग तसेच आलंकारिक पुनरावृत्तीतून साधणारी उत्कटता आणि झणत्कार हे सारे परभाषेतील (इंग्रजीतील) अनुवादात प्रकट करण्यास मी असमर्थ आहे याची मला जाणीव आहे. पुढील कवितेचा विषय सृष्टीची उत्पत्ती आणि प्रलय तसेच काही

(५२) तिरुवायमोळी–२.४.१ (५.३) तत्रैव २.४.६ (५४) तत्रैव ७.४.

अवतार असा आहे :–

उंच उठले सुदर्शन चक्र,
तसाच शंख आणि धनुष्यही
अवकाशात घुमला प्रतिध्वनी
' तुझेच असो संकीर्तन. '
विश्व दुभंगले
आणि पाणी वर उसळले – प्रलयकाळी [५५]
सारे विश्व परमेश्वरात सामावले
आणि नवे युग आले,'
' नद्या क्षुब्ध झाल्या
आणि समुद्राकडे पाठ फिरवून पर्वताकडे निघाल्या
शेष भयानक फूत्कार करू लागला–
पर्वताच्या रवीभोवती गुंडाळला गेलेला शेष–
घुसळल्या जाणाऱ्या सागराचा महानाद–
जणू विजेचा कडाडणारा विस्फोट
देवांच्या जयगीतात सूर मिसळणारा
जेव्हा ईश्वराने अमृत घुसळून काढले
महासागराच्या तळातून ' [५६]
' तेव्हा सप्तद्वीपांनी नाही जागा सोडली
नाही हालले सप्त पर्वत
नाही उसळले सप्त सागर–
जेव्हा परमेश्वराने पृथ्वी अलगद उंच उचलली
आपल्या सुळ्यांनी.[५७] '
' तारे थरारले
तशीच पृथ्वी आणि सागरही.
ग्रहगोल, आकाश आणि त्यातील ज्वाला
अग्नी, वायू, आणि पर्वत
गदागदा हालले. छिन्नभिन्न झाले
जेव्हा प्रलयकाळी
ईश्वराने सप्तविश्वांचा स्वाहाकार केला. '
' हा महानाद.
पोसलेले कुस्तिगीर झुंजत आहेत त्याचा.

---

(५५) विश्वाचा अंत. (५६) देवांनी अमृतासाठी समुद्रमंथन केले तो संदर्भ.
(५७) वराह अवतारात ईश्वर पृथ्वी उचलून तिचे रक्षण करतो तो संदर्भ.

राजमंडळाच्या सैन्यातील
योद्धे लढत आहेत त्या खणखणाटाचा
आणि आश्चर्योद्‌गार–
आकाशातील दिङ्मूढ देवांचा–
सारे नाद एकत्र झाले
जेव्हा ईश्वराने भारतीय युद्ध घडवून आणले.[५८]'
'पश्चिमा रक्तरंजित झाली
अवकाशाच्या दाही दिशा
गुलालाचा महापूर घेऊन वर उसळल्या
जेव्हा परमेश्वराने
दारुण दुःखाचा आघात करून
असुराचा नाश केला
पर्वत दुभंग करणाऱ्या सिंहाप्रमाणे.[५९]'
'प्रेतांच्या पर्वतासारख्या राशी झाल्या,
महासागर रक्ताने भरून उसळला,
दूरचे आणि जवळचे लक्ष्य वेधीत
बाणांचा वर्षाव झाला.
जेव्हा ईश्वराने
लंकेची जाळून राख केली.[६०]'
'तो दिवस–
जेव्हा सृष्टी निर्माण झाली-
त्या दिवशी एकाच क्षणात सारे अस्तित्वात आले.
पृथ्वी, तेज, वायू, आकाश,
चन्द्र–सूर्याच्या त्या जोड–ज्योती,
पर्वत आणि ढग
पर्जन्य आणि चैतन्य
आणि जे अमर तेही–
हे सारे त्याच दिवशी झाले
जेव्हा ईश्वराने
त्रैलोक्याची निर्मिती केली.'

---

(५८) कृष्णावतार. यात ईश्वराने भारतीय युद्ध घडविले.
(५९) नरसिंहावतारात ईश्वराने सिंहमुखी मनुष्याचे रूप घेऊन हिरण्यासुराचा नाश केला. (६०) रामावतार.

'सर्व गाई–गुरांनी त्याच्याखाली आसरा घेतला.
वन्य पशू त्यावरून खाली गडगडले.
तळी–सरोवरे भरली.
महापूर वाहू लागले
महान गर्जना करीत.
तेव्हा साऱ्या गावठाणाला त्याचा आसरा मिळाला
त्याचा–परमेश्वराने उचललेल्या त्या पर्वताचा.
सर्वनाशी मुसळधारेविरुद्ध धरलेल्या संरक्षण छत्राचा.[६१]'

शिवाय मी पूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे[६२] नम्माळवारांच्या दृष्टीने परमेश्वर ही केवळ अमूर्त संकल्पना नाही. वर्णनातीत ईश्वराचे वर्णन नम्माळवार गूढ संज्ञांनी करतात हे खरे आहे. परंतु त्यांचा मुख्य विचार अमर्याद सौंदर्य आणि करुणा यांचा स्वामी असलेल्या मूर्त अवताराचा आहे. ईश्वराचा शंख आणि त्याचे चक्र, त्याचा सुवर्ण किरीट, त्याचे कमळासारखे डोळे, हरितनील तेजोवलयात झळाळणारे त्याचे शरीर, सागरासारखा किंवा सजल मेघासारखा त्याचा नील वर्ण यांचे वर्णन करीत असताना नम्माळवारांना पुन्हा पुन्हा परमानंदाचे भरते येते–

'हे प्रभू, माला सांग–'
तुझ्या मुखाचे कीर्तितेज
तुझ्या सुवर्णमुकुटात झळकते आहे का ?
तुझ्या चरणांची प्रभा
तू उभा आहेस त्या कमलात विकसली आहे का ?
तुझ्या तनूचा सोनसळी प्रकाश
तुझा पितांबर बनून राहिला आहे का ?
आणि तुझ्या अंगावरील तेजस्वी रत्ने ?
–तीही त्या प्रकाशाचीच रूपे ?[६३]

अपरिमित सौंदर्याच्या या भव्योदात्त कल्पनेने परमेश्वराच्या प्राप्तीसाठी या संताने घेतलेले सारे श्रम उजळून निघतात. सौंदर्याचे हे दर्शन त्यांच्या भोवतालच्या सृष्टीला तर व्यापून टाकतेच, पण त्याचबरोबर त्यांच्या दृष्टीने ज्या ज्या मंदिरातून परमेश्वराचा निवास आहे तेथील सौंदर्यही पुन्हा पुन्हा टिपत राहाते.

---

(६१) कृष्णावतारातील कथा. पर्जन्याचा स्वामी इंद्र याच्या सूडातून उफाळलेल्या क्रोधापासून संरक्षण करण्यासाठी कृष्णाने गोवर्धन पर्वत उचलला. ज्या खेड्याचा संदर्भ आहे ते गोकुळ. भगवान कृष्ण या खेड्यातच वाढला.

(६२) 'नम्माळवारांचे तत्त्वज्ञान' हे प्रकरण पहा.

(६३) तिरुवायमोळी ३ : १. १. (६४) कुंभकोणम (तंजावर जिल्हा).

'विशाल जलाशयाचे सान्निध्य असलेले तिरुकुदंताई[६४] तिथे तांबूस साळीच्या शेतातील अंकुर पंख्याप्रमाणे झुलत असतात आणि खोल खोल तलावातील रक्त-कमळे आपले डोळे उघडतात.'[६५]

'चट्टयापट्टयाचे पंख असलेली मधमाशी तिरुवल्लवाळ येथे मधभरे गाणे गुणगुणते.'[६६].

'तिरुवेंगडम येथील दलदली तलावातील कमले अग्निज्योतीसारखी फुलतात.'

'तिरुप्पुलिंगुडी येथील पाणथळ शेतातून इवलाले मासे सुळसुळतात आणि नदीतील प्रवाहांच्या विशाल खोबणीतून खुब्रे हिंडत असतात'[६८]

केवळ मंदिरेच नाहीत, नम्माळवारांच्या दृष्टीने अखिल विश्व हेच एक मंदिर आहे. आणि जगातील सारे सौंदर्य ही ईश्वराच्या अपरिमित लावण्याची हुबेहूब प्रतिकृती आहे.[६९] नम्माळवार जिथे म्हणून नजर टाकतात तिथे त्यांना हे लावण्य दिसते. कमळे, निळी जलफुले, सागर आणि आकाश, टेकड्या आणि पर्जन्यधारा आणि जगातील सारे वस्तुमात्र त्यांना ईश्वराचे स्मरण करून देते. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश ही विश्वातील पाच आदिम तत्त्वेही त्यांना ईश्वराचीच रूपे वाटतात. सत्‌च्या शोधात असणाऱ्या नम्माळवारांना सृष्टिचमत्कारातही चिरंतनाचे सौंदर्य दिसते आणि यातूनच काव्य उदयाला येते. नम्माळवार एक संत किंवा प्रेषित असण्याशी याचा कोणताही विरोध नाही. उलट 'आचार्य हृदयम्'ने हे नेमके जाणले आहे की जेव्हा आपण नम्माळवार हे एक कवी होते असे म्हणतो तेव्हा त्यांच्याविषयी जे जे म्हणावयाचे ते सारे म्हटले जाते. 'ते ऋषी आहेत', 'ते मुनी आहेत', 'ते द्रष्टे आहेत', 'ते मुक्तात्मा आहेत' हे आपण बोललो नसलो तरी ते सारे आपल्याला उमगलेलेच असते.

प्रतीकाशिवाय आणि केवळ स्वतःचा निर्देश करून नम्माळवार काही लिहीतच नाहीत असे नाही. असेही ते लिहितात. तिरुवायमोळीमधील अनेक दशपद्या हे सिद्ध करतात. ईश्वराशी युक्तिवाद करणे, त्याला प्रश्नावर प्रश्न विचारणे, मनोभंग, स्वतःविषयी असमाधान, तपस्येची धडपड, आनंदोत्कट साक्षात्कार अशा अनेक स्वरूपांत या उल्लेखांची व्याप्ती विस्तारलेली आहे.[७०] तिरुवाय-मोळीच्या काही दशोपद्यातून आणि 'तिरुवासिरियम'च्या काही भागातून विश्व आणि ईश्वर यांच्याविषयीचे काही सिद्धांत नम्माळवारांनी मोठ्या कौशल्याने आणि नेटकेपणे मांडले आहेत. चिंतनशीलता आणि अभिव्यक्तीतील सूत्रमयता

(६५) तिरुवायमोळी ५.८.१.२. (६६) तत्रैव ५.९.९. (६७) तत्रैव ६.१०.२
(६८) तत्रैव ९-२-९,-५.(६९) नम्माळवारांचे तत्त्वज्ञान' हे प्रकरण पहा.
(७०) 'नम्माळवारांचे तत्त्वज्ञान' आणि 'सत्‌चा प्रवास' ही प्रकरणे पहा.

यांतून अशा पद्धतीची कविता सिद्ध होते. पण इथे सुद्धा एखादी कल्पना दृष्टांताच्या किंवा प्रतीकाच्या तपशिलातून समोर मांडण्याकडे असलेला कवीचा कल प्रकट होतोच. उदाहरणार्थ पुढील काव्यपंक्तींत ईश्वर सर्वव्यापी आहे ही कल्पना नम्माळवार मांडतात. पण ती मांडताना त्यांची प्रतिभादृष्टी या विचाराला पोषक ठरणाऱ्या वस्तूवस्तूवर फिरत असते :–

' पाण्याच्या प्रत्येक बिंदूत–
शीतल विशाल सागराच्या,
भूमीवर आणि आकाशात,
अवकाशाच्या प्रत्येक अंशात,
साऱ्या विश्वात आणि विश्वाच्या पार
आणि त्यातील साऱ्या वस्तुमात्रात.
ईश्वर आहे, अदृश्य, अंतर्हित,
ज्याच्यात हे सारे सामावले आहे.[७१] '

' अनंत अवकाशाच्या पोकळीत,
अग्नीत आणि वायूत,
धरतीत आणि जलात,
आणि अगणित अशा वस्तुजातात–
जे यांचेपासून प्रसृत होते.–साऱ्यांत
तो आहे. शरीरात चैतन्य असते तसा
तो आहे – सर्वदूर – अदृश्य, अंतर्लीन.
वेदांचा प्रकाश.
साऱ्या वस्तुजाताचे अंतिम निधान. '[७२]

या चित्रदर्शितेप्रमाणेच अनेकदा नम्माळवारांच्या काव्यात भावनात्मकताही तत्त्वसिद्धांतांचे निरूपण करताना डोकावते. पुढील काव्यात ' ईश्वर हे एक गूढ आहे ' या कल्पनेचा विस्तार करताना नम्माळवार त्यात अशी भावपूर्ण काव्यात्मता आणतात :—

' ज्यांच्या बुद्धीसमोर संशयाची मेघपटले विरून जातात
आणि ज्यांचे ज्ञान निश्चयात्मक असते–
त्या अमरांनाही
ईश्वर गोंधळात टाकतो.
जी मृगजळे तो निर्मितो

(७१) तिरुवायमोळी. १–१–१० (७२) तत्रैव १–१–७.

ती आकाशाहूनही विशाल असतात.'[७३]

इथे विचाराची अभिव्यक्ती कवीने करावी तशी होते. याच्या पाठोपाठ भावना येते.—

'ईश्वर मेघासारखा श्यामवर्ण आहे.
त्याच्या कुसुमकोमल पावलांनी
या विश्वाची मर्यादा मापली.
त्या चरणांना मी कधीही विसरणार नाही.
मी त्यांच्याचविषयी नेहमी बोलेन—नव्हे बरळेन.
मी त्यांना हृदयाशी, मिठीत गोळा करेन
त्यांची पूजा करेन.'[७४]

जे नम्माळवारांचे काव्य मुळातून वाचू शकत नाहीत, त्यांच्यापुढे त्यांच्या शैलीचे वर्णन करणे निरर्थक आहे त्यामुळे काही ठळक गोष्टी सांगूनच मी थांबणार आहे. नम्माळवार ज्या तामीळ भाषेचा उपयोग करतात ती नागर भाषा आणि दक्षिण तामिळनाडूची बोलभाषा यांचे जोमदार आणि टवटवीत असे मिश्रण आहे. त्यामुळे निवेदनाचा प्रांजलपणा, स्पष्टपणा आणि भावस्पर्शिता यांना तिच्यात वाव मिळतो. ती भाषा सगळीकडेच कर्णमधुर वाटावी अशी नाही. (का असावी ?) तरी कानाला आनंद देणारी कितीतरी उदाहरणे तीत आहेत. आणि जो खडबडितपणा आहे तो एखाद्या जिवंत पाषाणाचा आहे. लाटांनी फेसाळणाऱ्या समुद्राचा आहे. म्हणूनच सामर्थ्य आणि सखोलता यांचा प्रत्यय देणारा आहे. नम्माळवारांनी नाना प्रकारचे 'विरुत्तम' काव्यात उपयोजिले. सुंदर 'वेण्वा' आणि 'कट्टलइ कलितुरइ' रचले. एका नमुनेदार 'अशिरियम'ची रचना केली. जाणीवपूर्वक निर्मिती करणारा कुशल कलाकार कारागिरीची जी काळजी घेतो तिचे कोणतेच दर्शन नम्माळवारांच्या रचनेत होत नाही हे खरे; परंतु त्यात अशी एक अनिवार्य शक्ती आहे की जी फक्त कवीलाच वश असते.

त्यामुळे नम्माळवार कवी होते. हे निर्विवाद. कदाचित ते जाणीवपूर्वक, कवी होण्याच्या प्रेरणेने कवी झाले नव्हते. (आणि तेच अधिक बरे.) परंतु अंतिम गूढाचा त्यांचा व्यापक अनुभव शब्दातून प्रकट होण्यासाठी उत्कटला होता. हा अनुभव रक्ताला, त्यांच्या हृदयाला जाणवत होता. त्यांचा आत्मा प्रतीकात्मता, चित्रमयता; निसर्ग आणि मानवी जीवन यांतील सहस्रावधी तपशील यांच्या आधारे सहजपणे शब्दांत ओसंडत होता त्यामुळे तामीळ भाषेला नवीच क्षितिजे उघडी झाली. या क्षितिजावर स्वर्गधरेचे मीलन झाले. मानवी जीवन हे चिंतनाचा विषय असतानाच एका परमेश्वराशी नाते जोडणारा पवित्र संस्कारही होऊन गेले.

---

(७३) तिरुवायमोळी १-३-१० (७४) तत्रैव १-३-१०

Indian Institute of Advanced Study
117029
9/12/04
SHIMLA

तामिळनाडूच्या संतकवींमध्ये नम्माळवारांचे स्थान फार वरचे आहे. हे संतकवी एका ठिकाणी म्हणतात, "कवींनो, या तुमच्या हातांनी कष्ट करा आणि निढळाचा घाम गाळून तुमची भाकरी कमवा, कुणा धनवंतांची स्तुतिस्तोत्रे कशासाठी गावयाची ? आणि या पृथ्वीवर खरा धनवान कोण ? मला तर कोणी दिसत नाही. तुम्ही तुमच्या देवांची स्तोत्रे गा."

या नेटकेपणे लिहिलेल्या छोटयाशा प्रबंधात के. प्रो. ए. श्रीनिवास राघवन वाचकांना आळवार संतांचा सर्वसामान्य परिचय आणि नम्माळवारांचा विशेष परिचय करून देतात. नम्माळवारांच्या चारही ग्रंथांची त्यांनी तपशीलवार ओळख करून दिली आहे. नम्माळवारांचे आध्यात्मिक जीवन, त्यांच्या काव्यात्म उद्रेकांतून स्पष्ट होणारा त्यांचा सत्‌च्या शोधात असतानाचा प्रवास यावरही भाष्य करून के. राघवन यांनी नम्माळवारांचे तत्त्वज्ञान आणि काव्य सारांशाने विशद केले आहे.

नम्माळवारांचे व्यक्तित्व आणि काव्य यांशी लेखकाचा आदरयुक्त जिव्हाळयाचा असा आयुष्यभराचा संबंध आहे. त्या जिव्हाळयाचा स्पर्श या लेखनालाही झाला आहे. एक भक्त म्हणून ईश्वरप्रीतीने बेहोष झालेला एक संगीतकार म्हणून किंवा प्रतिभेने उजळलेला एक कवी म्हणून नम्माळवारांचे जे कर्तृत्व आहे त्याला या लहानशा प्रबंधाच्या मर्यादेत लेखकाने भरपूर न्याय दिला आहे.
स्पष्टीकरणार्थ दिलेले असंख्य
वाटतात. नम्माळवारांच्या काव्य
काव्याचे भाषांतर अशक्यप्राय अ
महत्त्वाची आहे.

Library IIAS, Shimla
MR 891.481 015 2 N 152 R
00117029

Nammalvar (Marathi), Rs. 5.
SAHITYA AKADEMI
REVISED PRICE Rs. 15-00